हिंदु बोध
॥ इदं शास्त्रं, इदं शस्त्रम् ॥

# हिंदुबोध

संपादक : रविकांत कळंबकर

विश्व हिन्दू परिषद
धर्मो रक्षति रक्षितः

■ शके १९४७ ■ वर्ष २५ ■ अंक ९ ■ डिसेंबर २०२५ (मासिक) ■ मूल्य ₹ २०/– ■ पृष्ठ संख्या ४४
■ HINDUBODH ■ PUNE ■ VOL. 25 ■ ISSUE NO 9 ■ December 2025 (MONTHLY) ■ PRICE ₹ 20/- ■ PAGES 44
















## सेवा कुंभ - अमृताचा कुंभ (२०२५)

अंक www.vhp.org वर उपलब्ध



E-mail : hindubodh.pmp@gmail.com


घर असो वा गाडी, शिक्षण अथवा व्यवसायवृद्धी...
तुमचे स्वप्नं साकार करायला मदत जनता बँकेची!
जनता
गृहकर्ज
योजना
व्याजदर 7.75%* च्या पुढे | ₹3 कोटींपर्यंत अर्थसहाय्य
शिक्षण व वसतिगृह शुल्क, शैक्षणिक साहित्य, इ.साठी कर्ज
जनता
एज्युफ्लेक्स
कर्ज योजना
देशांतर्गत शिक्षणासाठी
₹ 50* लाख
परदेशी शिक्षणासाठी
₹ 1* कोटी
आकर्षक व्याजदर
जनता
वाहनकर्ज
कर्ज योजना
सुलभ प्रक्रिया । त्वरित कर्जवितरण
आकर्षक व्याजदर
आता प्रत्येक व्यवहार करा 'कॅशलेस'...
कारण जनता बँक सदैव तुमच्याबरोबर!
सुरक्षित, सोपी व गतिमान
इंटरनेट बँकिंग सुविधा
व्यापारी वर्गासाठी
कार्ड स्वाईप मशिन
रोजच्या व्यवहारांसाठी
जनता रुपे डेबिट कार्ड
तुमच्या सर्वप्रकारच्या बँकिंग व्यवहारासाठी
मोबाईल बँकिंग सेवा
JetPay
we proudly supporting...
Digital India
BHARAT BILLPAY
जनता सहकारी बँक लि., पुणे
मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक
टोल फ्री क्रमांक : 1800 233 3258
www.janatabankpune.com
*अटी व नियम लागू.

मासिक
**हिंदुबोध**
वर्ष – पंचवीस : अंक ९ वा
शके १९४७
डिसेंबर २०२५

संपादक
**श्री. रविकांत कळंबकर**
ravi.kalambkar@gmail.com

निवास
एबीसी जंक्शन, ए बिल्डींग, फ्लॅट नं. ६,
आकुर्डी रेल्वेस्टेशन जवळ,
निगडी प्राधिकरण, पुणे ४११०४४
[redacted]

संपादक मंडळ
श्री. किशोर चव्हाण – प्रांत मंत्री
श्री. ॲड. सतिश गोरडे – प्रांत सहमंत्री
श्री. कृष्णकांत चांडक – प्रांत कोषाध्यक्ष
श्री. श्रीपाद रामदासी – प्रांत प्रचार–प्रसार प्रमुख
श्री. संजय गोडबोले – प्रांत प्रचार–प्रसार सहप्रमुख
श्री. अनिल सांबरे – नागपूर
श्री. विजयकुमार पिसे – सोलापूर

संपादक मंडळ सदस्य
श्री. नितीन वाटकर
प्रांत जाहिरात व वर्गणीदार प्रतिनिधी

पत्र व्यवहार
व्यवस्थापक
मनोज शेलार
मोः ९०४९३९६३६३

अंकमूल्य रु. २०/–, वार्षिक वर्गणी रु. २००/–

मुद्रण स्थळ
संवाद ट्रेडप्रिंटस्, ५९५, शनिवार पेठ, पुणे – ३०.
दूरभाष : २४४८ ५६ ३२
sanwadpvt@gmail.com

## अनुक्रमणिका

✦ संपादकीय.... सेवा कुंभ – अमृत कुंभ (२०२५)
रविकांत कळंबकर ................................ ०५

✦ वि. हिं. परिषद प्रांत वृत्त ................................................ ०६

✦ चांगल्या बातम्या
कुमार आठवले ..................................... २१

✦ संघ, सरदार पटेल, पं. नेहरू आणि गांधीहत्या
डॉ. गिरीष आफळे ................................. २३

✦ रामनाम जप एक भक्तीसाधना – श्री गोंदवलेकर महाराज
ॲड. स्वाती जेरे ................................... २७

✦ राघोजी भांगरे : ब्रिटिश राजसत्तेला आव्हान देणारा पहिला संघर्षयोद्धा
विजयकुमार पिसे .................................. २९

✦ निरंतर युद्धाची पुनर्प्रचिती!
रवींद्र मुळे ........................................... ३१

✦ दत्तोपंत ठेंगडी
पंकज जयस्वाल ................................... ३३

✦ अशी पाखरे येती
ब्रह्मानंद घुगरे ....................................... ३६

✦ वाचनशिल्प
स्वामी वरदानंद भारती ............................ ३८

✦ हिंदू धर्मरक्षक श्री गुरु तेगबहादुर यांचे अविस्मरणीय बलिदान
किशोर चव्हाण ..................................... ४०

प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

'हिंदुबोध' मासिक मालक, विश्व हिंदू परिषद, महाराष्ट्र प्रदेश यांचेकरिता मुद्रक व प्रकाशक विवेक सोनक यांनी संवाद ट्रेडप्रिंटस्, बी – ७, गोवईकर बिल्डिंग, ५९५ शनिवार पेठ, पुणे ४११०३० येथे छापून, भारत भवन, १३६० शुक्रवार पेठ, पुणे – ४११००२ येथे प्रकाशित केले. संपादक : रविकांत कळंबकर (पीआरबी ॲक्टनुसार संपादकीय जबाबदारी)

**"Hindu Bodh" Monthly publication is owned by Vishva Hindu Parishad, Maharashtra Pradesh, Printed and Published by Vivek Sonak, Printed at Sanwad TradePrints, B-7, Gowaikar Bldg. 595 Shaniwar Peth, Pune - 411030 and Published at Bharat Bhavan, 1360 Shukrawar Peth, Pune - 411002. Editor - Ravikant Kalambkar**

हिंदुबोध संबंधीचे सर्व कायदेशीर खटले अंक प्रकाशनाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत केवळ पुण्याच्या न्यायालयातच चालतील.

## जनसेवा ही ईश्वरभक्ति

जनसेवा ही ईश्वरभक्ति बोध यातला उमजुया
विश्वासाने बंधुत्वाचे नाते सर्वा सांगूया ।।

कालौघातच उभ्या राहिल्या भिंती जातीपतींच्या
अनेक जाती पंथ–गटानी धरिल्या वाटा भेदांच्या
भेद भेदुनि भिंती पाहुनि समरसता ती आणूया
विश्वासाने बंधुत्वाचे नाते सर्वा सांगूया ।।१।।

ग्रामवासी वा नगरनिवासी असोत कोणी वनवासी
एक संस्कृती अमर आपुली जोडू जीवन धारेशी
कालगतीच्या चक्रावरती पर्व नवे ते कोरूया
विश्वासाने बंधुत्वाचे नाते सर्वा सांगूया ।।२।।

कुणी न राहो दुबळा येथे मनी असा निर्धार जागवु
कर्तृत्वाच्या विश्वासाने बलशाली हा समाज उभवु
उत्कर्षाची पहाट आणुन प्रकाश किरणे होऊया
विश्वासाने बंधुत्वाचे नाते सर्वा सांगूया ।।३।।

# आवाहन...

सप्रेम नमस्कार,

विश्व हिंदू परिषदेचे प्रांत स्तरावर निघणारे एकमेव मासिक म्हणजे **''हिंदुबोध.''** कोरोनाचे पहिल्या लाटेनंतर म्हणजे फेब्रु. २०२१ पासून नवीन स्वरूपात निघणे सुरु झाले आहे. हा अंक ४४ पानांचा असून याचे मासिक मूल्य रु. २०/– फक्त आहे. वार्षिक रु. २००/– तर त्रैवार्षिक रु. ५००/– वर्गणी आहे. पंचवार्षिक किंवा आजीवन योजना आता बंद केली आहे.

देव, देश अन् धर्मासाठी कार्यरत असलेल्या या कार्यासाठी आपण **हिंदुबोध** मासिकाचे नियमित वाचक व्हावे, ही विनंती. वर्गणी खात्यात भरून नोंद (नांव, पत्ता, पिनकोड क्र., संपर्क क्र.) कार्यालयाकडे कळवावी. आपल्याला दरमहा **''हिंदुबोध.''** ' दि. १ ते ५ काळात पोस्टाने मिळेल.

तसेच आपण नवीन वर्गणीदार वाचक व अंकासाठी जाहिरात मिळवून देण्यात योगदान द्यावे. ही नम्र विनंती. योग्य ते मानधन देण्यात येईल. कळावे, धन्यवाद!

| **श्री. रविकांत कळंबकर** | **श्री. किशोर चव्हाण** | **श्री. पांडुरंग राऊत** |
|---|---|---|
| (संपादक) | (प्रांत मंत्री) | (प्रांत अध्यक्ष) |

# सेवा कुंभ - अमृत कुंभ (२०२५)

## संपादकीय

**सेवा हे यज्ञकुंड, समिधा सम हम जले।**
**ध्येयमहासागर में, सरितरुप हम मिले।।**

या गीताच्या ओळींचे विश्व हिंदू परिषदेच्या माध्यमातून गेली साठ वर्षे शब्दशः आचरण होत आहे. परिषदेचे कार्य धार्मिक संस्था, मंदिरे, धर्माचार्य संपर्क, जनजागरण इत्यादी माध्यमातून जसे होत आहे तसेच, प्रामुख्याने सेवाकार्याचे माध्यमातून विशेषतः ग्रामीण भागात सर्व स्तरांवर चालू आहे. आरोग्य, शैक्षणिक, सामाजिक व स्वावलंबन अशा चार भागात त्यांची विभागणी केली असून, काही प्रकल्प नित्य स्वरुपाचे तर काही नैमित्यिक चालू आहेत. सेवा कार्याच्या अनेक प्रकल्पात निःस्वार्थ कार्यकर्त्यांच्या समिधा खरोखरीच नित्यपणे आहूती देत आहेत. नवीन नवीन सेवाकार्ये सरितेच्या रुपाने समाजाची सेवा या एकाच ध्येयाने महासागराला येऊन मिळत आहेत.

शैक्षणिक व आरोग्याचे मोठे मोठे प्रकल्प संपूर्ण देशभर बाराशेच्या पुढे कार्यरत आहेत. सामाजिक साडेपाचशेचे वर तर स्वावलंबनाचे तेराशेच्या आसपास चालू आहेत. देशातील प्रांत रचनेच्या अंतर्गत परिषदेने कार्यवाढीचे दृष्टीने लहान लहान भाग करून सुमारे पंचेचाळीस प्रांत तयार केले आहेत जसे की, महाराष्ट्राचे चार प्रांत केले आहेत. मुंबई-कोकण, पश्चिम महाराष्ट्र, देवगिरी व विदर्भ. केवळ, पश्चिम महाराष्ट्र प्रांतातच म्हणजे (नासिक, नगर, पुणे, पुणे शहर, सातारा, सांगली, कोल्हापूर) या सात जिल्ह्याचे अंतर्गत सहा मुलांची व दोन मुलींची वसतिगृहे आहेत. यातील सुमारे तीनशे विद्यार्थ्यांचा एकत्रित 'सेवा संगम' कार्यक्रम नुकताच पुण्यात संपन्न झाला. दर पाच वर्षांनी हा कार्यक्रम होत असतो. आठ वसतिगृहांचे सह लहान मोठे सुमारे दिडशेचे वर सेवाकार्य या प्रांतात समाजाची सेवा अखंडपणे करत आहेत. विश्व हिंदू परिषदेची मातृसंस्था असलेल्या रा. स्व. संघाचे माध्यमातून तर, संपूर्ण देशात या सर्व स्तरांवरील सेवाकार्यांची संस्था एक लाख सत्तर हजाराचे वर आहे.

आपल्यामुळे दुसऱ्याला कोणताही त्रास होणार नाही असे स्वतःचे वर्तन करणे हे समाजसेवेचे पहिले पाऊल समजले जाते तर, आपल्यामुळे कुणाचा तरी त्रास हलका होणार असेल असे काम करणे हे प्रत्यक्ष पहिले पाऊल टाकणे असे सेवा कार्य सुरु होते. शहरी भागात वैयक्तिक तसेच कौटुंबिक स्तरांवर अनेकजण वर्षातील काही दिवशी अश्या सेवा कार्यात प्रत्यक्ष सहभाग घेवून किंवा अर्थसहाय्य करून समाज ऋण सांभाळत आहेत. आपणही अवश्य या कार्यात सहाय्यभूत रहावे अशी अपेक्षा.

२० डिसेंबर ला संत गाडगे बाबांचा पुण्यदिन आहे. ऐंशी वर्षांचे त्यांचे आयुष्य आजही प्रेरणादायी आहे. त्यावेळेच्या प्रथेप्रमाणे बाबांचे लग्न केवळ सोळाव्या वर्षी आठ वर्षाच्या मुलीबरोबर झाले. वयाच्या आठव्या वर्षीच वडिलांचे निधन झाले होते. पण कष्ट करावे, फुकटचे खाऊ नये, शिस्त, संयम, स्वच्छता, स्वावलंबन, स्वाभिमान असे संस्कार त्यांचेवर होत गेले. समाजसेवेची प्रेरणा तीव्र असल्याने वयाच्या २९ व्या वर्षी गृहत्याग करून देशभ्रमंती केली. अंगावर चिंध्यांचे वस्त्र, हातात काठी आणि सोबत फक्त एक गाडगं. ज्याचा उपयोग जेवण, पाणी पिणे, माधुकरी मागणे, उन लागलं की डोक्यावर घेणे असा करत आणि म्हणूनच ते गाडगेबाबा झाले.

स्वच्छता हा जणू त्यांचा स्वभाव होता. खराटा त्यांनी कधी सोडला नाही. गावागावात जाताना ते वस्तीवस्तीत जशी खराट्याने स्वच्छता करत तसेच अभंग, प्रवचनातून मनामनातील पण स्वच्छता करत. आज बाबांच्या जाण्याला सत्तर वर्षानंतरही ही 'स्वच्छता' या शब्दाभोवती अजूनही आपण घुटमळत आहोत. देशाचे मा. पंतप्रधान गेल्या दहा वर्षांपासून स्वच्छतेचा आग्रह धरत आहेत. अभियान करत आहेत. विश्व हिंदू षरिषद तर स्थापनेपासूनच समाजातील, मनामनातून जात-पात स्वच्छ करते आहे. देशात या दोन्ही स्तरांवर स्वच्छता होत असल्याचे दिसत आहे. समाजाच्या सक्रीय सहभागातूनच हे स्वच्छतेचे अभियान यशस्वी होणार आहे. स्वच्छ मनाने व देशातील स्वच्छ रस्त्याने भारतीय समाज देशाच्या उज्वल भविष्याची वाटचाल करतो आहे. तो दिवसच संत गाडगे बाबांचा खरा स्मृतीदिन ठरेल.

**रविकांत कळंबकर, हिंदुबोध संपादक**



# मुंढवा येथे दुर्गाशक्ती जागरणनिमित्त संचलन

मुंबई क्षेत्र गोरक्षा प्रमुख मा. भाऊराव कुदळे यांचा तीन विभागात प्रवास

१,२,३ नोव्हेंबर २०२५ पासून पश्चिम महाराष्ट्र प्रांतातील कोल्हापूर, सातारा व सोलापूर या तीन विभागातील सातारा, कराड, कोल्हापूर, सांगली, पंढरपूर व सोलापूर या ६ जिल्ह्यात मुंबई क्षेत्र गोरक्षा प्रमुख भाऊराव जी कुदळे यांनी गोरक्षा, गोसंवर्धन आयाम मजबुतीसाठी प्रवास केला.

प्रांत गोरक्षा गोसंवर्धन प्रमुख संतोष खामकर, प्रांत सहप्रमुख भानुदास बर्गे यांनीही मा.भाऊराव समवेत सर्व जिल्ह्यातील प्रवासादरम्यान बैठकांमध्ये गोरक्षा गोसंवर्धन आयाम मजबूत करण्यासाठी प्रांत टोळी, जिल्हा टोळी, प्रखंड टोळी पूर्ण करण्यासंदर्भात सूचना दिल्या. गोसंवर्धनासाठी काय गरजेचे आहे या संदर्भात प्रबोधन व दायित्व बोध याविषयी माहिती व दायित्व बोध पुस्तिका दिली. गोमाता वाचविण्यासाठी रक्षण जेवढे गरजेचे आहे त्यापेक्षा जास्त सध्या गोसंवर्धन करणे गरजेचे आहे गाई वाचली तर देश वाचेल, असे भाऊराव म्हणाले.तसेच दिल्ली येथे होणार्या गोभक्त महिला संमेलनाला मोठ्या प्रमाणात गोभक्त महिला पश्चिम महाराष्ट्र प्रांतातून जातील, अशी अपेक्षा व्यक्त केलीप्रांत गोरक्षा गोसंवर्धन प्रमुख संतोष खामकर यांनी गोमातेच्या पंचगव्य पासून उत्पादित दंतमंजन, फेसपॅक, धूप स्टिक, गोमूत्र अर्क, साबण, शॅम्पू, स्किन क्रीम, उटणे यांच्या वापराने होणारे वैज्ञानिक फायदे सांगितले. ज्याला घरी गोमाता सांभाळणे शक्य नाही, त्यांनी गोसेवा म्हणून पंचगव्यापासून उत्पादने वापरावीत. त्यामुळे गोशाळा आर्थिकदृष्ट्या मजबूत होण्यास मदत होईल.सर्व जिल्ह्यांच्या बैठका मोठ्या उत्साहात पार पडल्या. कोल्हापूर जिल्हा गोरक्षा गोसंवर्धन प्रमुख म्हणून ओंकार पाटील यांची नियुक्ती करण्यात आली.



# नशा मुक्त भारत अभियान विशेष कार्यक्रम

विश्व हिंदू परिषद बजरंग दल कोथरूड व मएसो सिनियर कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने नशामुक्त युवा – विकसित भारत या संकल्पनेतून म.ए.सोसायटी येथे युवकांसाठी विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते : मा. श्री. प्रवीणकुमार पाटील सर, पोलीस उपमहानिरीक्षक (अमली पदार्थ विरोधी पथक टास्क फोर्स, महाराष्ट्र राज्य उपस्थित होते. प्रमुख उपस्थिती कर्नल डॉ. विपुल पाटील, वरिष्ठ अधिकारी व संचालक, भारतीय सेना, श्री. तुषार दामगुडे, अध्यक्ष – अँटी टेरर फोरम, महाराष्ट्र राज्य, कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. किशोर चव्हाण मंत्री – विश्व हिंदू परिषद, पश्चिम महाराष्ट्र.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती वंदन करून झाली त्यानंतर बजरंग दल महाविद्यालयीन प्रमुख आशुतोष पांडे यांनी प्रास्ताविक केले त्यात त्यांनी विद्यार्थ्यांना व्यसनाच्या परिणामांबद्दल विचार करायला प्रवृत्त केले. त्यांनी रोहन नामक मुलाचा सत्य घटनेवर आधारित उदाहरणाद्वारे व्यसनामुळे होणारा मानसिक, सामाजिक आणि आर्थिक ऱ्हास स्पष्ट केला.

मान्यवरांचे मनोगत : तुषारजी दामगुडे यांनी आपल्या वडिलांच्या दारूच्या व्यसनातून मुक्त झालेल्या प्रेरणादायी प्रवासाची कथा सांगत आत्मनियंत्रणाचा संदेश दिला. सद्यस्थितीत समाजामध्ये अमली पदार्थांचे सेवन वाढत चालले आहे, आणि विशेषतः मुलींच्या संख्येतही याचे प्रमाण वाढताना दिसत आहे. या पदार्थांचा वापर केल्यास शरीरातून कोणताही विशिष्ट वास येत नाही, त्यामुळे कुटुंबातील सदस्यांनाही याची कल्पना होत नाही. याच कारणामुळे या व्यसनाचे प्रमाण अधिक वेगाने वाढत आहे.

ही अत्यंत गंभीर बाब असून, तरुण पिढी आपल्या करिअर आणि आरोग्याची वाट स्वतःच बंद करून घेत आहे. समाज आणि पालकवर्गाने याबाबत जागरूक राहून आपल्या मुलांकडे लक्ष देणे आणि त्यांना योग्य मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. त्यांनी युवकांना Cool दिसण्यासाठी व्यसनाकडे वळू नये, असे आवाहन केले. तसेच त्यांनी बजरंग दलाने असे कार्यक्रम वारंवार घेऊन विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करावी असे सुचविले.

श्री. किशोर चव्हाण यांनी पंजाबमधील व्यसनग्रस्त युवकांचे उदाहरण देत व्यसनविरोधी मोहिमेचे गांभीर्य स्पष्ट केले. समाजातील गुन्हेगारी व शोकांतिका टाळण्यासाठी अशा जनजागृतीची गरज त्यांनी अधोरेखित केली. देशातील ६५ टक्क्यांहून अधिक लोकसंख्या ही ३५ वर्षांखालील आहे. या तरुण शक्तीचा विधायक उपयोग झाल्यास देश जगात महासत्ता बनेल. परंतु काही विध्वंसक शक्ती तरुणांना व्यसनाकडे वळविण्याचा प्रयत्न करत आहेत. या 'व्यसनाधीनतेच्या दहशतवादाविरुद्ध'तरुणांनी स्वतःहून लढा द्यावा, असे सांगितले. त्याचबरोबर पुण्याच्या पूर्व भागामध्ये काही घरांमध्ये अशी परिस्थिती दिसून येते की, काही पुरुष पगार झाल्यानंतर नशेच्या आहारी जातात आणि सलग आठ-आठ दिवस घरी येत नाहीत. त्यांच्या या व्यसनाधीन वागण्यामुळे संपूर्ण कुटुंबावर मानसिक, आर्थिक आणि सामाजिक ताण निर्माण होतो.

घरातील स्त्रिया असुरक्षिततेत दिवस काढतात, मुलांमध्ये भीती आणि अस्वस्थता निर्माण होते, तर वृद्ध पालक असहाय होतात. एक व्यक्ती नशेच्या आहारी गेल्याने केवळ त्याचे नव्हे तर संपूर्ण कुटुंबाचे जीवन विस्कळीत होते. त्यामुळे समाजातील प्रत्येक व्यक्तीने या समस्येकडे गांभीर्याने पाहणे आणि नशामुक्त जीवनाचा संकल्प करणे अत्यावश्यक आहे हे अधोरेखित केले. कर्नल डॉ. विपुल पाटील यांनी युवकांना सकारात्मक सहवास आणि योग्य मित्रपरिवाराची निवड करण्याचे महत्त्व पटवून देत असताना त्यांनी एक उदाहरण दिले. कृष्णासारखी मैत्री करावी, कर्णासारखी नको. महाभारतातील कर्ण आणि श्रीकृष्ण - दोघेही अत्यंत बुद्धिमान, सामर्थ्यवान आणि निष्ठावान होते. पण त्यांच्या मैत्रीतील दृष्टिकोनात मोठा फरक होता.

कर्णाने दुर्योधनाशी मैत्री केली - ती त्याच्या उपकाराच्या भावनेतून, पण अंधनिष्ठेने. त्याला माहीत होतं की दुर्योधन अन्यायाच्या मार्गावर आहे, तरीही त्याने त्याला साथ दिली. परिणामतः कर्णाचं सामर्थ्य, ज्ञान, आणि कीर्ती सगळं नष्ट झालं.

तर दुसरीकडे, कृष्णाची मैत्री अर्जुनाशी होती. पण ती धर्मासाठी, न्यायासाठी आणि सत्यासाठी. कृष्णाने कधीही अर्जुनाला चुकीच्या मार्गावर जाण्यास प्रोत्साहन दिलं नाही. उलट, त्याला योग्य मार्ग दाखवला, त्याच्या निर्णयांमध्ये विवेक दिला, आणि संकटकाळात नैतिक आधार बनला. मैत्री फक्त निष्ठेवर नव्हे, तर सत्य आणि योग्यतेवर आधारित असावी. अंधनिष्ठ मैत्री नाशाकडे नेते, पण समजूतदार मैत्री विकासाकडे असे सांगितले.

प्रमुख वक्ते - DIG प्रवीणकुमार पाटील सर यांनी विद्यार्थ्यांना आपले आयुष्य जगत असताना अन्न, वस्त्र, निवारा ह्याच महत्त्वाचा गोष्टी आहेत, नशा ही आपल्या गरजेची नसून त्याचा आहारी जाऊ नये अशा आशयाने भाषणाची सुरुवात केली.

आजचा तरुण हा राष्ट्राच्या प्रगतीचा पाया आहे. त्याच्यातील ऊर्जा, कल्पकता आणि चिकाटी देशाचे भवितव्य घडवू शकते. मात्र, या शक्तीचा योग्य उपयोग झाला पाहिजे, हे समजणे गरजेचे आहे. तरुणाईने व्यसनाच्या जाळ्यात अडकू न देता राष्ट्रनिर्मितीसाठी स्वतःला झोकून दिले पाहिजे. या जनजागृती कार्यक्रमात उपमहानिरीक्षक प्रविणकुमार पाटील यांनी तरुणांना नशेमुक्त जीवनाचा संकल्प करण्याचे आवाहन केले. या वेळी विद्यार्थ्यांनी एकमुखाने व्यसनमुक्तीची शपथ घेतली. पाटील म्हणाले की, तरुणाई ही देशाच्या विकासाची खरी ताकद आहे. मात्र, नशा, व्यसन आणि वाईट सवयीमुळे अनेक तरुण दिशाहीन होत आहेत. आपण व्यसनमुक्त राहिलो, समाजकार्यात सहभागी झालो, तरच सक्षम भारताची निर्मिती शक्य आहे. त्यांनी सांगितले की NCB (नारकोटिक्स कंट्रोल ब्युरो) केवळ पुरवठा साखळी तोडण्याचेच नव्हे, तर समाजात जागरूकता निर्माण करण्याचेही कार्य करते. जर युवकांनी व्यसनाला नकार दिला, तर देशातील मागणी संपेल, आणि पुरवठा आपोआप थांबेल, असे त्यांनी ठामपणे सांगितले. बजरंग दलाने 'नशामुक्त भारत' या कार्यक्रमाचे आयोजन करून, २०४७ पर्यंत नशामुक्त भारत घडविण्याच्या भारत सरकारच्या उद्दिष्टपूर्तीकडे एक मोलाचे पाऊल टाकले असल्याचा उल्लेख त्यांनी आपल्या भाषणात केला व बजरंग दलाला ह्यापुढेही असे कार्यक्रम करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांनी नशामुक्त भारताची शपथ घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन कु. श्रुत येवले यांनी केले. तसेच आभार प्रदर्शन कु. विवेक गिरी यांनी केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. या प्रसंगी बजरंग दल प्रांत सह संयोजक श्री. संदेश भेगडे, पश्चिम पुणे विभाग सहमंत्री, श्री. अतुल सराफ या कार्यक्रमाचे आयोजन, छत्रपती संभाजी महाराज भाग, विशेष संपर्क प्रमुख, कु. विवेक गिरी, कोषाध्यक्ष श्री. ओंकार बोत्रे,संयोजक श्री. दत्तात्रय तोंडे, प्रखंड सह संयोजक श्री. नयन पवळे साप्ताहिक मिलन प्रमुख अथर्व देपोलकर, मठमंदिर संपर्क प्रमुख विठ्ठल चव्हाण, बजरंगी प्रवीण उभे व कोथरूड प्रखंडातील इतर कार्यकर्त्यांनी केले होते.

विश्व हिंदू परिषद बजरंग दल कोथरूड प्रखंड
छत्रपती संभाजी महाराज भाग, पुणे महानगर
वृत्तांकन: विवेक राजेंद्र गिरी, विशेष संपर्क प्रमुख
छत्रपती संभाजी महाराज भाग,पुणे महानगर




## हुतात्मा कोठारी बंधूंना रक्तदानाने अभिवादन - बजरंग दल इचलकरंजी

हुतात्मा कोठारी बंधू यांना १७२ रक्तदात्यांनी बलिदानाला स्मरून रक्तदान केले. श्री राम मंदिर निर्मितीत सर्वोच्च बलिदान दिलेल्या श्री.कोठारी बंधू यांच्या सन्मानार्थ विश्व हिंदू परिषद बजरंग दल तर्फे रक्तदान शिबिराचे आयोजन व्यंकटराव हायस्कूल येथे केले होते. रक्तदान शिबिर १७२ रक्तदात्यांनी रक्तदान केले.. रक्तदान शिबिराचे उद्घाटन तसेच श्रीराम पंचायत व भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन केले. रक्तदान शिबिरास पूज्य. प्राणलिंगेश्वर स्वामीजी,बजरंग दल पश्चिम महाराष्ट्र प्रांत संयोजक श्री नितीनजी महाजन, दुर्गा वहिनी प्रांत सहसंयोजिक सौ गायत्री देशपांडे कुंभार, विभाग मंत्री श्री शिवजी व्यास, जिल्हामंत्री श्री सुजितजी कांबळे,व्यंकटराव हायस्कूलचे अध्यक्ष श्री कौशिकराव मराठे, सहमंत्री प्रवीण सामंत,दुर्गा वाहिनी संयोजिका कु. राजलक्ष्मी आमणे,श्री सोमेश्वरदादा वाघमोडे,श्री बाळासाहेब ओझा व अन्य सामाजिक व बजरंगी उपस्थित होते.

उपस्थित नागरिकांना संबोधित करताना श्री नितीनजी महाजन यांनी श्री कोठारी बंधूंनी दिलेले बलिदान हे समस्त हिंदू समाजासाठी होते. रक्तदात्यांना धर्मवीर संभाजी महाराज यांची मूर्ती प्रदान केली.. सदर शिबिरा वेळी नागरिकांची मोफत नेत्र तपासणीही करण्यात आली. रक्तदान शिबिरासाठी श्री व्यंकटराव हायस्कूल इचलकरंजी व संजीवन बँक यांचे विशेष सहकार्य लाभले. रक्तदान शिबिर यशस्वीतेसाठी सर्व बजरंगींनी, विजेता ग्रुप व हिंदू शिकलगार समाज यांनी विशेष प्रयत्न केले. समाजाला गरज लागल्यास भविष्यातही अश्या रक्तदान शिबिराची आवश्यक आयोजन करू असे बजरंग दल इचलकरंजीतर्फे विश्वास प्रसंगी व्यक्त करण्यात आला..



## हुतात्मा कोठारी बंधूंच्या स्मरणार्थ भव्य रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद!

हुतात्मा श्री रामकुमार कोठारी आणि श्री शरदकुमार कोठारी बंधूंनी श्री राम मंदिराच्या निर्माणासाठी दिलेल्या सर्वोच्च बलिदानाच्या स्मरणार्थ छत्रपती संभाजी महाराज भाग पुणे येथील सात प्रखंड पैकी तीन प्रखंडात म्हणजेच उत्तमनगर कर्वे नगर कोथरूड या प्रखंडात भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले.

प्रत्येक रक्तदात्याने आपल्या या अमूल्य रक्तदानेद्वारे देश, धर्म आणि समाजाप्रती आपले कर्तव्य पार पाडत हुतात्मा कोठारी बंधूंच्या स्मृतीला अभिवादन केले.

हे रक्तदान शिबिर केवळ एक सामाजिक उपक्रम नव्हे, तर श्रद्धा, राष्ट्रभक्ती आणि समाजसेवेचे प्रतीक ठरले.

हुतात्मा कोठारी बंधूंच्या बलिदानातून प्रेरणा घेत, अशा उपक्रमांद्वारे समाजात एकतेचा आणि सेवेचा संदेश पोहोचविण्याचे कार्य बजरंग दल सातत्याने करत आहे.

आपणही या कार्यात सहभागी व्हावे.

उत्तमनगर प्रखंड – १०७

कर्वेनगर प्रखंड – ३९

कोथरूड प्रखंड – ४३

०५ नोव्हेंबर २०२५ पर्यंत भागातील एकूण रक्तदान – १८९

रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी प्रखंड आणि जिल्हा समितीतील कार्यकर्त्यांनी खूप चांगल्या पद्धतीने काम केले याबद्दल धन्यवाद...!

आपले नम्र

विश्व हिंदू परिषद, बजरंग दल

छत्रपती संभाजी महाराज भाग



# नशामुक्त भारत ही काळाची गरज! ॲड. सतिश गोरडे

पिंपरी (दिनांक : २६ ऑक्टोबर २०२५) 'जागतिक स्तरावर वेगाने विकसित होणारी अर्थव्यवस्था आणि विश्वगुरू म्हणून भारताला मान्यता मिळत असताना नशामुक्त भारत ही ओळख प्रस्थापित होणे ही काळाची गरज आहे!' असे विचार ज्येष्ठ विधिज्ञ आणि विश्व हिंदू परिषद प्रांत सह मंत्री ॲड. सतिश गोरडे यांनी इंटेलिजन्स कॅडेट इंटरनॅशनल स्कूल, पेठ क्रमांक ३, इंद्रायणीनगर, भोसरी येथे रविवार, दिनांक २६ ऑक्टोबर २०२५ रोजी व्यक्त केले. विश्व हिंदू परिषद पिंपरी – चिंचवड जिल्हा आणि बजरंग दल आयोजित दोन दिवसीय अभ्यास वर्गाच्या समारोपप्रसंगी ड. सतिश गोरडे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर बजरंग दल प्रांत सह संयोजक संदेश भेगडे, प्रांत सुरक्षा प्रमुख सुशांत गाडे, विभाग संयोजक नाना सांवत, जिल्हा संयोजक अरविंद लंघे, जिल्हा सहसंयोजक पन्नालाल जाधव आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

ॲड. सतिश गोरडे पुढे म्हणाले की, 'जागतिक स्तरावर भारत अतिशय वेगाने आर्थिक प्रगतीसह सर्वच क्षेत्रांत मानाचे अन् आदराचे स्थान प्राप्त करीत असताना शत्रुराष्ट्रे अंमली आणि मादक पदार्थांच्या माध्यमातून आपल्या देशातील तरुणाईला निष्प्रभ करणाचे षडयंत्र सातत्याने राबवत आहे. मादक आणि अंमली पदार्थांचे व्यसन हे फक्त उच्चभ्रू सोसायटीत आहे, असा आपला सर्वांचा आतापर्यंत गैरसमज होता; परंतु उच्च माध्यमिक आणि महाविद्यालयीन तरुणाई ही मादक आणि अंमली पदार्थांच्या विळख्यात सापडलेली आहे, असे अनेक उदाहरणांवरून स्पष्ट झाले आहे. मध्यमवर्गीय आईवडील नोकरीनिमित्त दिवसभर घराबाहेर असतात; आणि याचा गैरफायदा घेऊन त्या घरातील किशोरवयीन मुलामुलींना वेगवेगळी प्रलोभने दाखवली जातात. त्यामुळे ही मुले आईवडिलांच्या नकळत अंमली पदार्थांची वाहतूक करणे, सेवन करणे किंवा साठा करणे अशा अपप्रवृत्तींना बळी पडतात. पोलिसांच्या कारवाईत जेव्हा या गोष्टी उघड होतात, तेव्हा आईवडिलांना प्रचंड मोठा मानसिक धक्का बसतो. वास्तविक भारतीय राज्यघटनेतील ४७–अ या कलमानुसार मादक पदार्थांचा साठा करणे, विक्री करणे, वाहतूक करणे आणि त्यासंदर्भातील पूरक कामे हा गुन्हा मानला जातो. त्यामुळे संवेदनशील अशा तरुणाईला या विळख्यातून दूर ठेवण्यासाठी प्रबोधनाची गरज आहे. दिवाळी पाडव्यापासून हिंदू संस्कृतीचे नवीन वर्ष सुरू होते. या नववर्षाचे औचित्य साधून बजरंग दलाने व्यापक प्रमाणावर 'नशामुक्त भारत' हा उपक्रम राबवावा. या उपक्रमांतर्गत पुणे आणि पिंपरी–चिंचवड पोलीस आयुक्तालयातंर्गत सर्व पोलीस स्थानकात याबाबत निवेदन देण्यात यावे. त्यानंतर सातत्याने या उपक्रमाचा पाठपुरावा करण्यात यावा!' असे आवाहन त्यांनी केले.

दोन दिवसीय अभ्यास वर्गात जिल्हा मंत्री धनंजय गावडे, सह मंत्री किरण शिंदे, सह मंत्री संभाजी बालघरे, भास्कर भगत, चैतन्य सुडे यांनी देखील मार्गदर्शन केले. पिंपरी–चिंचवड जिल्ह्यातील ११ प्रखंडातील बजरंगदलाचे पदाधिकारी या अभ्यासवर्गात सहभागी झाले होते. वर्गाचे संयोजन प्रवीण शेटे,अभिजीत चव्हाण,ऋषी चावरे, गौरव शिंदे यांनी केले.



आज बुधवार दिनांक ५ नोव्हेंबर २०२५ रोजी, धन धन साहेब श्री गुरुनानक देव जी महाराज जी का ५५६ वा प्रकाश पूरब उत्सव

श्री गुरुनानक यांची जयंती निमित्त हडपसर येथील, गुरुद्वारा गुरुतेकबहाद्दर साहेब जी येथे उपस्थित राहून आपल्या सिख बांधवांना शुभेच्छा दिल्या. सायंकाळी ५ ते ७ या वेळेत उपस्थित राहून कार्यक्रमात सहभाग नोंदविला.

यावेळी शहीद भगतसिंग ट्रस्ट व गुरुद्वारा यांच्या वतीने ट्रस्टचे अध्यक्ष बच्चू सिंग टाक यांच्या शुभहस्ते सर्व मान्यवर पदाधिकारी यांचा सन्मान करण्यात आला.



केंद्रीय सहमंत्री मा. गोविंद शेंडे यांचा आपल्या प्रांतातील शिक्षण क्षेत्रातील कर्तबगार व्यक्तींना भेटण्याच्या उद्देशाने श्री गोविंदजी यांनी पुणे शहरातील माजी आमदार श्री दिपकभाऊ पायगुडे यांची सदिच्छा भेट घेतली. त्यांना कथारूप रामायण व हिंदूबोध मासिक देण्यात आले. सदर प्रसंगी प्रांत मंत्री श्री किशोर चव्हाण, प्रांत नैतिक मूल्य शिक्षण आयाम प्रमुख श्री आप्पा कुलकर्णी, बजरंग दल हडपसर जिल्हा संयोजक श्री विक्रम घुंगुरवाले उपस्थित होते. श्री गोविंदजी शेंडे यांनी नैतिक मूल्य शिक्षण योजनेची माहिती देण्यात आली. श्री दिपकभाऊ यांनी त्यांचा नगरसेवक, आमदार ते शिक्षण संस्था चालक प्रवास उलगडून कथन केला. राजकीय कारकिर्द सोडून शिक्षण क्षेत्रात त्यांनी उंच भरारी घेतली आहे. त्यांनी अनेक शैक्षणिक संस्थाची मोठ्या कष्टाने उभारणी केली आहे. सरकारचे अनुदान मिळून सुद्धा त्यांनी ते नाकारले. फुलगाव येथील सैनिकी शाळा, तेथील लोकसेवा स्कूल सुस, पाषाण येथील लोकसेवा इ लर्निंग स्कूल अशा विविध शाळांमधून सुमारे ४००० विद्यार्थी आज शिक्षण घेत आहेत. त्यांच्या सुस येथील शाळेचे उद्घाटन पू. मोहनजी भागवत यांच्या शुभ हस्ते झाले आहे. आपल्या बजरंग दलाच्या प्रांत शौर्य प्रशिक्षण वर्गाला त्यांनी सैनिकी शाळा उपलब्ध करून अनेक सुविधा पुरविल्या होत्या. महात्मा फुले जयंती दिनी समता भूमी, गंज पेठ येथील त्यांच्या वाड्यावर गेली तीन वर्षे मोठ्या प्रमाणावर एकता मिसळीचे आयोजन करण्यात येते. त्याचप्रमाणे डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती दिनी सुद्धा पुणे स्टेशन येथील स्मारकाजवळ, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे सारसबाग स्मारक जवळ एकता मिसळ उपक्रम राबविण्यात येतो.तिन्ही ठिकाणी सुमारे ५०००० नागरिक सहभागी होतात आणि मिसळीचा स्वाद घेतात. त्यासाठी नागपूरचे शेफ श्री विष्णू मनोहर यांचे सहकार्य लाभते. हे सर्व करत असताना त्यांनी आपल्या नावाची जाहिरात कधीच केली नाही! हे विशेष!

आपला नैतिक मूल्य शिक्षण उपक्रम राबविण्यास त्यांनी लगेच सहमती दर्शवली तसेच त्यांनी कथारूप रामायण बरोबर महाभारत, राष्ट्र पुरुष यांचे चरित्र इत्यादी सुद्धा ही ह्याच वर्षी राबविण्याची तयारी दर्शवली. श्री पायगुडे यांनी उपस्थित सर्वांचा मनोभावे सत्कार केला.



## हडपसर जिल्हा

नैतिक मूल्य शिक्षण योजना २०२५-२६ च्या अंतर्गत आज मंगळवार दि. ११ नोव्हेंबर २०२५ रोजी, लोणी काळभोर येथील एमआयटी शैक्षणिक संकुल येथे आदरणीय मंगेश (बापू) कराड यांची सदिच्छा भेट घेतली व नैतिक शिक्षा प्रतिष्ठान याबाबत केंद्रीय सहमंत्री व नैतिक शिक्षा प्रतिष्ठानचे प्रमुख माननीय गोविंदजी शेंडे सविस्तर माहिती दिली. यावेळी बोलत असताना माननीय गोविंदजी यांनी सांगितले की, नैतिक शिक्षा प्रतिष्ठान एक सामाजिक संस्था असून नैतिक शिक्षणाचे प्रचार व प्रसाराचे कार्य करीत आहे. शाळांच्या सहकार्याने संस्कारक्षम कथांच्याद्वारे विद्यार्थ्यांमध्ये जीवनमूल्य रुजवण्या करिता, प्रतिष्ठान प्रयत्न करीत आहे. शालेय विद्यार्थ्यांना आपल्या संस्कृतीची आणि गौरवशाली इतिहासाची माहिती व्हावी. या हेतूने नैतिक मूल्य शिक्षण योजना सुरू करण्यात आली आहे. आपल्या शैक्षणिक संकुलातील विद्यार्थ्यांचा या उपक्रमात सहभाग व्हावा. अशी अपेक्षा व्यक्त केली. या उपक्रमात सहभागी होणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला प्रतिष्ठान मार्फत एक कथा रुपी पुस्तक देण्यात येणार आहे.शाळेतील विद्यार्थ्यांना पुस्तकातील एक कथा आठवड्यातून एक दिवस शिक्षकांनी सांगावी अशी अपेक्षा आहे. सहभागी विद्यार्थ्यांची लेखी परीक्षा जानेवारी महिन्यात आपल्या घेण्यात येईल. त्याचबरोबर उत्तम गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रक देण्याचाही मानस आहे. असे यावेळी सांगण्यात आले व शाळेचा आणि शिक्षकांचा विशेष गौरव करण्यात येणार आहे. आपणही हा उपक्रम आपल्या शैक्षणिक संकुलात राबवावा अशी विनंती केली. त्याचबरोबर आदरणीय मंगेश बापूंनी क्षणाचाही विलंब न लावता या कार्यास शुभेच्छा दिल्या व सदर उपक्रम या ठिकाणी सुरू करू याबाबत अश्वस्त केले. यावेळी, नैतिक शिक्षा प्रतिष्ठानचे पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे प्रमुख श्री. नंदकिशोर (आप्पा) कुलकर्णी, हडपसर जिल्हा अध्यक्ष, श्री. नंदकिशोर (काका) काळभोर, हडपसर जिल्हा मंत्री, श्री. राजेंद्र शेवाळे, जिल्हा सहमंत्री, श्री.शशिकांत घाटे, सातववाडी प्रखंड मंत्री, श्री.राहुल मोडक, छत्रपती संभाजी महाराज प्रखंड अध्यक्ष श्री.जयेश पाटील यावेळी उपस्थित होते.

**श्री. राजेंद्र शेवाळे, मंत्री हडपसर जिल्हा.**




# रामदूत हनुमान आदर्श कार्यकर्ता! ॲड. सतिश गोरडे

'रामदूत हनुमान म्हणजे आदर्श कार्यकर्ता होय!' असे प्रतिपादन ज्येष्ठ विधिज्ञ आणि विश्व हिंदू परिषद पश्चिम महाराष्ट्र प्रांत सहमंत्री ॲड. सतिश गोरडे यांनी वनवासी विद्यार्थी वसतिगृह, राजगुरूनगर येथे रविवार, २ नोव्हेंबर २०२५ रोजी केले. बजरंग दल भीमाशंकर जिल्हा आयोजित दोन दिवसीय अभ्यासवर्गात कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. याप्रसंगी केन्दीय सह मंत्री तथा अखिल भारतीय सत्संग सह प्रमुख मा. दादाजी वेदक, प्रांत मंत्री किशोर चव्हाण, प्रांत सहमंत्री नितीन वाटकर, प्रांत सहसंयोजक संदेश भेगडे, भास्कर भगत, विभाग संयोजक आविष्कार सावंत, संजय गोडबोले, अवधूत चौधरी आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

ॲड. सतिश गोरडे पुढे म्हणाले की, ज्याप्रमाणे प्रचंड ताकद असूनही महाबली हनुमान यांनी प्रभू रामचंद्र यांच्या पायाशी निष्ठा अर्पण करून त्यांच्या पाठीशी आपले संपूर्ण बळ उभे केले; त्याप्रमाणेच अठरापगड जातीतील मावळ्यांनी छत्रपती शिवाजीमहाराज यांच्या पाठीशी आपले सर्वस्व अर्पण करून हिंदवी स्वराज्यासाठी आपले बळ उभे केले म्हणूनच समर्थ रामदासस्वामी यांनी 'शिवरायांचे आठवावे रूप! शिवरायांचा आठवावा प्रताप भूमंडळी!' असे वर्णन केले आहे. 'हिंदुराष्ट्र आणि हिंदुधर्म यांच्या प्रचाराचे काम करताना बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी बजरंगबली हनुमान आणि वीर मावळे यांचा आदर्श घ्यावा!' असे आवाहन त्यांनी केले. दोन दिवसीय अभ्यासवर्गात नितीन वाटकर यांनी 'देशाची वर्तमान स्थिती आणि हिंदू समाजापुढील आव्हाने', संदेश भेगडे यांनी 'बजरंग दलाचे महत्त्व', भास्कर भगत यांनी 'बलोपासना केंद्राचे महत्त्व' या विषयांवर मार्गदर्शन केले. अभ्यासवर्गाच्या समारोपप्रसंगी किशोर चव्हाण यांनी 'नशामुक्त युवा अर्थात सशक्त भारत' या विषयावर मार्गदर्शन केले. शेवटी केन्दीय सह मंत्री मा दादा वेदक यांनी सत्संग व्दारे आशिर्वचन दिले.

जिल्हा मंत्री गणेश रौंधळ, जिल्हा संयोजक अवधूत चौधरी, मनोज देशमुख, सुमित शिनगारे, प्रशांत खैरे, अजिंक्य तारू, अमोल ढमरे यांनी संयोजन केले.




# संघ ही सर्व सेवाभावी संस्थांची मातृसंस्था! दादा वेदक

पिंपरी (दिनांक : १० नोव्हेंबर २०२५) मराष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही देशप्रेमाने भारावून कार्यरत असलेल्या सर्व सेवाभावी संस्थांची मातृसंस्था आहे!' असे प्रतिपादन विश्व हिंदू परिषद केंद्रीय सह मंत्री तथा अखिल भारतीय सह सत्संग प्रमुख महेंद्र तथा दादा वेदक यांनी पांजरपोळ, भोसरी येथे रविवार, दिनांक ०९ नोव्हेंबर २०२५ रोजी केले. पुणे ग्रामीण विभागातील विश्व हिंदू परिषदेच्या चार जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकारी वर्गातील कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना दादा वेदक बोलत होते. याप्रसंगी विश्व हिंदू परिषद पश्चिम महाराष्ट्र प्रांत मंत्री किशोर चव्हाण, प्रांत सहमंत्री आणि ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. सतिश गोरडे, प्रांत सहमंत्री नितीन वाटकर, विभाग मंत्री सोमनाथ दाभाडे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

दादा वेदक पुढे म्हणाले की, 'डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी समर्पित भावनेने शंभर वर्षांपूर्वी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली. देशभरात राष्ट्रभावनेने प्रेरित होऊन असंख्य कार्यकर्ते देशाच्या उन्नतीसाठी वेगवेगळ्या सेवाभावी संस्थांमधून आपले आयुष्य वेचित आहेत. मानमरातब, नावलौकिक, प्रसिद्धी, संपत्ती, सत्ता अशा कोणत्याही प्रकारच्या प्रलोभनांपासून हे कार्यकर्ते अलिप्त राहून देशसेवा करीत आहेत. जरी संस्था वेगवेगळ्या नावाने अस्तित्वात असल्यातरी यामधील कार्यकर्ते एकविचाराने परस्परपूरक भावनेतून निःस्पृह, निःस्वार्थपणे काम करीत आहेत अन् हीच राष्ट्रीय स्वयंसेवक संघांची खरी शक्ती आहे! वेदक यांनी आपल्या वक्तव्यातून डॉ. हेडगेवार यांचा प्रेरणादायी जीवनपट कार्यकर्त्यांपुढे साकार केला. यावेळी किशोर चव्हाण, नितीन वाटकर, संतोष खामकर, नितीन महाजन, ॲड. मृणालिनी पडवळ, संजय गोडबोले, दयानंद शिंदे, अप्पा कुलकर्णी यांनी देखील मनोगत व्यक्त केले. सोमनाथ दाभाडे यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाच्या संयोजनात विश्व हिंदू परिषद जिल्हा मंत्री धनंजय गावडे, अध्यक्ष ॲड. ललित झुनझुनवाला, नवनाथ साकोरे, नाना सांवत, संभाजी बालघरे, किरण शिंदे, अरविंद लंघे यांनी सहकार्य केले.

# सेवाकुंभ २०२५ अमृताचा कुंभ

विश्व हिंदू परिषद पश्चिम महाराष्ट्र प्रांत संचलित सेवा विभागाचे वतीने दि. १५ व १६ नोव्हेंबर रोजी रमणबाग प्रशाला पुणे येथे सेवाकुंभ आयोजित करण्यात आला त्यांची तयारी मागील २ महिन्यांपासून सेवा प्रांत टिम याव्दारे करण्यात येत होती यांची संपूर्ण माहिती देणारा लेख.



दि १५ नोव्हेंबर रोजी पश्चिम महाराष्ट्र प्रांतातील जनजाती क्षेत्रातील विद्यार्थ्यांसाठी चालविली जाणारी वसतीगृहातील मुले सांय ४ सुमारास आगमनाने सेवा कुंभाची सुरुवात झाली. यात मुलांचे वसतिगृह घोटी (नाशिक) मुलींचे वसतीगृह हरसुल (नाशिक) मखमलाबाद स्नेहवर्धिनी मुलींचे वसतीगृह व शेवगाव मुलांचे वसतिगृह यातील दोनशे पेक्षा अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते. रात्री सात वाजता भजनसंध्या मध्ये मुलांनी भजने, गीते यात सहभाग टाळ मृदंग सह न्हाऊन आनंद घेतला रात्री भोजन होऊन निवास केला.

दि १६ नोव्हेंबर ला सेवा कुंभ अंतर्गत सर्व वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी 'मामाची सफर' (पुणे मेट्रो प्रवास) हा उपक्रम राबविण्यात आला.

यामध्ये सर्वांना छत्रपती संभाजी महाराज स्थानक (बालगंधर्व रंगमंदिर) ते वनाज कंपनी व परत असा प्रवास घडविण्यात आला. सर्वांनी जय श्रीराम घोषणा देऊन मेट्रो परिसर दणाणून सोडला. प्रत्येक जण आपल्या मोबाईल कॅमेऱ्यामध्ये हा आनंदाचा क्षण टिपत होते. अतिशय उत्साहात हा कार्यक्रम पार पडला. पहिल्यांदा सरकत्या जिन्यावर चढताना काही जणांची तारांबळ उडाली. पण तेथील सुरक्षा रक्षकांनी व्यवस्थित मार्गदर्शन करून सहकार्य केले. सर्वांना महामेट्रो हा राज्य सरकारचा उपक्रम का आणि कसा चालविला जातो याची इत्यंभूत माहिती श्री. डी. बी. माने साहेब यांनी दिली.

सर्व मेट्रो स्टाफचे या कामी बहुमोल सहकार्य लाभले यामध्ये श्री. शुभम दळवी, श्री. माझीरे, श्री. वरुण माने यांचा प्रामुख्याने उल्लेख करता येईल. हा सर्व उपक्रम पुण्यनगरीचे खासदार व केंद्रीय राज्यमंत्री मा. मुरली अण्णा मोहोळ यांच्या सौजन्याने तसेच पुणे महामेट्रोचे श्री. सुजित कानडे साहेब यांच्या विशेष सहकार्याने पार पडला. मेट्रो प्रवासाचे नियोजन प्रांत विशेष संपर्क प्रमुख श्री. श्रीकांत चिल्लाळ व त्यांच्या सहकाऱ्यांनी उत्कृष्ट केले. मा. किशोर चव्हाण प्रांत मंत्री यांनी मुलांशी संवाद साधला.

**सेवा कुंभ २०२५ औपचारिक उद्घाटन समारंभ संपन्न**

दि. १६ नोव्हेंबर सकाळी ११ वा मुख्य सभागृहात सर्व वसतिगृहातील विद्यार्थी व सेवा विभागातील सर्व कार्यकर्ते यांच्या उपस्थितीत कार्यक्रम आयोजित करण्यात आला. अध्यक्षस्थानी केन्दीय सह मंत्री मा. स्वपनदा मुखर्जी होते. प्रमुख वक्ते मुंबई क्षेत्र सह मंत्री प्राचार्य अनंत पांडे, प्रांत उपाध्यक्षा सौ. माधवीताई सौंशी, प्रांत मंत्री मा. किशोर चव्हाण, सहमंत्री ॲड. सतिश गोरडे, सहमंत्री नितीन वाटकर व सेवा प्रमुख ॲड. शाम घरोटे व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी प्रास्ताविकात मा. किशोर चव्हाण यांनी दर पाच वर्षांनी प्रांतांत आयोजन होत असलेल्या सेवाकुंभा बद्दल माहिती देवून सर्वांचे स्वागत करत या सेवा कुंभातून आपण प्रेरणा घेऊन पुढील वाटचाल करावी असे आवाहन केले. त्यानतंर प्रा. अनंत पांडे मुख्य भाषणात सेवाकुंभ म्हणजे अमृताचा कुंभ विश्व हिंदू परिषद संचलित सेवा कार्याच्या विविध प्रकल्पांच्या माध्यमातून सेवा कुंभाचे आयोजन केले जाते. या सेवा कुंभ माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन

दिले जाते. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना सेवेची एक नवी दृष्टी दिली जाते. केवळ या वसतिगृहात प्रकल्पावर राहणारे विद्यार्थी केवळ विद्यार्थी नसून ते राष्ट्राचे आधारस्तंभ आहेत त्यांनी या ठिकाणच्या विचारांचा वारसा सोबत घेऊन आयुष्यभर सेवेचे व्रत जपून हिंदुराष्ट्र बलशाली करावे. सेवा योग्य कुंड समिधा सम हम जले ध्येय महासागर में सरीत रूप हम मिले पद्धतीचे उदात्त जीवन या प्रकल्पाच्या माध्यमातून शिकविले जाते. ग्रामीण भागातून आलेले हे विद्यार्थी भविष्यात आदर्श शेतकरी व्यावसायिक, सैन्यातील अधिकारी, अभियंता, डॉक्टर, वकील बनतील व या भारतमातेची सेवा करतील व या भारतमातेला महासत्ता बनवण्यासाठी अविरत प्रयत्न करतील अशा पद्धतीचे प्रशिक्षण या वस्तीग्रहांमध्ये दिले जाते. विविध बोलीभाषांचे हे ग्रामीण विद्यार्थी एक स्वप्न उराशी बाळगून विश्व हिंदू परिषदेच्या वस्तीगृहात शिकतात. खरोखरच यांच्यातील आत्मविश्वास यांच्यातील खेळाडू वृत्ती यांच्यातील चिकाटी जिद्द ही कौतुकास्पद आहे. वंदे मातरमचे सार्थ शतशताब्दी वर्ष साजरे करत असताना या विद्यार्थ्यांच्या मनात देखील देशभक्तीचा जागर फुललेला आहे म्हणूनच या सर्व सेवा प्रकल्पातील विद्यार्थी म्हणजे समाजाचा आत्मा आहेत. या सर्व भावी बालचिमुकल्या गोपाळांना भावी आयुष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक मा. स्वपनदा मुखर्जी यांनी ध्रुवताराची गोष्ट सांगून मुलांनी सेवा भाव जागृत करण्याचे आवाहन केले. सूत्रसंचालन डॉ. शर्वरी यरगटटीकर यांनी केले.



सत्र २ मध्ये विश्व हिंदू परिषद संचालित प्रांतातील सेवा प्रांत संच व जिल्हा सेवा प्रमुख यांची बैठक आयोजित करण्यात आली यात केन्दीय सह सेवा प्रमुख मा स्वपनदा मुखर्जी यांनी मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी सेवा प्रांत संच रचना यात प्रांत सेवा प्रमुख, सह प्रमुख, निधी प्रमुख, महिला प्रमुख, वसतिगृह प्रतिनिधी, जनजाती प्रतिनिधी अशी ९–११ जणांचा संच करावा. संचाची मासिक नियमित तिसरा रविवार बैठक, प्रवास, अभ्यास वर्ग, जिल्हा संचाची पूर्तता नियुक्ती याबाबतीत मार्गदर्शन केले.

सत्र ३ मध्ये केन्दीय सह सेवा प्रमुख मा स्वपनदा मुखर्जी प्रांतातील सेवाप्रकल्प व वसतिगृहाचे विश्वस्त मंडळ यांचे सोबत बैठक घेऊन सेवा कार्याचा आढावा घेतला. नाशिक विभागातून मा हेरंब गोविलकर, किर्तीश जोशी, ॲड शाम घरोटे, सौ शालन गोसावी, सौ शिंदे ताई उपस्थित होते. वडगाव मावळ व तळेगाव मधून मा दिलीपराव देशपांडे, मा दिलीपराव पळशीकर, मा पतकी, मा. महेश दाबी आदि उपस्थित होते व शेवगाव येथील प्रकल्पातील मा विजय सोनवणे आदी उपस्थित होते. यावेळी नियमित व वेळेत ताळेबंद व हिशोब पूर्तता व धर्मादाय आयुक्त कार्यालयात चेंज रिपोर्ट व कायदेशीर पूर्तता बाबत माहिती घेवून मार्गदर्शन केले. यावेळी प्रा अनंत पांडे, प्रांत मंत्री किशोर चव्हाण, ॲड सतिश गोरडे आदि उपस्थित होते.

सेवा कुंभ मुख्य समारोप कार्यक्रम रमणबाग फरशीचे मैदानावर आयोजित करण्यात आला होता.

हिंदू समाजाच्या ह्रदयात सेवाभाव! – स्वपनकुमार मुखर्जी

दोन दिवसीय सेवाकुंभ २०२५ सोहळ्याला उत्तम प्रतिसाद

'हिंदू समाजाच्या ह्रदयात सेवाभाव असतो; कारण जन्मापासून कुटुंबात विविध सेवांचे संस्कार नकळत मुलांवर घडवले जातात!' असे विचार विश्व हिंदू परिषदेचे केंद्रीय सहमंत्री तथा केंद्रीय सहसेवा प्रमुख स्वपनकुमार मुखर्जी यांनी न्यू इंग्लिश स्कूल, रमणबाग, शनिवार पेठ, पुणे येथे रविवार, दिनांक १६ नोव्हेंबर २०२५ रोजी व्यक्त केले. विश्व हिंदू परिषद, पश्चिम महाराष्ट्र प्रांताच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या दोन दिवसीय सेवाकुंभ २०२५ या सोहळ्यातील समारोप सत्रात प्रमुख वक्ते म्हणून स्वपनकुमार मुखर्जी बोलत होते. ज्येष्ठ सिनेअभिनेते प्रवीण तरडे, विश्व हिंदू परिषद प्रांत उपाध्यक्षा माधवी सौंशी, प्रांत मंत्री किशोर चव्हाण, प्रांत सहमंत्री ॲड. सतिश गोरडे, कोषाध्यक्ष कृष्णकुमार चांडक, सेवाप्रमुख ॲड.

श्याम घरोटे, बांधकाम व्यावसायिक मदन ठोंबरे, नितीन जाधव, निषिद शहा, सौ वैशाली ठोंबरे व सौ अश्विनी शहा आदी मान्यवरांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

स्वपनकुमार मुखर्जी पुढे म्हणाले की, 'जगातील सुमारे ऐंशी देशात विश्व हिंदू परिषद ही सेवाभावी संघटना कार्यरत आहे. हिंदू समाज आणि संस्कृती सर्व जगात उन्नत व्हावी, सर्व जगाला ज्ञान देण्याचे काम हिंदूंनी करावे हे संघटनेचे उद्दिष्ट आहे. प्रयागराज येथे संपन्न झालेल्या महाकुंभ मेळाव्यात साठ कोटींहून अधिक भाविक एकत्र आले होते; आणि यापैकी एकही जण उपाशी राहिला नाही, हे हिंदू समाजाच्या सेवाभावाचे सर्वोत्तम उदाहरण आहे. आपल्याच दुर्लक्षामुळे धर्मांतरित झालेल्या दुर्गम भागातील हिंदू बांधवांना आपल्यात सामावून घेत त्या तळागाळातील हिंदू समाजापर्यंत हा सेवाभाव पोहचला पाहिजे. यासाठी तन, मन, धन अर्पण करून आपण विश्व हिंदू परिषदेच्या या सेवाकार्यात सामील व्हावे!' प्रवीण तरडे यांनी आपल्या मनोगतातून, 'वसुधैव कुटुंबकम्' हे तत्त्व हिंदुधर्म मानत असल्याने या धर्मात आपला जन्म झाला, हे आपले परमभाग्य आहे. त्यामुळेच हिंदुधर्माचे आचार, विचार, संस्कृती सर्वांपर्यंत पोहोचविणे हे आपले आद्यकर्तव्य आहे. त्यासाठी जातीपातीच्या भिंती पाडून एकत्र आले पाहिजे. प्रत्येक हिंदूची सुरक्षा ही आपली जबाबदारी आहे. 'जिथे धर्म तिथे जय!' हा विचार कायम लक्षात ठेवून आपण ज्या क्षेत्रात कार्यरत आहात, त्या क्षेत्रात हिंदुधर्मासाठी कार्यरत व्हा!' असे आवाहन केले.



श्रीराम, जानकी, लक्ष्मण आणि हनुमान यांचे पूजन करून कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. किशोर चव्हाण यांनी प्रास्ताविकातून दर पाच वर्षांतून वेगवेगळ्या प्रांतात सेवाकुंभाचे आयोजन केले जाते, अशी माहिती दिली. यानिमित्त मान्यवरांच्या हस्ते स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले; तसेच साहित्य, संस्कृती, कला, क्रीडा यामध्ये नैपुण्य प्राप्त केलेल्या विविध वसतिगृहातील विद्यार्थ्यांना गौरवचिन्ह प्रदान करून सन्मानित करण्यात आले. पश्चिम महाराष्ट्रातील नाशिक, पुणे, कोल्हापूर, सोलापूर आणि अहिल्यानगर या विभागांतून सेवाकुंभात सहभागी झालेल्या प्रकल्पातील आणि वसतिगृहातील जनजातीय मुलामुलींनी बनवलेल्या विविध वस्तूंचे प्रदर्शन (स्टॉल) कार्यक्रमस्थळी भरविण्यात आले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्नेहा पाटील आणि डॉ. शर्वरी यरगट्टीकर यांनी केले. संयोजन दिलीप देशपांडे, प्रशांत कुलकर्णी, दिनेश लाड, विजय देशपांडे, किर्तीश जोशी, ज्ञानेश्वर इंगळे, संजय गोडबोले व पुणे महानगरातील ९ जिल्हातील पदाधिकारी इ यांनी केले. कार्यक्रमानंतर सहभागी जनजातीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कलांच्या सादरीकरणातून उपस्थितांचे मनोरंजन आणि प्रबोधन केले.

यावेळी सेवाप्रकल्पात / वसतिगृहात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान स्मृतीचिन्ह देवून अभिनेते मा प्रवीण तरडे व मान्यवर यांच्या हस्ते करण्यात आला.

**विशेष विद्यार्थी सत्कार नावे फायनल ट्राफी**

कु. मनीषा गाढवे, कु. सुजाता वाघिरे, कु. पुनम जाधव, कु. प्रतीक्षा भुसोर, कु. नेहा राऊत, कु. कान्होपात्रा पवार, कु. दिक्षिता वाघेरे, कु. केतकी डिक्कर, कृष्णा भारतसिंग महाले, हरी देवेंद्र वेलकट्टे, प्रितम बजाबा हिले, साहिल हिरामण हेमाडे, सिद्धेश दरेकर, साई बच्छाव, कु.देविका किरण कांबळे, कु. सोनाली तु. आखाडे, कु. भावना राजू सुतक, कु.कल्याणी रवींद्र शेडगे यांना सन्मानित करण्यात आले. यानंतर सेवाप्रकल्पात/वसतिगृहात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचा विविध गुणदर्शन, सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला त्यात वेगवेगळ्या प्रकारचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

१) मुलांचे वसतिगृह घोटी – शिव तांडव नृत्य, ऑपरेशन सिंदूर २) मुलींचे वसतीगृह हरसुल – तारपा नृत्य, रिदमिक योगा ३) आनंदालय वृद्धाश्रम नाशिक – कविता वाचन, ४)





मखमलाबाद येथील स्नेहवर्धिनी वसतीग्रह नाशिक – जोगवा नृत्य ५) श्री.बालाजी ट्रस्ट मंदिर तसेच महाविद्यालयीन मुलांचे, ६) राजगुरुनगर येथील मुलांच्या वसतिगृह – छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर नृत्य नाटिका. ७) शेवगाव मुलांचे वसतिगृह यांचा कार्यक्रम त्यांचे मधील सादरीकरण ८) संजीवनी मुलींचे वसतीगृह – लेझीम नृत्य, समूह गीत ९) वडगाव मुलांचे वसतिगृह – नारीशक्ती नृत्य नाटिका, १०) श्री संत धोंडा महाराज विद्यार्थी वस्तीग्रह शेवगाव (अहिल्यानगर) यांची शेतकरी समस्यांवरील नृत्य नाटिका ११) दोरी वरील मल्लखांब

अशाप्रकारे आपल्या वसतिगृहातील मुलांनी अतिशय सुंदर सादरीकरण केले. विद्यार्थ्यांनी विविध कला कौशल्ये सादर केली. भारतीय संस्कृती,भारतीय परंपरा, भारतातील लोप पावत चाललेल्या लोककला यावर आधारित विविध नृत्य,संगीत, नाटक व प्रयोग सादर करून उपस्थित सर्वांची मने जिंकली,

दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना व्यासपीठ उपलब्ध करून त्यांच्या कला गुणांना प्रोत्साहन देण्यासाठी विश्व हिंदू परिषद कायम तत्पर असते..

यासोबत विश्वास हिंदू परिषदेची सेवा कार्यात गेल्या अनेक वर्षांपासूनची उपलब्धी या सेवा कुंभच्या माध्यमातून सर्वांपर्यंत पोहचली..

कुठल्याही चित्रविचित्र, अनैसर्गिक किंवा कवायती मस्टेप्सफ नाहीत.., अंगावर येणारी साऊंड सिस्टिम नाही.., सहजसुंदर आणि लयबद्ध हालचाली असलेले, भारतीय शालीनता आणि निरागसता दाखवणारे, पूर्णपणे देशी – ग्रामीण वाद्यांच्या तालावरचे, विलोभनीय आणि प्रसन्न असे तारपा नृत्य! आदि सर्व उत्तम झाले. सेवा कुंभ २०२५ यशस्वी करणेकरिता सर्व अधिकारी, पदाधिकारी, स्वयंसेवक यांच्या सहकार्याने यशस्वी व सुंदर संपन्न झाला. कसबा जिल्ह्याकडे सोपवण्यात आलेली निवास व्यवस्था, पर्वती भागाची भोजन व्यवस्था व पुणे महानगरातील नऊ जिल्ह्यातील कार्यकर्त्यांच्या परिश्रमाने यशस्वी संपन्न झाला पिंपरी चिंचवड जिल्ह्यातील बजरंगी यांनी पार्किंग व्यवस्था सर्वाचे विशेष धन्यवाद.

**ॲड सतिश नानासाहेब गोरडे**
**प्रांत सह मंत्री पश्चिम महाराष्ट्र प्रांत**


संवाद

# संवाद ट्रेडप्रिंट्स

**छपाई क्षेत्रातील एक दर्जेदार सचोटीपूर्ण व्यवहार**

**बी–७, गोवईकर इमारत, शनिवार पेठ, पुणे – ३० दूरध्वनी : (०२०) २४४८५६३२**

**Email : sanwadpvt@gmail.com**






## सार्ध शताब्दी - भगवान बिरसा मुंडा १५० वी जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रम

### जनजाती गौरव दिवस: १५ नोव्हेंबर २०२५ :

### गौरव जनजाती क्रांतिकारकांचा, धर्मयोद्धांचा, सन्मान समृद्ध संस्कृतीचा.

कुलाबा : १५ नोव्हेंबर २०२५ रोजी विश्व हिंदू परिषद धर्मप्रसार आयाम अंतर्गत रायगड विभाग, कुलाबा जिल्ह्यातील कर्जत येथील पळसदारी अक्कलकोट श्री स्वामी समर्थ मठ सभागृहमध्ये ६५० जनजाती हिंदू बांधवांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात जनजाती गौरव दिवस साजरा करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज स्मारक (खोपोली फाटा) येथून प्रेरणादायी मोटारसायकल रॅलीने कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली. कातकरी समाजातील सांस्कृतिक नृत्याचे सादरीकरण व मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. जनजाती विश्व हिंदू परिषदेच्या कार्यकर्त्यांनी आपल्या कला कौशल्याने कार्यक्रम पूर्णत्वास नेला.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू ह्या जनजाती समाजाच्या, ही जनजातींच्या गौरवाची मोठी उपलब्धी आहे, असे उद्गार विहिंप केंद्रीय सहसंघटनमंत्री श्री.विनायकराव जी देशपांडे यांनी काढले. ते पुढे म्हणाले की, स्वातंत्र्य काळातील जुलमी, आक्रमणकारी, दडपशाहीने भारतीयांवर अन्याय करून प्रशासन चालवणार्या ब्रिटिश्यांच्या आणि मिशनरींच्या विरोधात जनजाती संस्कृती, मान्यता, सभ्यता आणि वन संपत्ती वाचवण्यासाठी अलौकिक योगदान दिले. तसेच असंख्य जनजाती क्रांतिकारक, आंदोलक, स्वातंत्र्य सेनानी ह्यांच्या पराक्रमी इतिहासाचा गौरव करण्याचा दिवस म्हणजे जनजाती गौरव दिवस होय. या दिवसाचे दुसरे महत्व असे की, आजच्या दिवशी धरतीआबा भगवान बिरसा मुंडा यांची १५० वी जयंती होय. भारत ही वीरांची भूमी आहे, इथे वीर आणि वीरांगना जन्माला येतात आणि या भारत भूमीच्या, हिंदू संस्कृती व धर्माच्या रक्षणासाठी आपले सर्वोच्च बलिदान देतात, ज्यांच्यामुळे आज आपले अस्तित्व कायम राहिले आहे. अशा ह्या वीरांच्या भूमीत आजच्या तरुण, तरुणींना देशभक्तीची प्रेरणा देण्यासाठी अशा क्रांतिकारकांचा, धर्मयोध्यांचा गौरव स्मरण करणे काळाची गरज आहे.

आज आपला जनजाती बांधव नशेच्या आहारी जात आहे, छळ आणि प्रलोभनाला बळी पडून, मूळ संस्कृती सोडून परधर्मात जात आहे. धर्म टिकला तर संस्कृती आणि प्राचीन जनजाती सभ्यता टिकणार आहे. आपल्या जनजाती बांधवांना रामायण, महाभारताचा इतिहास आहे. माननीय विनायकरावजी देशपांडे यांनी कार्यक्रमाची सांगता करताना आपण सर्वांनी संघटित, आपला समाज आणि धर्म टिकवण्यासाठी योगदान दिले पाहिजे, असा उपस्थित जनजाती बांधवांकडून संकल्प करून घेतला.

जनजाती सुरक्षा मंच संयोजक, कोकण प्रांत श्री सुदाम पवार यांनी चिरनेर जंगल सत्याग्रहमध्ये हुतात्मा झालेले नाग्या कातकरी यांच्या गौरवशाली इतिहासाचे स्मरण करून देताना छत्रपती शिवाजी महाराज्यांच्या हिंदवी स्वराज्य सैन्यातील जनजाती बांधवांचा सहभाग आणि पराक्रम यांची आठवण करून दिली.

प्राचीन काळापासून जनजाती बांधव भारत भूमीचे आणि हिंदू संस्कृतीचे रक्षण करत आले आहेत. भगवान बिरसा मुंडा, हुतात्मा नाग्या कातकरी, राणा पुंजा भिल्ल, तिलका मांझी, वीर बुधु भगत, राजे उमाजी नाईक, तेलंगा खडिया, महाराणी दुर्गावती, सिद्धू कान्हू, फुलो झानो, राघोजी भांगरे, वीर रामजी गौड, अल्लुरी सीताराम

राजू, तंट्या भिल्ल, राणी रोपुईलियानी अशा अनेक जनजाती वीर वीरागणांच्या पराक्रमाचे स्मरण जनजाती जाती गौरवनिमित्त करून उपस्थित जनजाती बांधवांमध्ये राष्ट्रभक्तीप्रति नवचैतन्य निर्माण करण्यात आले.कार्यक्रमचा शेवट उपस्थित पूजनीय संत श्री जिवजी मैत्रीबोध आश्रम यांचे आशीर्वचन आणि जयघोषाने झाली. उपस्थि सर्वांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.विश्व हिंदू परिषदेचे केंद्रीय, प्रांत, जिल्हा, प्रखंड स्तरावरील अधिकार्यांसोबतच, इतर सहकारी संस्थांचे अधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमात अक्कलकोट श्री स्वामी समर्थ मठ आणि मैत्री बोध परिवार ह्यांचे विशेष सहकार्य लाभले.



## प्रभू श्रीरामचंद्रांचे चरित्र विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्याची आवश्यकता : गोविंदजी शेंडे

नैतिक मूल्य शिक्षणाचा प्रसार अधिक होण्यासाठी नैतिक शिक्षण प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेने नैतिक मूल्य शिक्षण योजनेचा प्रारंभ व तसेच कथारूप रामायण या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा पार पडला. या सोहळ्यास विश्व हिंदू परिषदेचे केंद्रीय सहमंत्री श्री गोविंदजी शेंडे, पुणे पुस्तक महोत्सवाचे मुख्य संयोजक श्री राजेशजी पांडे, प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री किशोर चव्हाण, प्रांत सह मंत्री नितीन वाटकर, सचिव श्री आप्पा कुलकर्णी, कोषाध्यक्ष श्री रवींद्र नेर्लेकर, प्रतिष्ठानचे विश्वस्त, बजरंग दल प्रांत संयोजक श्री नितीन महाजन, मातृशक्ती संयोजिका सौ प्रियाताई रसाळ, विभाग मंत्री केतन घोडके, श्री धनंजय गायकवाड, जिल्हा मंत्री विजय कांबळे, शार्दुल ठाकूर, साईनाथ कदम, नाना क्षीरसागर उपस्थित होते.

प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री किशोर चव्हाण यांनी प्रास्ताविक केले. नैतिक शिक्षणाचे महत्त्व आणि त्याची आवश्यकता याविषयी मांडणी केली. इंग्रजांनी जाणीवपूर्वक भारतीय शिक्षणात लॉर्ड मेकॉले याची शिक्षण पद्धती राबविली, जी भारतात फक्त नोकरशाह तयार होते. आपली प्राचीन गुरुकुल पद्धती ही खर्या अर्थाने बाल पिढीला नैतिक मूल्य शिक्षण व हिंदू धर्माचे संस्कार शिकवणारी होती. आज शालेय शिक्षणात नैतिक मूल्य, परंपरा याचा आग्रह धरला पाहिजे. त्यासाठी प्रतिष्ठानने नैतिक मूल्य शिक्षण योजना राबविण्याचा निश्चय केला आहे. त्याअंतर्गत शाळांमधून रामायण या विषयावर विद्यार्थांची परीक्षा घेण्यात येणार आहे. सहभागी विद्यार्थ्यांना कथारूप रामायण पुस्तक देण्यात येणार असून त्याआधारावर परीक्षा घेण्यात येईल. कथारूप रामायण पुस्तक विद्यार्थ्याबरोबर घरातही कुटुंबियांकडून वाचन केल्याने प्रभू राम चरित्र आणि त्यांचे आदर्श याची माहिती घरामध्ये होईल. आज पश्चिम महाराष्ट्र प्रांतात अनेक शाळांनी सदर योजनेस उत्कृष्ट प्रतिसाद दिला असून अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आहे, असे किशोर चव्हाण म्हणाले.

प्रमुख पाहुणे श्री राजेश पांडे यांनी नैतिक मूल्य शिक्षण योजनेचे कौतुक करून, आज शालेय शिक्षणामध्ये त्याची आवश्यकता असल्याचे नमूद केले.पुस्तक वाचनाचे महत्व विद्यार्थ्यांमध्ये वाढत असल्याने ही पुस्तके मुलांची भूक आहे. त्याची पूर्तता आपण केली पाहिजे. पुणे पुस्तक महोत्सवास गेली दोन वर्षे उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून मागील वर्षी एकूण ८०० स्टॉल पुस्तक विक्रीसाठी होते. त्यामध्ये सुमारे २५ लाख पुस्तके विकली गेली. शालेय विद्यार्थ्यांमध्ये श्री छत्रपती शिवाजी महाराज, माननीय पंतप्रधान व कथारूप रामायण या पुस्तकांचे अनावरण करण्यात आले. याप्रसंगी नैतिक मूल्यशिक्षण केंद्रीय प्रमुख श्री गोविंदजी शेंडे यांनी विचार मांडले. नैतिक मूल्याचे काम जवळपास चाळीस वर्षांपूर्वी सुरू झाले. पूर्वी ते कर्नाटक पर्यंत सीमित होते. नंतर प्रेरणा घेऊन कोकण प्रांतातील काही कार्यकर्त्यांनी तिथे गेल्या २०/२२ वर्षांपासून हा उपक्रम सुरू केला. कोकण प्रांतामध्ये बाराशे विद्यालयांमध्ये हे काम सुरू असून दीड लाख विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली आहे. तसेच या उपक्रमात ७०० शिक्षकांचा सहभाग आहे. या कामाची व्याप्ती केवळ विद्यार्थी, शिक्षक, कार्यकर्ता एवढे नसून पालकांपर्यंत वाढली आहे.लखनऊ क्षेत्रामध्ये सुद्धा दोन वर्षांपासून नैतिक मूल्याचे काम सुरू आहे. येथे सुद्धा ६०००० विद्यार्थ्यांनी परीक्षेत सहभाग घेतला तसेच ३०० विद्यालयांमध्ये हा उपक्रम सुरू आहे. त्रिपुरामध्येही हा उपक्रम सुरू आहे. नैतिक मूल्य शिक्षणाची व्याप्ती ही संपूर्ण देशभर चांगल्या पद्धतीने व्यापक स्वरूप घेत आहे. परंतु ज्या पश्चिम बंगालमध्ये सर्वात जास्त रामायण लिहिले गेले तिथे अजून या उपक्रमाला अपेक्षित यश मिळाले नाही अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

आपल्या इथे नैतिकतेचा र्हास झाला, जीवन मूल्यांचा र्हास झाला, संस्कृतीचा र्हास झाला. गेल्या १००० वर्षांमध्ये या सर्व गोष्टी घडल्या. याचे मुख्य कारण म्हणजे, इथे आपल्यावर लादलेली धर्मनिरपेक्षता. आज अनेक विद्यालयांमधून जेव्हा संस्कृतीच्या आधारावर शिक्षण दिले जाते. तेव्हा त्याला सांप्रदायिक म्हटले

जाते. मुसलमान आणि ख्रिश्चन मुलांना वेगळ्या प्रकारचे ज्ञान पाहिजे आहे. त्यांना मारामारी करणे, रक्त पाहणे याचीच शिकवण दिली जाते. नंतर हीच मुले पुढे सर तन से जुदा व गजवा ए हिंद अशी स्वप्ने पाहू लागतात. परंतु आपण आपल्या मुलांना श्लोक शिकवतो, प्रार्थना शिकवतो, शुभंकरोती शिकवतो. परंतु ही परंपरा आपल्याकडे हळूहळू बंद होऊ लागली आहे. कारण पहिले आपले कुटुंब एकत्र होते. आपल्या घरात आजी, आजोबा होते. काका, काकू होते. त्यामुळे मुलांना संस्कार घरातच मिळायचे. परंतु कालांतराने आपले कुटुंब छोटे होत गेले. पूर्वी मुलांच्या बालमनावर संस्काराचे बीजारोपण व्हायचे. ते हळूहळू बंद झाले व त्यामुळे आपल्या नैतिकतेचा र्हास होऊ लागला. आपली संस्कृती फार महान आहे. मातृवत परदारेशु असा उदात्त विचार आपण करतो. म्हणजेच परस्त्री मातेसमान हे केवळ आपण शिकवतो. आपल्या संस्कृतीचा र्हास झाला, म्हणून महिलांची छेडछाड, बलात्कार, लव जिहाद असे प्रकार सुरू झाले. आमची नैतिकता केवळ शिकवण्यापुरती नसून आचरणात आणण्यासाठी आहे. संस्कृती म्हणजे आचरण, नैतिकता म्हणजे आचरण मी कसे वागतो, कसा व्यवहार करतो, कसे बोलतो हे शिकण्याची आमच्याकडे कोणती पद्धती राहिली आहे का? संस्कृती नैतिकता हे शिकवण्यासाठी देशात काय, तर संपूर्ण जगात केवळ एकच आदर्श आहे ते म्हणजे प्रभू रामचंद्र. आपण लहान मुलांवर संस्कार करायचा प्रयत्न करत आहोत, तो परिणाम कदाचित लगेच दिसणार नाही. पण एक दिवस नक्की त्याचा परिणाम दिसेल. कथारूप रामायणातील गोष्टी फक्त वाचण्याचा, परीक्षेचा विषय नाही तर त्या लहान मुलांना सांगाव्या सुद्धा लागतील. पूर्वी आमच्या घरात आजीने सांगितलेल्या गोष्टी आजही आपल्या लक्षात आहेत. पण आता आपल्या घरात आजी नाही, तर ते काम आपल्याला करावे लागेल. आम्ही कोणतीही आरती पुस्तके पाहून पाठ केलेली नाही, तर ऐकून ऐकून पाठ झाली. या कथा रूप रामायणातील गोष्टी मुले वाचतीलच. पण आम्हाला त्या मुलांना कथा रोचक पद्धतीने सांगाव्या सुद्धा लागतील.रामाचेच चरित्र का? भावासोबत कसे राहायचे आहे. आज भावाभावांचे संबंध किती बिघडले आहेत. भाऊ भावासोबत भांडतोय. दोघांमधील वैमनस्य वाढले आहे. भरताला संपूर्ण राज्य मिळाले. तरी तो रामाकडे जाऊन म्हणाला, हे राज्य मला नको. पण प्रभू रामचंद्र त्यांना म्हणाले, मला वडिलांचा आदेश आहे. मला राज्य सोडावे लागेल. हे ऐकून भरताने सुद्धा प्रभू रामचंद्रांना त्यांच्या पादुका मागितल्या व त्या पादुका सिंहासनावर ठेवून भरताने राज्य केले व मोठा भाऊ प्रभू रामचंद्र वनवासात गेले तर भरताने सुद्धा राज्याच्या बाहेर झोपडीमध्ये आपला निवास केला. अशा कथा सांगितल्या तर भावाला कळेल की भावाने भावासोबत कसे राहायचे. हा जरी भाव जागृत झाला तरी आपला हा उपक्रम यशस्वी होईल.

माता सीतेने रामासोबत वनवास स्वीकारला. त्या सुद्धा त्यांना सोडून वडिलांसोबत माहेरी गेल्या नाहीत. आपल्या बहिणींना सुद्धा हा आदर्शच आहे. आज घटस्फोटाच्या लाखो केसेस कोर्टामध्ये प्रलंबित आहेत. कारण हा भाव संपला आहे. तो भाव आपल्याला जागृत करायचा आहे. मुलांमध्ये आदर्श भाव जागृत करायचा असल्यास सर्वात चांगली आयु म्हणजे या बालकांमधे सात ते आठ वर्षांपासून या आदर्शाचे जागरण झाले तर तो चांगला भाऊ, चांगला पती, चांगला मुलगा, चांगला नागरिक बनेल. आपल्या परंपरांना सुरक्षित ठेवणारा नागरिक बनेल व येणारी पिढी सुद्धा आदर्श पिढी बनेल. केवळ किती विद्यार्थ्यांशी संपर्क झाला? किती विद्यालयात संपर्क झाला? हे आमचे उद्दिष्ट नाही तर या नव्या पिढीच्या आधारावर आपल्याला समाज परिवर्तन करायचे आहे. परिवर्तनाच्या वाहकाच्या भूमिकेत आपल्याला यायचे आहे. शिक्षकांना सुद्धा आपल्याला या कर्तव्याच्या भूमिकेत आणले पाहिजेत. रामाचे चरित्र हे प्रत्येक वेळेस नवीन नवीन गोष्टी शिकवतात. जीवनातील प्रत्येक गोष्ट आपल्याला या चरित्रात मिळेल. रामायण जर प्रत्यक्षात जीवनात उतरवले तर आमचे जीवनातील लक्ष्य साध्य करण्यापर्यंत मदत होईल. कुटुंब एक होईल. परिवार एक होईल. एकमेकांच्या बाबतीत समर्पण भाव तयार होईल. समाजाप्रती मनात ऋण भाव जागृत होईल. समाजाचे आम्ही काहीतरी देणे लागतो, हा भाव जागृत होईल. सुरक्षा भाव, राष्ट्रभाव, धर्माच्या प्रती भाव तयार होईल. राष्ट्रभाव आणि धर्मभाव जागृत झाल्यावर आपण विश्व विजयाच्या दिशेने जाऊ. संघाच्या प्रार्थनेत आम्ही कायम म्हणतो, परमवैभवम् नेतुमेत स्वराष्ट्रम् आम्ही काम का करतो, तर आम्हाला या राष्ट्राला पुन्हा परम वैभवाला न्यायचे आहे. आम्हाला विश्वगुरू बनायचे आहे. शस्त्राच्या आधारावर नाही तर शास्त्राच्या आधारावर चरित्र, परंपरांच्या आधारावर. आम्ही प्रार्थनेत कायम म्हणतो, त्वदियाय कार्याय बद्धाकटियम् या कामासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. आणि आम्हाला विजय मिळणारच आहे. कथारूप रामायण आम्हाला अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवावे लागेल. तेव्हाच आपल्याला अपेक्षित यश नक्की मिळेल. म्हणून या कामाची प्राथमिकता लक्षात घेऊन योग्य व्यक्तीची नियुक्ती करावी लागेल. विद्यालयातील शिक्षक, निवृत्त व्यक्ती, गृहिणी यांना कथा सांगण्याचे काम समर्पित होऊन विद्यालयांमध्ये करतील असा भाव तयार करूनच जर आपण हे काम केले तर आपल्याला यश नक्की मिळेल, असे गोविंदजी शेंडे म्हणाले.



फोटोत पांढरा शर्ट घातलेला २० वर्षांचा जो मुलगा दिसतोय. त्याचं नाव आहे सिध्दार्थ. अनुसूचित जातीत आजही समाज प्रवाहाच्या गर्तेत किती मागं आहे याचं प्रत्यक्ष रूप सिध्दार्थ बरोबर गप्पा मारताना मला समजलं. त्यांचं कारण, विश्व हिंदू परिषद सेवा विभाग आयोजित सेवा कुंभ २०२५ निमित्ताने पुणेत रमणबाग शाळेत सिध्दार्थ मला दिसला. मुलांना मदत करत होता. त्याची धावपळ चालू होती. म्हटलं शिकला सवरलेला जरा वेगळाच दिसतोय म्हणून गप्पा मारायला सुरुवात केली. शिक्षण नसल्यानं कित्येक पिढ्या केवळ पोटासाठी व प्रपंचासाठी वेठबिगारीचे काम करणं. चाकरी करणे. गावातील पुढारी सांगेल ते काम करणं. कधी या दुष्टचक्रात कोणी अडकून पोलिसांनी पकडलं, तर गुन्हा कबूल करणं आणि शिक्षा भोगणं. जेलमधून सुटून आल्यावर पुन्हा त्याच आयुष्याची सुरूवात करणे. याच जाळ्यात या समाजाच्या जगण्याचं चक्र फिरत आलंय.विश्व हिंदू परिषद संचलित राजगुरूनगर मधील वनवासी विद्यार्थी वसतिगृहातील जनजाती आदिवासींसाठी असलेल्या निवासी वसतिगृहात हा सिध्दार्थ शिकून एसवायबीए, राजगुरू महाविद्यालयात शिकतोय. त्याला म्हटलं, सिध्दार्थ तुला भीती वाटली नाही का..रे.. तुझ्या लहानपणी जेव्हा वडील अचानक हृदयविकाराने निधन झाले. त्यानंतर आई ब्रेनट्यूमरनं गेली. आणि तिनं तुझे समोर जीव सोडला तेव्हा... खरं तर हा प्रश्न विचारत असताना माझ्याच पोटात भितीचा गोळा आला होता.

सिध्दार्थ दोन मिनिटं शांत बसला आणि अचानक. वो सर, लय घाबरलो होतो, तवा मी. पण मी काय करणार, माझे पाठच्या लहान बहिणी व माझे वय ८ वर्स! माझं काळीज हे उत्तर ऐकूनच चर्र झालं. सिध्दार्थ मला आता भूतकाळात नेत ती घटना सांगायला सुरुवात केली.आम्ही प्रवरा राहुरीचे. गावाबाहेर छोटी खोपटी. रोज जेवण मिळेल असं काही नाही. अठरां विश्व दारिद्र्यच. सिध्दार्थचे वडील आजारातच. सिध्दार्थ ३ वर्षाचा असताना गेले. आई त्यानंतर ५ वर्षांनी आजारातच गेली होती. तीन बहिणी काय आयुष्यात होणार. कसं जगणार. कोण खायला देणार. जागा नाही. पैका नाही. आभाळ फाटलं..सिध्दार्थ निर्विकार चेहर्याने बारा वर्षांपूर्वीची कहाणी मला सांगत होता. आता मला पुढचा प्रश्नच सुचत नव्हता. बारा वर्षांपासून सिध्दार्थ आता राजगुरुनगरच्या वसतीगृहात शिकून मोठा व्हायला आला होता.बारा वर्षांपूर्वी तो मामाकडे चाकणला त्याला नातेवाईकांनी आणून सोडलं. मामाला कळालं कि विश्व हिंदू परिषदेचे वसतिगृह राजगुरुनगरला आहे. त्यात सिध्दार्थसारखी अनाथ मुलांना शिक्षण व संगोपन, संस्कार देण्याचे काम करतात.. मामा सिध्दार्थ ला घेवून बारा वर्षेपूर्वी वसतीगृहात सोडून गेला. मग सिध्दार्थ न मागेपुढे न बघता शिक्षण, अभ्यास, वसतिगृहातील सांगेल ते काम प्रामाणिकपणे करून तो इयत्ता १२ वी नंतर राजगुरुनगर येथील राजगुरू महाविद्यालयात एसवायबीए शिकत आहे. सिध्दार्थला स्पर्धा परीक्षा देण्याची असल्याने विद्यालयीन शिक्षणा बरोबरच त्याने तयारी सुरु केली. वेगवेगळे ग्रंथ, पुस्तकं, आत्मचरित्र वाचायला सुरुवात केली. सिध्दार्थला महाराष्ट्र लोकसेवा आयोग किंवा केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षा देवून अधिकारी व्हायचंय. हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी रात्रंदिवस झटतोय. तेही वसतीगृहात सरव्यवस्थापक म्हणून काम करत करत.सिध्दार्थच्या बहिणी मनीषा, उज्वला व जयश्री या विश्व हिंदू परिषदेच्या तळेगाव दाभाडे येथील संजीवनी मुलींचे वसतिगृह येथे इयत्ता दहावीपर्यंत शिक्षण घेतले आहे. त्यांचे आता लग्न झाले असून उत्तम संसार चालू आहे.सिध्दार्थची ही हकीकत ऐकून त्याला म्हटलं, सिध्दार्थ शेवटचा प्रश्न विचारू का? विचारा की, आत्ता काय राहिलं. विश्व हिंदू परिषदेच्या वसतीगृहात तुला मामाने नसता सोडलं तरं? सर मी असाच गावी व्यसनी होऊन पिढीजात वेठबिगारी राहिलो असतो. मला या वसतीगृहात प्रवेश मिळाला माझं व माझे बहिणीचे आयुष्यच बदलले. मी शिकून खूप मोठा अधिकारी होणार व माझे समाजातील मुलांच्या शिक्षणासाठी प्रयत्न करणार!! आमच्या सेवाकुंभ समारोप जाहीर कार्यक्रमाची वेळ होत आली होती. सिध्दार्थच्या डोळ्यात पाहिलं. खरंच त्यांचं होणारं स्वप्न मला दिसत होतं. त्याला शुभेच्छा देत परत भेटू. मी बोललो खरं. पण समारोप कार्यक्रमाकडे जात असताना सिध्दार्थ काही केल्या मनातून जात नव्हता!!

**संवाद – ॲड सतीश गोरडे,**
**प्रांत सह मंत्री, पालक सेवा विभाग.**

# हिंदू समाजाच्या हृदयात सेवाभाव : स्वपनकुमार मुखर्जी
## दोन दिवसीय सेवाकुंभ सोहळ्याप्रसंगीचे मनोगत

पुणे : हिंदू समाजाच्या हृदयात सेवाभाव असतो; कारण जन्मापासून कुटुंबात विविध सेवांचे संस्कार नकळत मुलांवर घडवले जातात, असे विचार विश्व हिंदू परिषदेचे केंद्रीय सहमंत्री तथा केंद्रीय सहसेवा प्रमुख स्वपनकुमार मुखर्जी यांनी व्यक्त केले.

न्यू इंग्लिश स्कूल, रमणबाग, पुणे येथे विश्व हिंदू परिषद, पश्चिम महाराष्ट्र प्रांताच्या वतीने आयोजित दोन दिवसीय सेवाकुंभ २०२५ या सोहळ्यातील समारोप सत्रात प्रमुख वक्ते म्हणून स्वपनकुमार मुखर्जी बोलत होते.

ज्येष्ठ सिने अभिनेते प्रवीण तरडे, विश्व हिंदू परिषद प्रांत उपाध्यक्षा माधवी सौंशी, प्रांत मंत्री किशोर चव्हाण, प्रांत सहमंत्री ॲड. सतिश गोरडे, कोषाध्यक्ष कृष्णकुमार चांडक, सेवाप्रमुख ॲड. श्याम घरोटे, बांधकाम व्यावसायिक मदन ठोंबरे, नितीन जाधव, निषिद शहा आदी मान्यवरांची व्यासपीठावर उपस्थिती होती. स्वपनकुमार मुखर्जी पुढे म्हणाले की, जगातील सुमारे ऐंशी देशात विश्व हिंदू परिषद ही सेवाभावी संघटना कार्यरत आहे.

हिंदू समाज आणि संस्कृती सर्व जगात उन्नत व्हावी, सर्व जगाला ज्ञान देण्याचे काम हिंदूंनी करावे, हे संघटनेचे उद्दिष्ट आहे. प्रयागराज येथे झालेल्या महाकुंभ मेळाव्यात साठ कोटींहून अधिक भाविक एकत्र आले होते; आणि यापैकी एकही जण उपाशी राहिला नाही, हे हिंदू समाजाच्या सेवाभावाचे सर्वोत्तम उदाहरण आहे. आपल्याच दुर्लक्षामुळे धर्मांतरित झालेल्या दुर्गम भागातील हिंदू बांधवांना आपल्यात सामावून घेत त्या तळागाळातील हिंदू समाजापर्यंत हा सेवाभाव पोहचला पाहिजे. यासाठी तन, मन, धन अर्पण करून आपण विश्व हिंदू परिषदेच्या या सेवाकार्यात सामील व्हावे. प्रवीण तरडे यांनी आपल्या मनोगतातून, वसुधैव कुटुंबकम हे तत्त्व हिंदुधर्म मानत असल्याने, या धर्मात आपला जन्म झाला, हे आपले परमभाग्य आहे. त्यामुळेच हिंदुधर्माचे आचार, विचार, संस्कृती सर्वांपर्यंत पोहोचविणे हे आपले आद्य कर्तव्य आहे. त्यासाठी जातीपातीच्या भिंती पाडून एकत्र आले पाहिजे. प्रत्येक हिंदूची सुरक्षा ही आपली जबाबदारी आहे. जिथे धर्म तिथे जय, हा विचार कायम लक्षात ठेवून आपण ज्या क्षेत्रात कार्यरत आहात, त्या क्षेत्रात हिंदुधर्मासाठी कार्यरत व्हा, असे आवाहन केले.

श्रीराम, जानकी, लक्ष्मण आणि हनुमान यांचे पूजन करून कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. किशोर चव्हाण यांनी प्रास्ताविकातून दर पाच वर्षांतून वेगवेगळ्या प्रांतात सेवाकुंभाचे आयोजन केले जाते, अशी माहिती दिली. यानिमित्त मान्यवरांच्या हस्ते स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. तसेच साहित्य, संस्कृती, कला, क्रीडा यामध्ये नैपुण्य प्राप्त केलेल्या विविध वसतिगृहातील विद्यार्थ्यांना गौरवचिन्ह प्रदान करून सन्मानित करण्यात आले. पश्चिम महाराष्ट्रातील नाशिक, पुणे, कोल्हापूर, सोलापूर आणि अहिल्यानगर या विभागांतून सेवाकुंभात सहभागी झालेल्या प्रकल्पातील आणि वसतिगृहातील जनजातीय मुलामुलींनी बनवलेल्या विविध वस्तूंचे प्रदर्शन (स्टॉल) कार्यक्रमस्थळी भरविण्यात आले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्नेहा पाटील आणि डॉ. शर्वरी यरगट्टीकर यांनी केले. संयोजन दिलीप देशपांडे, प्रशांत कुलकर्णी, दिनेश लाड,विजय देशपांडे, किर्तीश जोशी, ज्ञानेश्वर इंगळे, संजय गोडबोले यांनी केले.

कार्यक्रमानंतर सहभागी जनजातीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कलांच्या सादरीकरणातून उपस्थितांचे मनोरंजन आणि प्रबोधन केले.



# चांगल्या बातम्या

नुकत्याच घडलेल्या व देशाच्या दृष्टीने चांगल्या, अशा खूप गोष्टी आहेत. पण त्यातील काही बातम्या खाली देत आहे. आपण यातील काही बातम्या कदाचित् वाचल्या असतील. तरी पण आपणासाठी परत एकदा पाठवत आहे.

१) रविवारी २ नोव्हेंबर रोजी इस्रो च्या डतच३ या प्रक्षेपकाने भारताचा, आतापर्यंतचा सर्वात मोठा म्हणजे ४,४१० किलो वजनाचा उपग्रह भूस्थिर कक्षेमध्ये यशस्वीपणे सोडला .४३.५ मीटर उंचीच्या या बाहुबली प्रक्षेपकाने २० मिनिटात १८० किमी अंतरावरील कक्षेत उपग्रह प्रस्थापित केला GSAT-7R हा भारताचा सर्वात मोठा ४,४१० किलो वजनाचा मल्टी बॅन्ड कम्युनिकेशन उपग्रह आहे . हा प्रगत व ॅटी जॅमिंग असून नौदलाच्या जहाज, पाणबुड्या वगैरेच्या संचालनासाठी आहे. सध्या कार्यरत असलेल्या रुक्मिणी उपग्रहाची जागा तो घेणार आहे.

२) आपले संरक्षण मंत्री मा. राजनाथ सिंह यांनी नुकतेच नाशिक मधील एच्एएल च्या कारखान्यातील तेजसच्या तिसऱ्या उत्पादन साखळीचे आणि ट्रेनर विमानांच्या दुसऱ्या उत्पादन साखळीचे लोकार्पण केले. आता एच्एएल् दरवर्षी ३० लढाऊ आणि ट्रेनर विमाने बनवेल. सध्या विमानातील ६४% भाग हे स्वदेशी बनावटीचे असून लवकरच ७०% भाग स्वदेशी असतील.

त्यानंतर श्री राजनाथ सिंह यांचे उपस्थितीत एच्एएल् मध्ये बनलेल्या स्वदेशी एमके-१ए या आधुनिक तेजस लढाऊ विमानाने पहिली हवाई भरारी घेतली. आता रडार व अन्य शस्त्रास्त्रे बसवून मार्च २६ मध्ये पहिले विमान हवाई दलाकडे सोपवले जाईल.

एचएएल् कडे २०२१ मधील ८३ विमानांची ऑर्डर असून २०२५ मधील अजून ९७ विमानांची ऑर्डर आहे.

३) हिंदुस्तान एरोनॉटिक्स (एचएएल्) आणि रशियाची युनायटेड एअरक्राफ्ट कॉर्पोरेशन यांनी नुकताच, ऑक्टोबर २५ मध्ये, त्यांचे SJ-१०० हे प्रवासी विमान भारतामध्ये बनवण्याचा करार केला .

SJ-१०० हे २ इंजिन असलेले व १०० प्रवासी क्षमता असलेले विमान भारतातील वाढणाऱ्या अंतर्गत वाहतुकीसाठी उपयोगी ठरेल. तसेच प्रथमच प्रवासी विमान भारतात उत्पादन केले जाईल.

४) भारत सागरी आठवडा परिषद २७ ते ३१ ऑक्टोबर रोजी मुंबईत झाली. या परिषदेत ८५ देश व ११ देशांचे परराष्ट्र व्यवहार मंत्री उपस्थित होते व ५ देश आयोजक म्हणून सहभागी झाले होते. सागरी क्षेत्रातील कारखानदार, गुंतवणूकदार, तज्ञ, आणि अनेक कंपन्यांचे प्रमुख उपस्थित होते. तेथील प्रदर्शनात ५०० स्टॉल होते. परिषदेच्या कालावधीत १२ लाख कोटी रुपयांचे ६०० करार झाले. यामध्ये प्रामुख्याने बंदर विकास (३०%) जहाज बांधणी (२०%) व औद्योगिकरण, व्यापार वृद्धी वगैरेसाठी चे करार झाले..

या परिषदेत आपल्या पंतप्रधानांनी सांगितले की टप्प्याटप्प्याने २०४७ पर्यंत २ लाख २४ हजार कोटी रुपयांची ४३७ नवीन जहाजे भारताच्या ताफ्यात सामील होतील. यामध्ये हरित टंग, गाळ काढणारी, खनिज तेल उत्पादन, कंटेनर, टँकर वाहतूक व नौदलासाठीची जहाजे असतील.

नौदल प्रमुखांनी १०व्या भारतीय संरक्षण परिषदेत बोलताना सांगितले की सध्या दर ४० दिवसांनी स्वदेशी बनावटीची एक युद्धनौका किंवा पाणबुडी नौदलाच्या ताफ्यात दाखल होत आहे. सध्या ५२ युद्धनौकांची बांधणी सुरू आहे.

भारताने रस्ते महामार्ग, रेल्वे, यामध्ये खूप प्रगती केल्यावर आता हवाई व जल वाहतूकीवर जास्त लक्ष केंद्रित केले आहे. भारताकडे मोठा समुद्र किनारा आहे. तसेच १,३०० बेटे ही आहेत. जगाला जल वाहतूकीची पहिली ओळख भारताने ४,५०० वर्षांपूर्वी मोहेंजोदारो व हडप्पा कालावधी पासून करून दिली. तेंव्हा सिंधू नदीतून मोठी व्यापारी जहाजे सामान घेऊन जात असत. पुढे राजा विक्रमादित्य, नंतर सातवाहन, चौल राजांच्या काळात रोम पासून ते इंडोनेशिया, कंबोडिया पर्यंत भारतीयांचा दबदबा होता. बाराव्या शतकापर्यंत भारताचे समुद्रावर अधिराज्य होते. मोठा व्यापार चालायचा. जहाज बांधणी व्हायची आणि सशक्त आरमार असायचे. पण बाराव्या शतकानंतर

भारताची या क्षेत्रात अधोगती सुरू झाली. मध्यंतरी छ. शिवाजी महाराजांनी उभारी दिली. पण पुन्हा परदेशी शासनात आपण मागे पडलो. आता परत एकदा भरारी घ्यायला सुरुवात झाली आहे. जहाज बांधणी सुरू झाली आहे. जगातील मोठ्या बोटी आता कझिंगम बंदरात येऊ लागल्या आहेत. त्याच बरोबर वाढवण, जेएनपीटी ह्या मोठ्या बंदरांची क्षमता वाढवली जात आहे. ग्रेट निकोबार बेटावरही मोठे बंदर उभारले जाणार आहे.

५) भारताची सूर्य अक्षय ऊर्जा बनवण्याची क्षमता १२५ गिगॅवॉट पर्यंत पोहोचली (२०१४ मध्ये २.८२ गिगॅवॉट होती) असून जपान व जर्मनीला पाठीमागे टाकून जगामध्ये भारत तिसऱ्या क्रमांकावर आला आहे. पहिल्या क्रमांकावर चीन (८९० गिगॅवॉट) तर अमेरिका (१८०) दुसऱ्या क्रमांकावर आहे. जपान व जर्मनी ९५ गिगॅवॉट च्या आसपास आहेत. सोलर मोड्यूल मॅन्युफॅक्चरिंग कपॅसिटी ही २०२४–२५ मध्ये ७४ गिगॅवॉट झाली आहे. जी २०२३–२४ मध्ये ३८ गिगॅवॉट होती.

केंद्र सरकारच्या प्रगतीशील धोरणामुळे हा बदल घडून आला आहे. १२५ गिगॅवॉट सूर्य ऊर्जेपैकी १७ गिगॅवॉट वीज ही घराच्या छतावरील प्रकल्पातून बनते आणि २०३० पर्यंत ३० गिगॅवॉट चे उद्दिष्ट ठेवले आहे. भारताची विद्युत निर्मिती क्षमता ही सध्या ४८४.८२ गिगॅवॉट आहे. भारताने २०३० पर्यंत अक्षय ऊर्जा निर्मिती ही एकूण उर्जेच्या ५०% असेल, असे उद्दिष्ट ठेवले होते. पण २०२५ मध्येच भारताने हे उद्दिष्ट साध्य केले. भारताने २०७० पर्यंत देशाला लागणारी उर्जा ही (तेल, कोळसा शिवाय) संपूर्ण अक्षय ऊर्जा असेल असे उद्दिष्ट ठेवले आहे.

६) न्योमा हा हवाईदलाचा विमानतळ, सिंधू नदीच्या वरच्या बाजूला, चांगथांग या लडाख मधील भागात आहे. १३,७०० फूट उंचीवरील हा विमानतळ जगातील सर्वात जास्त उंचीवरचा आहे. तसेच चीन च्या सरहद्दी पासून फक्त ५० किमी अंतरावर आहे. चीन बरोबरच्या युद्धानंतर १९६२ साली हा विमानतळ बांधला. पण नंतर त्याचा वापर झाला नाही. २००९ मध्ये थोडीशी डागडुजी करून सामान वाहतुकीचे विमान AN 32 तिथे उतरवले होते. पण त्यानंतर ही वापर झाला नाही.

२०२१ मध्ये केंद्र सरकारने २२० कोटी रुपयांच्या या विमानतळाला मंजुरी दिली. (बीआर् ओ) सीमा रस्ते संघटनेने अत्यंत कठीण परिस्थितीत (कारण तेथे थंडीत बर्फ पडत असतो व तापमान –४० डिग्री असते. तसेच प्राणवायू चे प्रमाण ही कमी असते.) हा विमानतळ बांधला. आणि ऑक्टोबर २५ मध्ये तो पूर्णपणे कार्यान्वित झाला. १२३५ एकर जागेवरील या विमानतळावरील धावपट्टी २.७३ किमी लांबीची आहे. त्यामुळे आपली मोठी लढाऊ विमाने राफेल व सुखोई तेथे उतरु शकतात. तसेच C17 व IL76 ही मालवाहतूक विमाने, ज्यामधून रणगाडे, क्षेपणास्त्र प्रणाली व सैन्य आणले जाते, ती ही उतरू शकतात. अर्थात प्रत्येक उड्डाण व विमान उतरवणे हे अत्यंत कौशल्याचे काम आहे. येथील धावपट्टी चे विशेष म्हणजे या धावपट्टीवर दोन्ही बाजूंनी विमान उतरू/उड्डाण करु शकते.

७) चीनच्या LONGi ग्रीन एनर्जी कंपनीने त्यांच्या भारतातील कामासाठी INOX SOLAR या भारतीय कंपनीला ७,००० कोटी रुपयांची ५ गिगॅवॉट सोलर मोड्यूलची ऑर्डर दिली आहे. येत्या तीन वर्षात ही ऑर्डर पूर्ण करायची आहे. त्यासाठी लागणारे मोड्युल व सेल चे आधुनिक तंत्रज्ञान LONGi कंपनी पुरवणार आहे. चीन मधील कंपनी कडून प्रथमच एवढी मोठी ऑर्डर भारतीय कंपनीला मिळाली आहे.

८) भारताने जगात जोरात वाढणाऱ्या AI बरोबर, त्या साठी लागणाऱ्या पायाभूत सुविधांच्या विकासावर लक्ष केंद्रित केले आहे. भारतातील AI मार्केट २०३० पर्यंत ५.४ लाख कोटी रुपये असण्याचा अंदाज आहे. त्यामुळे देशातील व परदेशी गुंतवणूकदार या क्षेत्रात मोठी गुंतवणूक करु लागले आहेत. प्रत्यक्ष AI मध्ये किंवा त्यासाठी लागणाऱ्या पायाभूत सुविधा देणाऱ्या गोष्टी मध्ये स्वतः (रिलायन्स, अदानी, सारख्या कंपन्या) गुंतवणूक करत आहेत, किंवा परदेशी कंपन्या भारतातील योग्य कंपनी बरोबर भागिदारी करत आहेत. (जसे गुगल, मायक्रोसॉफ्ट, मेझॉन, ओपन एआय् वगैरे वगैरे.) फक्त डाटा सेंटर मध्ये २०२७ पर्यंत १०० इ (९ लाख कोटी रुपये) ची गुंतवणूक व्हायची शक्यता आहे.

लवकरच भारत हा AI हब बनेल. मोठ्या उलाढाली बरोबर अनेक नोकऱ्या ही उपलब्ध होतील.

**कुमार आठवले**

# संघ, सरदार पटेल, पं. नेहरू आणि गांधीहत्या

- **आता द्विराष्ट्रवाद्यांना भारतात कोणतीही जागा नाही. ... सरदार पटेल २९**

काश्मीर प्रकरण एकीकडे धगधगत असताना निजामाच्या हैदराबाद संस्थानाच्या व गुजरातमधील जुनागढ संस्थानाच्या भारतातील विलीनीकरणाचा प्रश्नही धुमसत होता. या पृष्ठभूमीवर गुजरातमधील राजकोट येथे सरदार पटेल यांचे १२ नोव्हेंबर १९४७ ला भाषण झाले. त्यात त्यांनी भारतावर संदिग्ध निष्ठा असलेल्या मुसलमानांना चांगलेच फैलावर घेतले. ते म्हणाले,

मला आठवतंय की कशाप्रकारे काठीयावाडच्या मुसलमानांनी द्विराष्ट्रवादाच्या सिद्धांताचे समर्थन करताना मुस्लिम लीगच्या प्रचारात (propaganda) आपले योगदान दिले होते; आणि ते आज सुद्धा मुस्लिम लीगच्या राजनीतीत भाग घेत आहेत. त्यांच्या होऊन गेलेल्या गोष्टी मी विसरू शकतो, परंतु ते आज सुद्धा द्विराष्ट्र सिद्धांताशी जवळीक अनुभवत असतील आणि मदतीसाठी एका बाह्य शक्तीकडे बघत असतील, तर त्यांच्यासाठी काठीयावाडमध्ये कोणतीही जागा नाही. ही दुहेरी निष्ठा नष्ट करण्यासाठीच आम्ही पाकिस्तान बनवण्याविषयी सहमत झालो होतो. त्यामुळे जे लोक आपल्या धर्माच्या लोकांबरोबर राहू इच्छितात त्यांना तशी एक जागा मिळू शकेल आणि तेथे ते आपल्या धर्माचा पाठपुरावा करू शकतील. परंतु भारतात अशा व्यक्तींसाठी कोणतीही जागा नाहीये. जर ते भारतात राहत असतील तर त्यांना निष्ठावान नागरिक बनावे लागेल आणि ते असे करणार नाहीत तर त्यांच्याबरोबर एका विदेशी नागरिकांच्यासारखा व्यवहार केला जाईल. मुसलमानांना भारतात गैर–मुसलमानांबरोबर सद्भावनेने राहिले पाहिजे. भारतातील मुसलमानांनी आपल्या अंतरात्म्याला विचारले पाहिजे की, काय ते वास्तवात या देशाशी एकनिष्ठ आहेत? जर ते नसतील तर त्यांना त्या देशात गेले पाहिजे ज्यावर त्यांची निष्ठा आहे.

- **तुम्ही लोक पाकिस्तान निर्मितीला जबाबदार आहात... सरदार पटेल ३०**

(स्रोत संविधान सभा मे सरदार पटेल का भाषण)

ही सर्व संकटमय प्रकरणे चालू असताना घटना समितीचे कार्यही चालूच होते. या सभेत भाषण करताना सरदार पटेल म्हणाले,

मी आपले छोटे भाई म्हणजे मुसलमानांचे प्रेम गमवायला तयार आहे. आम्ही तुमचे प्रेम बघितले (भोगले) आहे. तुम्हाला तुमच्या क्रियाकलापात बदल केला पाहिजे; कोरड्या गप्पा मारून चालणार नाही. तुम्ही तुमच्या मानसिकतेविषयी पुन्हा विचार केला पाहिजे. तुम्हाला जे पाहिजे होते ते पाकिस्तानच्या रूपात मिळाले आहे. लक्षात ठेवा, पाकिस्तानचे रहिवासी नाही, तर तुम्ही लोक पाकिस्तान निर्मितीला जबाबदार आहात. तुम्ही लोकच पाकिस्तानच्या आंदोलनात पुढे होता. आता तुम्हाला काय पाहिजे, आम्हाला सर्व माहीत आहे. आमची इच्छा नाही की देशाची पुन्हा फाळणी व्हावी. ज्यांना पाकिस्तान पाहिजे होते त्यांना ते मिळाले आहे. ज्यांची पाकिस्तानवर श्रद्धा आहे लोकांनी तिकडे जाऊन सुखात राहावे. आता येथे राहणाऱ्या मुसलमानांचे हे एक कर्तव्य आहे की, त्यांनी आपल्या या देशाच्या बहुसंख्याक जनतेला विश्वास द्यावा की, ते या देशाबरोबर आहेत. जे अल्पसंख्याक म्हणजे मुसलमान, देशाचे विभाजन करू शकतात त्यांना तुम्ही अल्पसंख्याक कसे म्हणू शकता? अशा शक्तिशाली संगठित अल्पसंख्याकांना मुसलमानांना आता अजून काय विशेष अधिकार पाहिजे आहेत

म. गांधीच्या मनात संघाविषयी बिलकूल आकस नव्हता. आकस होता तो पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरूंच्या मनात. हिंदुस्थानची फाळणी व त्यानंतरच्या काळात संघशाखांवरील उपस्थिती, संघाच्या नित्य कार्यक्रमात सहभागी होणाऱ्यांची संख्या, तसेच स्वयंसेवकांचा उत्साह आणि प्रभाव यांना सर्वत्र जणू प्रचंड भरती आली होती. जनता मोठ्या वेगाने संघाकडे आकृष्ट होत होती. तेवढ्याच गतीने जनता संघ–विरोधकांकडे पाठ फिरवीत होती. महाराष्ट्रातील अकोल्यात ६ नोव्हेंबर १९४७ या दिवशी भरलेल्या संघ शिबिरात पंधरा हजार स्वयंसेवकांनी भाग घेतला होता. मुंबईचा १९४७ चा गुरुपौर्णिमा उत्सव दादरला शिवाजी पार्कवर संपन्न झाला. तिथे श्रीगुरुजींचे भाषण ऐकण्यास

७५ हजार जनता आली होती; तर या उत्सवात स्वयंसेवकांची संख्या १५ हजार होती. काँग्रेस नेते पट्टाभी सीतारामय्या, टी. एस. प्रकाशन, आचार्य एन. जी. रंगा यांच्यासारखे प्रसिद्ध काँग्रेस नेते सभांमधून संघाचे कार्य आणि स्वयंसेवकांचा व्यवहार यांची प्रशंसा करीत होते. उत्तर प्रदेशात सुद्धा प्रभाव जाणवण्यासारखा होता. श्रीगुरुजींचा प्रवास असताना होणाऱ्या भाषणांना हजारो गणवेशधारी स्वयंसेवकांबरोबरच लाख दोन लाख जनसमुदायही प्रत्येक ठिकाणी उपस्थित असायचा.

५ जानेवारी १९४८ला खुद्द पं. नेहरूंनी सर्व मुख्यमंत्र्यांना एक पत्र लिहिले. त्यात बिंदू क्र. ८ मध्ये ते लिहितात, मुस्लिम सांप्रदायिकता आता डोके वर काढण्याच्या स्थितीत नाही. इतकी दुर्बल झाली आहे. भारतात सध्या जी सांप्रदायिकता निपटून काढली पाहिजे ती हिंदू आणि शिखांची आहे. ही सांप्रदायिकता आता खूपच आक्रमक आणि असहिष्णू झालेली आहे. अलीकडच्या काही भयानक घटनांमध्ये आर.एस.एस.ने महत्त्वाची भूमिका निभावली आहे, याचे पुरावे मिळाले आहेत. .... आर.एस.एस.ला नियंत्रणात ठेवावे लागेल.

- **संघावर बंदी घालण्याची काँग्रेसची इच्छा २**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा द्वेष काँग्रेस पहिल्यापासून करत होतीच. वास्तविक भावी पाकिस्तानातील दंगली, हिंदूंचे मॉब लिंचींग व वंशविच्छेद करण्यात मुस्लीम लीगची संघटना असलेली मुस्लिम नॅशनल गार्ड्‌र्स ही संस्थाच जबाबदार होती. रा.स्व. संघ व अकाली जेमतेम प्रतिकार करत होते. पण स्युडो-सेक्युलर काँग्रेसने मुस्लिम नॅशनल गार्ड्‌र्स बरोबर रा.स्व. संघ व अकाली दलावरही बंदीची इच्छा व्यक्त केली. अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या १६ नोव्हेंबर १९४७च्या ठरावात तसे म्हटलेही.

- **विस्थापितांचे करुण आक्रंदन व संघाविषयी सहानिभूती**

मार्च १९४७ ते ऑगस्ट १९४७ व त्यानंतर आपले सर्वस्व पंजाबमध्ये नाईलाजाने सोडून अगतिकपणे भारतात आलेल्या विस्थापितांचे करुण आक्रंदन लोकांच्या अंतःकरणांना घरे पाडीत होते. त्यांच्यावर ओढवलेल्या आपत्तींची, हृदय विदारक प्रसंगांनी भरलेली एकेक कहाणी ऐकून सत्तारूढ काँग्रेस पक्षाविरुद्ध असंतोषात एकसारखी भर पडत होती. काँग्रेसचे कार्यकर्ते जनतेपासून तोंड लपवू लागले होते. काँग्रेसच्या धोरणानुसार चालणारे शासन हिंदूंच्या हिताचे रक्षण करण्यास असमर्थ असल्याची भावना लोकमानसात प्रबळ होत होती. उलट संघाच्या स्वयंसेवकांनी स्वतःच्या जीवाचा धोका पत्करून पाकिस्तानात अडकलेल्या हिंदू विस्थापितांना भारतात सुरक्षित आणण्याचे काम मोठ्या हिमतीने केले. शिवाय विस्थापितांसाठी शिबिरे उघडून त्यांची राहण्याची आणि भोजनाची व्यवस्था केली. या निरपेक्ष तसेच व्यापक प्रमाणात करण्यात आलेल्या सेवेचा सहजच लोकांवर प्रभाव पडला आणि फलस्वरूप संघाची लोकप्रियता, विश्वसनीयता आणि बळ वेगाने वाढू लागले. पंडित नेहरूंना संघाविषयी द्वेष वाटायला हे अजून एक कारण होते.

- **मुस्लिम लॉबीच्या कुचाळक्या**

भारतातून कोणीही मुसलमान पाकिस्तानात जाऊ नये म्हणून नेहरू जास्तीत जास्त प्रयत्नशील होते. त्यांची ही मानसिकता बघून व्हिक्टिम कार्ड खेळण्यात तरबेज असलेली मुस्लिम लॉबी त्यांचे कान फुंकत असे की, संघवाले बळजबरीने मुसलमानांना पाकिस्तानात हाकलीत आहेत. वस्तुस्थिती मात्र ही होती की, संघाने मानवतेला धरून मुसलमानांनाही सुरक्षितपणे त्यांच्या शिबिरात पोहोचते केले होते. सेवा कार्यात हिंदू आणि मुसलमान असा कोणताही भेद संघाने केला नव्हता. जे मुसलमान भारत सोडून पाकिस्तानात जाऊ इच्छित होते त्यांनाही योग्य संरक्षण देऊन त्यांना शिबिरात पोहोचविण्याचे काम संघाने केले होते.

- **म. गांधीजींचे अंतिम आमरण उपोषण १०**

१२ जानेवारी १९४८ या दिवशी म. गांधीजींनी घोषित केले की, जे मुस्लिम बंधू मला भेटायला येतात आणि विचारतात की, आम्ही आता काय करावे? तेव्हा माझ्याकडे या प्रश्नासाठी कोणतेही उत्तर नसते. माझी ही लाचारी मला खाऊ लागली आहे आणि आमरण उपोषण केल्यानेच ती नष्ट होईल. असे म्हणून कुणालाही कल्पना नसताना म. गांधीजींनी १३ जानेवारीच्या सकाळपासून अचानक आमरण उपोषणाला सुरुवात केली. त्यावेळी केलेल्या भाषणात ते म्हणाले, मी कबूल करतो की, हे मी त्यांच्यासाठी केले आहे. उपोषण सोडण्यासाठी महात्मा गांधीजींनी सहा अटी ठेवल्या. त्या अशा....

१. हिंदू आणि शीख मुसलमानांवरील हल्ले ताबडतोब बंद करतील आणि मुसलमानांमध्ये हा विश्वास निर्माण करतील की, ते भावांसारखे त्यांच्याबरोबर राहतील.

२. हिंदू आणि शीख या गोष्टीसाठी पूर्ण प्रयत्न करतील की, मालमत्ता आणि जीव धोक्यात आल्यामुळे एकही मुसलमान भारत सोडणार नाही.

३. चालत्या रेल्वे गाड्यांमध्ये मुसलमानांवर हल्ले होत आहेत ते तात्काळ बंद करण्यात यावे आणि त्यात भाग घेणाऱ्या हिंदू आणि शिखांना प्रतिबंध करण्यात यावा.

४. निजामुद्दीन अवलिया ख्वाजा कुतुबुद्दीन भक्ती यार काकी आणि नसिरुद्दीन चिराग देहलवी इत्यादींच्या दर्ग्यांमध्ये व मशिदींजवळपास जे मुसलमान राहत होते त्यांना परत आणून वसविण्यात यावे.

५. कुतुबुद्दीन बख्तियार काकी यांच्या दर्ग्याचे नुकसान झाले आहे. सरकार या दर्ग्याची दुरुस्ती करू शकते. परंतु प्रशिक्षित म्हणून हिंदू आणि शीख यांनी या दर्ग्याची दुरुस्ती करावी.

६. आणि हिंदू व शिखांचे हृदयपरिवर्तन होणे आवश्यक आहे आणि त्यांचे नेते यांनी आश्वासन दिले पाहिजे की पुढे असे कधीही होणार नाही.

यात हिंदूंच्या समस्यांसाठी काहीही नव्हते हे विशेष. यापूर्वीच पाकिस्तानने टोळीवाल्यांच्या रूपाने काश्मीरवर आक्रमण केले होते. अशा परिस्थितीत पाकला ५५ कोटी रुपये देण्याचा म. गांधीजींचा आग्रह होता.

१८ जानेवारीला महात्मा गांधींची प्रकृती अत्यंत बिघडली. डॉ. राजेंद्र प्रसाद ११ यांच्या घरी त्यांच्या अध्यक्षतेखाली सेंट्रल पीस कमिटीची बैठक झाली. सर्व वर्गांचे प्रतिनिधी उपस्थित होते हिंदू आणि शीख शरणार्थी, हिंदू महासभा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे नेते सुद्धा सामील होते. त्या सर्वांनी महात्मा गांधींनी उपोषण सोडावे यासाठीच्या सर्व अटी मान्य केल्याच्या पत्रावर सह्या केल्या होत्या आणि महात्मा गांधीजींना लेखी स्वरूपात भरोसा दिला गेला होता की, जे मुसलमान दिल्लीतून पाकिस्तानात गेले आहेत जर ते पुन्हा परत येऊ इच्छित असतील तर आमच्याकडून त्यांच्या परत येण्याला विरोध होणार नाही आणि ते पहिल्याप्रमाणेच आपले कामकाज करू शकतील.

### ● सरदार पटेलांनी देऊ केले त्यागपत्र

या सर्व प्रकरणामुळे आहत झालेल्या सरदार पटेल १२ यांनी महात्मा गांधीजींकडे राजीनामा देण्याची इच्छा व्यक्त केली. म. गांधीजींच्या या उपोषणादरम्यान सरदार पटेल काठीयावाड, अहमदाबाद आणि मुंबईच्या प्रवासात होते. महाराज्यपाल माऊंटबॅटन यांनी या प्रकरणात यशस्वी मध्यस्थी केली.

### ● गांधीजी! तुम्ही आम्हाला सोडून हिमालयात जा.

मात्र पंजाबमधून १ कोटी ५० लाखाच्या आसपास हिंदू विस्थापित होऊन आले होते. त्यातील काही लाख दिल्लीत होते. ते अतिशय प्रक्षुब्ध होते. नव्या दिल्लीत २९ जानेवारी १९४८ या दिवशी झालेल्या प्रार्थना सभेत म. गांधीजींनी स्वतः सांगितलेला प्रसंग असा होता...

आत्ताच बन्नू गावातील ४० लोक माझ्याकडे आले होते. ते अत्यंत त्रस्त होते; परंतु असे नव्हते की, ते चालू शकत नव्हते. त्यांच्या बोटांवर जखमा होत्या... त्यातील एक बंधू म्हणाला, तुम्ही फारच नासाडी केली आहे. काय अजूनही करत राहणार का? याहून चांगले होईल की, तुम्ही निघून जा. मोठे आहात, महात्मे आहात, म्हणून काय झाले? आमचे काम तर बिघडवत आहातच. तुम्ही आम्हाला सोडून द्या, विसरून जा, निघून जा. मी विचारले कोठे जाऊ? ते म्हणाले तुम्ही हिमालयात जा....

### ● गांधीहत्या

३० जानेवारी १९४८ला संध्याकाळी सरदार वल्लभभाई पटेल आणि महात्मा गांधीजींमध्ये चर्चा झाली. त्यात महात्माजी म्हणाले की मी या निष्कर्षापर्यंत आलो आहे की कोण्या एकाने त्याग पत्र देणे धोकादाय असेल. पंडित नेहरू सुद्धा प्रार्थनेनंतर मला भेटतील तेव्हा मी त्यांच्याशी या विषयावर चर्चा करेन आणि जर आवश्यक वाटले तर मी सेवाग्रामला जाणे स्थगित करेल आणि तोपर्यंत दिल्ली सोडणार नाही की जोपर्यंत दोघांमधील फूट पूर्णपणे समाप्त होणार नाही.

यानंतर मनू गांधी ने सांगितल्यानुसार.... गांधीजी प्रार्थना सभेसाठी आलेल्या लोकांच्या मतदारांना हात उंचावून उत्तर देत होते. अचानक गर्दी मधील कोणीतरी गर्दीला बाजूला सारून त्यांच्याकडे आला. मनोगांधीला वाटले की, तो माणूस गांधीजींच्या पाया पडण्यासाठी पुढे येत आहे. म्हणून तिने तसे करण्यापासून त्याला झिडकारले कारण प्रार्थनेची वेळ होऊन गेली होती. त्या माणसाचे हात पकडून त्याला अडवण्याचा प्रयत्न केला; परंतु त्याने मनूला जोरात धक्का दिला. त्यामुळे हातातील भजनावली, माळ यांच्यासह ती खाली पडली. तो हिंदू माणूस – नथुराम गोडसे – एकदम गांधीजींच्या समोर येऊन उभा राहिला आणि पिस्तुलातून एकापाठोपाठ एक अशा तीन गोळ्या झाडल्या. गांधीजींच्या मुखातील अंतिम शब्द निघाले ते म्हणजे हे राम, हे राम. ५ वाजून १७ मिनिटांनी महात्मा गांधीजींचे देहावसन झाले.

एका अहिंसावाद्याचा अंत झाला होता. हिंदुस्थानच्या फाळणीची ती एक महान शोकांतिका होती. फाळणीच्या व्यथेतील ती एक महान व्यथा होती. काँग्रेसच्या हातात संघाला संपविण्यासाठी एक कोलीत ऐतेच मिळाले होते.

**डॉ. गिरीष आफळे**

◈ ◈ ◈

## ।। श्रीनाथ म्हस्कोबा प्रसन्न ।।

## श्रीनाथ म्हस्कोबा साखर कारखाना लि;
## श्रीनाथनगर,

पाटेठाण, पो. राहू, ता. दौंड, जि. पुणे - ४१२२०७

कारखाना साईट : **EXABX No. ९९२३००२९२४ / ८५५१८५८८९९**

ईमेल : **smskl@rediffmail.com, smskl@shreenathsugar.com**

### कारखान्याची ठळक वैशिष्टे

- ✻ १० MW क्षमतेचा पॉवर प्लँट
- ✻ ४५०० TCD ऊस गाळप क्षमता
- ✻ ८० KLPD क्षमतेचा डिस्टीलरी व इथेनॉल प्लँट
- ✻ १० मे. टन प्र. दिन क्षमतेचा CNG प्रकल्प
- ✻ ३० टन प्र. क्षमतेचा $CO^2$ प्रकल्प
- ✻ शेतकरी बांधव व समाज सेवेसाठी कटिबद्ध
- ✻ ३ KLPD क्षमतेचा बायोमास पासून इथेनॉल निर्मिती (2G R & D) प्लँट

---

**मा. श्री. पांडुरंग आबाजी राऊत**
अध्यक्ष व कार्यकारी संचालक

**मा. ॲड. श्री. विकास रामचंद्र रासकर**
कार्याध्यक्ष

---

### संचालक मंडळ

श्री. महेश संभाजीराव करपे
श्री. हेमंत संभाजीराव करंजे
श्री. योगेश दत्तात्रय ससाणे
श्री. अनिल जयवंतराव भुजबळ
श्री. किसन दिनकर शिंदे
श्री. ज्ञानदेव तुकाराम कदम
श्री. अनिल लक्ष्मण बधे
श्री. प्रदिप दत्तात्रय लांडगे
श्री. माधव पांडुरंग राऊत
सौ. लता सतिष केंढे
श्री. हनुमंत बबन शिवले
श्री. भगवान दशरथ मेमाणे

श्री. दत्ताराम मारूती रासकर (मुख्य कार्यकारी अधिकारी) व सर्व प्रवर्तक मंडळ

---

### - मुख्य कार्यालय -

मेघदुत बिल्डींग, २ रा मजला, स. नं. १२/२, भारत पेट्रोल पंपाच्या बाजूला, जुना लोखंडी पूल रस्ता
आकाशवाणी केंद्रासमोर, हडपसर, पुणे २८

**EPABX : 8551868899, 9923002924; Super Fax No. 011-43850261**

**Email : smsklho@rediffmail.com; smsklho@shreenathsugar.com**

# रामनाम जप एक भक्तीसाधना - श्री गोंदवलेकर महाराज

श्री गोंदवलेकर महाराज यांचे नुसते नाव जरी ऐकले तरी आपल्या समोर येतो तो अखंड चालणारा राम नामाचा जप! सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यातील 'गोंदवले' हे एक गाव ज्याची ख्याती आता संपूर्ण देशात पसरली आहे ती 'श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज' यांच्यामुळे.... कारण, महाराजांनी राम नाम हे एक प्रकारे ओंकाराचे स्वरूप आहे आणि तेच सगळ्या कर्माचा तसेच साधनांचा प्राण आहेत असे विचार मांडले.

**महाराजांचे जीवन व त्यांचे कार्य :**

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात जे विख्यात महाराष्ट्रीय संत होऊन गेले त्यांच्यापैकी श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज हे एक होत. त्यांचा जन्म माघ शुद्ध द्वादशी शके १७६६ (म्हणजे १९ फेब्रुवारी इ.स.१८४५) या दिवशी गोंदवले बुद्रुक या गावी झाला. पंढरपूर हे गावापासून जवळच असल्यामळे त्यांच्या घराण्यात विठ्ठलभक्ती व पंढरीची वारी आधीपासून होतीच. तसेच पूर्वज सदाचारसंपन्न व लौकिकवान होते. ते घरी थोडी शेती करून कुलकर्णीपणाचे काम करीत. श्रीमहारांचे मूळ नाव गणेश रावजी घुगरदरे असे होय. महाराजांच्या वडिलांचे नाव रावजी लिंगोपंत कुलकर्णी तर आईचे नाव गीताबाई. स्मरणशक्ती, चलाख बुद्धी, पुढारीपणा, निर्भयवृत्ती, एकांतप्रियता, रामनामाची आवड ह्या गोष्टी श्रीमहारांमध्ये लहानपणापासूनच होत्या. ते नऊ वर्षांचे असतानाच गुरूच्या शोधार्थ घर सोडून गेले. पण त्यांच्या वडिलांना ते कोल्हापुरास आहेत असे कळल्यावर ते त्यांना परत घरी घेऊन आले. त्यांचे वयाच्या अकराव्या वर्षी विवाह करून देण्यात आला, परंतु त्यांचे प्रपंचात चित्त रमेना. आणि ते लवकरच गुरुशोधार्थ पुन्हा घर सोडून निघून गेले. त्यांनी तत्कालीन प्रसिद्ध व अप्रसिद्ध अशा सत्पुरुषांच्या भेटी घेतल्या. पण त्यांच्या मनाचे समाधान झाले नाही. ते विशेषतः उत्तर भारतात गुरूशोधार्थ हिंडले. शेवटी रामदास स्वामींच्या परंपरेतील एक थोर सत्पुरुष श्रीरामकृष्ण हे त्यांना भेटले आणि त्यांनी नांदेड जवळील येहळेगांव या गावी श्रीतुकारामचैतन्य यांचेकडे जाण्याचा सल्ला दिला. या सल्ल्यानुसार गोंदवलेकर महाराज हे श्री तुकारामचैतन्यांकडे गेले. तेथे नऊ महिने राहून त्यांनी एकनिष्ठेने गुरूसेवा केली आणि ते देहबुद्धिविरहित व पूर्ण ज्ञानी झाले. तदनंतर श्री तुकारामचैतन्यांनी त्यांचे 'ब्रह्मचैतन्य' असे नाव ठेवले, आणि गृहस्थाश्रमी राहून लोकांना भक्तिमार्गाला लावण्याची आज्ञा केली.

सद्गुरुंच्या आज्ञेप्रमाणे गोंदवलेकर महाराजांनी हजारो लोकांना रामभक्तीला लावले. त्यांचे शिष्य–प्रशिष्य विशेषतः मध्यमवर्गीय असून ते महाराष्ट्र व कर्नाटकांत बहुसंख्य असून उत्तर भारतात देखील आहेत. त्यांची प्रथम पत्नी वारल्यानंतर त्यांनी जन्मांध मुलीशी लग्न केले. त्यांनी आपल्या घरच्याच एका भागात राम मंदिर उभारले व ते सगळ्यांना दर्शनासाठी खुले केले आणि इतरत्र अनेक ठिकाणी रामाची देवळे उभारून उपासनेची केंद्रे निर्माण केली. गोंदवलेकर महाराजांनी असंख्य लोकांना व्यसनें, दुराचरण, संसारचिंता यांपासून सोडविले. कौटुंबिक कलह मिटवून अनेकांचे संसार सुखाचे केले. यासाठी त्यांनी व्यक्तिगत उपदेश, प्रवचन, भजन, कीर्तन यांचा उपयोग केला. त्यांचा लोकसंग्रह फार मोठा होता. त्यांनी गोरगरिबांना आधार दिला. तसेच दुष्काळग्रस्तांना काम देऊन अन्न धान्य मिळवून दिले. गोररक्षण, अन्नदान आदी योजना राबवल्या व वैदिक अनुष्ठाने, नामजप, भजनसप्ताह, तीर्थयात्रा करून प्रापंचिकांना परमार्थाला लावले. आधुनिक सुशिक्षितांमधील अश्रद्धा घालवून त्यांच्यामध्येही धर्माबद्दल व भक्तीबद्दल आदर उत्पन्न करून लोकांमध्ये धर्मजागृती केली. नामस्मरण हे सर्वश्रेष्ठ साधन आहे असे त्यांनी कळकळीने व बुद्धीला पटेल अशा रीतीने सांगितले. एखाद्या चमत्काराप्रमाणे रामनाम जपाचा ध्यास देऊन वासनारहित तथापि पापी लोकांना त्यांनी सन्मार्गाला लावले. 'ब्रह्मचैतन्य' असे त्यांचे सांप्रदायिक नाव व 'श्रीराम जयराम जयजयराम' हा त्रयोदशक्षरी (तेरा अक्षरांचा) मंत्र जपून रामोपासना दीक्षा महाराजांनी तंतोतंत पाळली. आपल्या गुरूंच्या रामनामोपासनेची साधना त्यांनी अंतःकालापर्यंत केली आणि रामनामोपासना सुलभ परमेश्वरप्राप्तीचा उपाय म्हणून सर्वसामान्यांना उपदेश करण्यात आयुष्य वेचले. लोकांना नामस्मरणाच्या मार्गाला लावून प्रपंच व परमार्थ यांचे मधुर मीलन कसे करावे हे शिकविण्यासाठी त्यांनी आमरण खटाटोप

केला आणि मार्गशीर्ष वद्य दशमी शके १८३५ (२२ डिसेंबर १९१३) या दिवशी गोंदवले मुक्कामी त्यांनी देह ठेवला.

**रामदासी विचारांचा प्रचार व प्रसार**

श्रीमहाराजांनी दिक्षा घेतल्यानंतर गृहस्थाश्रम स्वीकारला. परंतु त्यांच्या पारमार्थिक जीवनावर त्याचा परिणाम झाला नाही. इ.स. १८७६ व १८९६ या सालांतील दुष्काळादरम्यान गोंदवल्यातील व आसपासच्या खेड्यातील लोकांसाठी त्यांनी आपली कोठारे खुली केली. गरिबांना, वृद्धांना मोफत अन्नदान केले. म्हसवड गावात भरणाऱ्या बाजारात कसायांकडून गायी विकत घेऊन त्यांना जीवदान तर दिलेच पण त्यांच्यावर अपत्यव्रत प्रेम केले. त्यांच्यासाठी गोशाळा बांधली. स्वदेशी चळवळीला अनुकूल स्वदेशी साखर निर्मितीचा कारखाना त्यांनी काढला. तीन वेळा त्यांनी भारतयात्रा केली. आपल्या संपूर्ण आयुष्यभर त्यांनी रामदासी संप्रदायाचा प्रसार-प्रचार केला. अनेक ठिकाणी त्यांनी शनिमंदिर, दत्तमंदिर व राममंदिर बांधली.

गोंदवलेकर महाराजांचे तात्त्विक विचार

'ब्रह्मचैतन्य' महाराजांनी अद्वितीय वेद पुराणाचे तत्त्वज्ञान शास्त्रीय परिभाषेत न सांगता सामान्यांना समजेल अशा सुलभ, व्यावहारिक भाषेत समजावून सांगितले. माणसाने आपल्या जीवनात परमेश्वराचे स्मरण करून प्रपंच आनंदमय परमार्थस्वरुप करावा, असा विचार त्यांनी लोकांच्या मनावर कोरला. परमात्मा सर्वव्यापी आहे हे मर्म जाणण्याचा उपाय श्रीमहाराजांनी सांगितले. जपाने हे अनुसंधान साध्य होते. म्हणून भगवंताचे नाम हे साधन आहे. ते मीपणा नाहीसा करते, असे ते सांगत. महाराजांनी गृहस्थाश्रम स्वीकारल्यामुळे त्यांना आध्यात्मिक कार्य, नामोपदेश करणे सुलभ झाले. त्यांनी सर्व स्तरांतील लोकांना प्रवचनांनी समाधान दिले. दुःखातून मुक्त होण्याचा मार्ग सांगितला. तो मार्ग आचरणात आणावा, यासाठी त्यांनी अन्नदान, वस्त्रे, निवारा यांचीही सोय केली.

**रामनाम स्मरण हेच भक्तिसाधन**

राम नाम जप करणे हे परमेश्वरप्राप्तीचे कर्म-योग-ज्ञान या मार्गापेक्षा श्रेष्ठ आहे. भगवंताची अनेक रुपे नाहीशी झाली, तरी त्याचे नाम कायमस्वरुपी असते. जगभरातील सर्व वस्तूंचे मूलद्रव्य एकच आहे. अनेक रुपे आली तरी मूलद्रव्य कायमच राहते. म्हणून नाम श्रेष्ठ आहे, असे ते म्हणायचे. श्रीरामहाराजांनी संतांच्या उपदेशाप्रमाणेच भक्ती हे परमार्थाचे साधन असून रामनाम स्मरण हे भक्तिसाधन आहे, असे सांगितले. नाम हेच सर्वोत्तम मोक्षसाधन आहे, हा उपदेश प्रसृत करण्यात आपले जीवन समर्पित केले. आपले विचार, उपदेश, तत्त्वज्ञान, बैठक या सर्वांची तर्कनिष्ठ मांडणीही त्यांनी केली. त्यांचे संवाद, त्यांची प्रवचने यांचे सार म्हणजे नामसाधनाचे श्रेष्ठत्व होय. श्रीमहाराजांचा नामोपदेश हीच त्यांच्या जीवनाची, तत्त्वज्ञानाची ओळख होय. महाराजांचे विचार हे त्यांच्या 'प्रवचने' या ग्रंथात मांडेल आहेत. त्यांच्या साहित्य रचनेतील अभंगातील एक प्रसिद्ध वचन म्हणजे...

**'जेथे नाम तेथे माझे प्राण। ही सांभाळावी खूण।।'**

या वचनामुळे नुसता राम नाम जप केल्यास महाराज आपल्या पाठीशी उभे आहेत असे वाटते.

**श्री ब्रह्मचैतन्य महाराज, गोंदवले संस्थान :**

संत श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांचे निवासस्थान तथा राम मंदिर भक्ती आणि रामनाम मंत्राच्या शक्तीवरील शिकवण लाखो लोकांना प्रेरणा देत आहे. मंदिरात दररोज काकड आरती, भजन, अभिषेक, महाप्रसाद, विष्णुसहस्रनाम जप, सायंकाळची प्रार्थना आणि रोज आरती असे धार्मिक कार्यक्रम होतात. सदर संस्थान गोंदवलेकर महाराजांच्या शिकवणीनुसार रामनामाचा प्रसार आणि समाजसेवा करते. संस्थानतर्फे अन्नदान, गोरक्षण आणि रुग्णालय यांसारखी समाजोपयोगी कामेही केली जातात.

महाराजांनी २२ डिसेंबर १९१३ रोजी देह ठेवला. त्यांचे समाधी स्थळ हे संस्थानचे मुख्य केंद्र आहे, जिथे भाविक आणि नामस्मरणासाठी एकत्र येतात. तसेच शांत समाधी मंदिराचा अनुभव घेण्यासाठी तसेच नामजप करून आत्मिक समाधानाचा आनंद घेण्यासाठी व भक्तिभावे रमण्यासाठी यात्रेकरून येथे गर्दी करतात. ह्याच समाधी स्थळी महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त पहाटेच्या वेळी 'फुले पडण्याचा' सोहळा साजरा होतो. तसेच यावेळी महाराजांच्या मुखातील 'श्रीराम जयराम जयजयराम' हे वचन समस्त भाविकांना ऐकू येते. महाराजांच्या 'प्रपंचात राहून परमार्थ साधा' या शिकवणीनुसार, लोकांना रामनामाच्या जपाचे महत्त्व पटवून देणे आणि सन्मार्गाला लावणे हा आजही संस्थानचा मुख्य उद्देश आहे. तसेच भाविकांना येथेच गुरुमंत्र देखील दिला जातो. मंदिरामध्ये प्रत्येक भाविकांना राम नामस्मरण करावे असे आवाहन करण्यात येते त्यामुळे मंदिर परिसरात अखंड राम नामाचा जप सुरू असतो. त्यामुळे संपूर्ण वातावरणात एक वेगळीच ऊर्जा निर्माण होते आणि आलेल्या प्रत्येक व्यक्तीला ती सकारात्मकता प्रपंच व परमार्थ करण्यास प्रेरणा देते.

**ॲड. स्वाती जेरे**

# राघोजी भांगरे : ब्रिटिश राजसत्तेला आव्हान देणारा पहिला संघर्षयोद्धा

जनजाती किंवा वनवासी आणि शहरवासी यांच्यात जाणीवपूर्वक भेद उत्पन्न करण्याचा अर्बन नक्षली प्रयत्न म्हणजे देश तोडण्याचा कुटील डाव. त्यापृष्ठभूमीवर राघोजी भांगरे यांचे स्मरण करणे क्रमप्राप्त ठरते. ९ ऑगस्ट आंतरराष्ट्रीय आदिवासी दिवस साजरा करण्याचा अर्बनी जातकुळींचा नवा फंडा. १५ नोव्हेंबर भगवान बिरसा मुंडा यांची जयंती. या निमित्त देशपातळीवर जनजाती गौरव दिन साजरा करण्यात येतो. स्वातंत्र्य लढ्यात अनेक जनजातींनी संघर्ष केला. हालअपेष्टा सहन केल्या. ब्रिटिश अत्याचाराविरोधात निकराने लढा दिला. आपली संस्कृती टिकविली. त्यामुळे त्यांचे स्मरण आणि अभिवादन. या जनजातींमध्ये असाच एक योध्दा होता राघोजी भांगरे. त्यांचा जन्म (८/११/१८०५) नोव्हेंबर महिन्यात. ब्रिटिशांनी पंढरपुरात त्यांना पकडले तो दिवस २ जानेवारी १८४८. आणि एकतर्फी खटला चालवून त्यांना फासावर चढवलं. अशा जनजाती योद्ध्याचे यानिमित्त स्मरण करूया...त्यांनी केलेला संघर्ष आपल्यासाठी नेहमीच प्रेरणादायी आहे.

१८१८ मध्ये शनिवार वाड्यावर ब्रिटिशांचा युनियन जॅक फडकला. त्यानंतर ब्रिटिशांनी महादेव कोळी समाजाच्या अधिकारात किल्ल्यांची शिलेदारी, वतनदारी काढून घेतली. मराठी साम्राज्याशी एकनिष्ठ रामजी भांगरे आणि गोविंद खाडे यांनी उठाव केला. यात अग्रणी होते रामजी भांगरे यांचा मुलगा राघोजी. त्यांचा जन्म ८ नोव्हेंबर १८०५ रोजीचा. अहिल्यानगर जिल्ह्यातील देवगावचे ते रहिवासी. बालवयातच राघोजी तलवारबाजी, भालाफेक, बंदुकीने लक्ष्य साधणे, घोडेस्वारी यात तरबेज झाले. एकदा काय झाले. कोकणातील एका दरोड्यात ब्रिटिशांनी रामजीच्या कुटुंबियांवर संशय घेत रामजीचे भाऊ, नातेवाईक व महिला यांचा अनन्वित छळ केला. तिथून राघोजी आणि ब्रिटिश यांच्या संघर्षाची ही सुरवात. त्यासाठी राघोजींनी महादेव कोळी बांधवांची संघटना उभी केली. शस्त्रास्त्रे जमा केली. सैनिकी प्रशिक्षण दिले. महाड पासून त्र्यंबकेश्वर पर्यंतच्या इलाक्यात जाळे मजबूत केले. मग पुढे ब्रिटिशांवर गनिमी काव्याने हल्ले करून त्यांना जेरीस आणले.

राघोजी शंकराचे, त्र्यंबकेश्वर, जेजुरीचा खंडोबा आणि पंढरपूरच्या विठुरायाचे निस्सीम भक्त. राघोजींना नियंत्रित करण्यासाठी ब्रिटिशांनी आतोनात प्रयत्न केले. पण जनतेची मर्जी सांभाळलेले राघोजींना जनतेनेच संरक्षित केले. त्यांचा ठावठिकाणा लागणे मुश्कील. या दरम्यान ब्रिटिश कॅप्टन मार्किन्तोशी जुन्नर येथे राघोजींनी दोन हात केले. या लढाईत राघोजींच्या सैन्याने ब्रिटिशांना नाकी नव आणले. नंतरच्या काळात ब्रिटिशांनी राघोजी भांगरेशी लढताना युध्दाचे तंत्र बदलले. तरीही राघोजीनी संघर्ष आणि हल्ले थांबवले नाहीत. या दरम्यान वरचढ ठरलेल्या ब्रिटिशांनी राघोजी भांगरे यांच्या सोबतच्या सहकार्यांचा छळ आरंभला. त्यांना चुकवण्यासाठी राघोजी हरिश्चंद्र गडावरील शंकराच्या दर्शनाला जाउन आले. शिवाय भीमाशंकर, त्र्यंबकेश्वर जेजुरीचा खंडोबा या ठिकाणीही वेषांतर करून गेले होते. तरीही ब्रिटिशांची त्यांच्यावर पाळत होती. युद्धजन्य परिस्थिती तर होतीच. या संघर्षाच्या वातावरणात राघोजींनी :धाडस केले आणि वेष पालटून पंढरीच्या विठुरायाच्या दर्शनाला गेले. तो दिवस होता, २ जानेवारी १८४८. राघोजीनी चंद्रभागेत स्नान केले. विठुरायाचे दर्शन घेऊन पुन्हा चंद्रभागेच्या वाळवंटात दाखल झाले. या दरम्यान साध्या वेशातील ब्रिटिश सैनिक राघोजींच्या मागावर होतेच. तेव्हा राघोजी निःशस्त्र होते. त्यामुळे राघोजींना पकडणे ब्रिटिशांना सोपे झाले. तिथून पुणे, ठाणे येथील तुरुंगात डांबून ठेवले. तिथेच एकतर्फी खटला चालवला.

निकालही त्यांच्याच (ब्रिटिशांच्या) बाजूने दिला. नंतर ठाण्याच्या तुरुंगात २ मे १८४८ रोजी राघोजी भांगरे यांना फासावर चढवले. सह्याद्रीचा हा ढाण्या वाघ स्वातंत्र्यासाठी आणि देशासाठी फासावर चढला, पण राघोजी भांगरे यांचे बलिदान वाया गेले नाही. सह्याद्री कधीही इंग्रजांच्या दबावाखाली शांत बसला नाही. संस्कृती टिकवून ठेवणारा समाज भारतीय जनतेने देश स्वतंत्र होईपर्यंत विविध मार्गांनी लढाई आणि संघर्ष सुरूच ठेवला.


महादेव कोळी समाज आजही देशभक्त, धर्मनिष्ठच आहे. ख्रिश्चनांनी आटोकाट प्रयत्न करूनही तो स्वतःचा हिंदू धर्म टिकवून आहे. हा समाज हिंदू धर्मापासून दूर गेलेला नाही. आम्ही सारे एक आहोत हा भाव देशातील जनजाती समाजाने टिकवून ठेवला आहे. वनवासी बांधव या देशातील सनातन संस्कृतीचेच वाहक आहेत. ही संस्कृती त्यांनी टिकवून ठेवली आहे. ते परिश्रमी आणि सन्मार्गाने जगणारे आहेत. शौर्य आणि स्वाभिमान ही त्यांची विशिष्ट ओळख आहे. एका दिव्य आणि आदर्श समाजाचे दर्शन म्हणजेच वनवासी बांधवांचे दर्शन.

कावेबाजपणा ओळखायला हवा राष्ट्रीय संघर्षातही वनवासी बांधवच सदैव अग्रणी राहिले आहेत. इंग्रजांची शक्ती वाढू लागल्यानंतर एकोणीसाव्या शतकाच्या प्रारंभी इंग्रजांनी संपूर्ण भारतावर कब्जा मिळवला. मात्र यावेळी त्यांना सर्वात मोठा संघर्ष जनजातींशीच करावा लागला. महाराष्ट्र, मध्यप्रदेश, ओडिशा किंवा केरळ असेल किंवा नागालँड, आसाम, मेघालय वा अरुणाचल असेल. येथेच इंग्रजांना मोठा संघर्ष करावा लागला, हे लक्षात घ्यावे लागेल आणि हा संघर्ष जनजाती बांधवांनी केला होता. जनजातींचे स्वातंत्र्य लढ्यात मोठे योगदान राहिले आहे. जनजाती विरुद्ध शहरवासी हा संघर्ष आज हेतूतः अर्बन नक्षली निर्माण करीत आहेत. हिंदूंमध्ये फूट पाडण्याची ही खेळी आहे. हा कावेबाजपणा समजून घेणे ही गरज आणि आवश्यकता आहे.


**विजयकुमार पिसे**

**विभाग सहमंत्री विहिंप.**

◈ ◈ ◈




बहुत ही कठिनाई से मिला है यह प्राचीन सर्व शाश्वत सनातन हिंदू धर्म व्यवस्था पत्रक... इसे सम्भाल कर रखिए...
भविष्य में हमारी पीढ़ियां के काम आएगा... बहुत उपयोगी माहिती है।
शाश्वत सनातन



# निरंतर युद्धाची पुनर्प्रचिती!

मुर्तीपूजकांच्या टोकाच्या विरोधातून जन्माला आलेल्या, ज्यांच्या प्रचाराचा आणि प्रसाराचा इतिहास केवळ आणि केवळ रक्तरंजित आहे त्या पंथाचा, हिंदू विचारा बरोबरचा लढा चिरंतन आणि निरंतर आहे हे वारंवार सिद्ध होत असूनही धर्म निरपेक्षतेचा विंचू चावलेले काही बावळट, ज्यांना राजकारण, सत्ता हेच सर्वस्व वाटते असे सत्तांध ह्यांनी एक धादांत खोटा विमर्श माध्यमातून, साहित्यातून, आणि सरकारी यंत्रणेतून निर्माण केला तो म्हणजे अतिरेक्यांना धर्म नसतो!

ह्या प्रकारचे विमर्श निर्माण करणारी मानसिकता स्वातंत्र्यपूर्व काळात जन्माला आली त्यातून जे घडत गेले ते हिंदूंची आणि आमच्या देशाची पाठ अजूनही सोडायला तयार नाही. ह्या मानसिकतेतून खिलापत चळवळ झाली. मोपल्यांनी हिंदूंवर अत्याचार केले. स्वामी श्रद्धानंद ह्यांचा खून झाला. वन्दे मातरम् ची चिरफाड झाली. फाळणीची शोकांतिका निर्माण झाली. १५५ कोटीचा मलिदा पाकिस्तानला मिळाला आणि काश्मीर ही कायमस्वरूपी जखम भारतमातेच्या भाळी निर्माण झाली.

जेंव्हा ह्या पंथाची स्थापना झाली त्यावेळी जन्माला आलेले शब्द जिहाद, दार उल अरब, दार उल इस्लाम, मूर्तीभंजक, काफर! ह्या शब्दांनी जी जीवन शैली निर्माण झाली त्यातून जगातील शांतता धोक्यात आली. दुसऱ्या तत्वांना न मानण्याची असहिष्णू वृत्ती जन्माला आली. दुसऱ्यांची संपत्ती लुटण्याच्या राक्षसी प्रवृत्तीला, धार्मिक स्थळे उध्वस्त करण्याला आणि स्त्रियांवर अत्याचार करण्याला एक तथाकथित धार्मिक अधिष्ठान दिले गेले. असे करणारे धर्मयोद्धे ठरू लागले आणि त्यांना जन्नत म्हणजेच स्वर्गाचे दार उघडले जाते असे तत्वज्ञान मांडले गेले.

ह्या अमानवी, हिंस्त्र, राक्षसी वृत्तीशी आमचा हिंदू समाज गेली दोन हजार वर्षे लढतो आहे. सर्वसामान्य हिंदू हा विजगेषु आणि लढावू आहे पण ज्या ज्या वेळी आमचे नेतृत्व ढेपाळले, पुरुषार्थ विसरले त्यावेळी हिंदू समाजाला पराभूत व्हावे लागले. म्हणूनच २६/११ घडले तेंव्हा आमच्या सैन्याची क्षमता असूनही आम्ही थंड राहिलो आणि पुलवामा, पहलगाम घडल्यावर आम्ही अतिरेक्यांना आणि त्यांच्या आश्रयदात्यांना त्यांची जागा दाखवू शकलो. छत्रपती शिवराय, संभाजी राजे, ताराबाई, राणा प्रताप, पृथ्वीराज, दाहिर, राजा रणजितसिंह, लाचीत बड फुकन अशी अनेक पुरुषार्थी नेतृत्व होते तेंव्हा ही विषवल्ली पराभूत झाली होती पण मुळापासून उखडली गेली नव्हती. संधी मिळताच ती फोफावत होती. स्वातंत्र्यानंतर धर्मनिरपेक्ष नावाचे खत त्याला मिळाले आणि ती फोफावतच गेली.

हे सेक्युलर खत एकीकडे ही विषवल्ली वाढवत असताना ह्या देशातील हिंदुत्वाची सनातन अमृतवेल मात्र कोमेजून गेली होती.

ह्या विषवल्ली मुळे जे घडले आहे, घडते आहे ते पुन्हा एकदा दिल्ली बॉम्ब स्फोटातून स्पष्ट होते आहे. शिक्षण हा प्रश्न आहे शिकले की त्यांच्यामधला धार्मिक उन्माद कमी होईल असे मूर्खपणाचे गृहितक मांडले जातात. रोजच्या पोट पाण्याचा प्रश्न आहे त्यामुळे अतिरेकी निर्माण होतात असे एक दुधखुळे गृहितक आहे. ही सगळी गृहितके वेळोवेळी खोटी ठरत असताना केवळ मतांची लाचारी आणि भोंगळ आशावाद, तथाकथित पुढारले पणाच्या आणि पुरोगामी पणाच्या भ्रामक कल्पना ह्यातून आमची अंतर्गत सुरक्षा आणि सीमेवरील सुरक्षा दोन्ही धोक्यात आल्या आहेत.

ह्या घटनेअगोदर काही दिवस गुजराथ मॉडेल उघडकीस आले आणि प्रचंड मोठा रासायनिक साठा बायोवेपन म्हणून वापरला जाणार होता तो जप्त केला गेला. त्यातून ही डॉक्टरांची साखळी उघडकीस येत होती. जर हे उघडकीस आले नसते आणि हे जिहादी आपल्या हेतू मध्ये यशस्वी झाले असते तर काय भयानक घडले असते ह्याची कल्पना केली तर संकटाची गंभीरता लक्षात येऊ शकते. पण व्यक्तीद्वेष हा जेंव्हा देशहिता पेक्षा मोठा होतो, स्वार्थ आणि सत्ता पिपासु वृत्ती जेव्हा मानवी मूल्यांच्या पेक्षा महत्वाची ठरते तेव्हा अतिरेकी मनसुबे हे राजकीय स्वार्थापोटी छोटे ठरतात.

पहलगाम झाले त्यानंतर ऑपरेशन सिंदूर झाले. आमच्या शूर सैनिकांनी पराक्रमाने योग्य ती शिक्षा शत्रू राष्ट्राला दिली पण

ह्या शत्रू राष्ट्राच्या जीवन निष्ठा, ह्या शत्रू राष्ट्राच्या निर्मितीमागील अधिष्ठान आणि भारतातील उन्मादी लोकांच्या जीवन निष्ठा आणि अधिष्ठान एकच आहे. त्यामुळे त्यांना येथे स्लीपर सेल गावोगावी गल्ली गल्ली मध्ये मिळाले आहेत. त्या साठी मदरसे आणि मशिदीतील मुल्ला मौलवी हे धर्मग्रंथात असणारा प्रत्येक आयातीचा योग्य अर्थ समजावून सांगण्यास सिद्ध आहेत.

मूर्ख आम्ही हिंदू आहोत जे गंगा जमुना तहजिब आणि सेक्युलॅरिझम ची माळ ओढत आंधळे होत आहेत.

तिकडे न्यूयॉर्क येथे खान नावाचा मेयर झाला तर त्याचे अभिनंदन करणारे मूर्ख हिंदू इथे निपजत आहेत. गाझा मध्ये काही झाल्यावर save gaza म्हणून टी शर्ट घालून फिरणारे सध्या क्रिकेटच्या निवडणुकीत busy आहेत त्यामुळे असल्या अतिरेकी कारवाया किंवा निष्पाप हिंदूंच्या मृत्यूबद्दल निर्विकार आहेत. स्वार्थी राजकारणी जाती जाती मध्ये, भाषे भाषेत भांडणे लावत आहेत पण पुढच्या हिंदू समाजापुढील भविष्यात येणाऱ्या संकटाकडे शहामृगी वृत्तीने दुर्लक्ष करत आहेत.

जो पर्यंत भारतातील मशिदी, मदरसे हे अतिरेकी बनवणारे केंद्र असतील, जो पर्यंत येथील मुस्लिम समाज जिहाद, काफर ह्या संदर्भातील धर्मग्रंथात त्यावेळी असलेल्या कल्पना सद्यस्थिती मध्ये नाकारणार नाही तो पर्यंत व्यक्तिगत पातळीवर कितीही चांगला असणारा आपला मुस्लिम मित्र, शेजारी, नेता हा सामूहिक जमावात कधीच हिंदू च्या बाजूने उभा राहणार नाही हे कटू सत्य आहे. सेमिटिक पंथाच्या धर्मग्रंथात असणारी टोकाची द्वेष मूलक अवतरणे जो पर्यंत त्याचे आजचे अनुयायी नाकारत नाहीत तोपर्यंत जगात अशांतता, युद्धरूप वातावरण हे कायमस्वरूपी राहणारच हे मान्य करावे लागेल.

डॉक्टर असो, इंजिनिअर असो हिंदू समाजाबद्दलची आपली भावना त्यांच्या धर्मग्रंथ मध्ये जशा आहेत तशा असतील तर अतिरेकी येथे निर्माण होणारच! त्यासाठी केवळ पाकिस्तानला दोष देता येणार नाही. पाकिस्तान निर्माण व्हावा अशी इच्छा असणारे बहुसंख्य मुस्लिम हे स्वतंत्र भारतात राहिले. पाकिस्तानात गेले नाहीत हे कटू सत्य नाकारण्याचे काही कारण नाही.

इतका मोठा दारूगोळा आणि एके ४७ बाळगणारे डॉक्टर असतील तर वैद्यकीय सेवेसारख्या पवित्र व्यवसायाचा हा घोर अपमान आहे. ह्या क्षेत्रातील सर्व संघटनांनी ह्याचा निषेध करून भविष्यात असे अतिरेकी आपल्या पेशात निर्माण होणार नाहीत ह्याची आवश्यक खबरदारी घेतली पाहिजे. वैद्यकीय व्यवसाय हा माणसाचा जीव वाचवण्यासाठी आहे. त्याला वेदनांच्या मधून सुटका करण्यासाठी आहे. पण येथे उच्चशिक्षित डॉक्टरच माणसांच्या जीवावर उठले आहेत कारण व्यावसायिक नीतिमत्तेपेक्षा धार्मिक ग्रंथातील जिहादी प्रेरणा ह्या प्रभावी ठरत आहेत.

असे हल्ले होतात तेव्हा हे लुटियन्स, हे सेलिब्रेटी, हे धर्मनिरपेक्ष वादी कुठे बिळात जाऊन लपतात? सोयीस्करपणे अबू आझमी म्हणतो सरकारची ही जबाबदारी आहे पण तो शाहीन, मुझमिल, उमर, आदिल आणि ह्या सगळ्यांचा निषेध करत नाही. एकीकडे आपल्या हिंदूंच्या धार्मिक संवेदना, परंपरा आणि संस्कृती ह्या ढिल्या होत असताना, जिहादी, धर्मांध आणि उन्मादी फास आवळले जात असतील तर ती धोक्याची सूचना आहे. आणि हे प्रश्न हाताळताना उद्या आंतरराष्ट्रीय दबाव निर्माण होणार असतील तर आमच्या अस्तित्वासाठी कठोर निर्णय घेण्यासाठी सरकारच्या मागे उभे राहावे लागेल. त्यासाठी आपले सुरक्षित कवच, आपली अलिप्त वृत्ती आणि छोटे छोटे अभिमान सोडावे लागतील. मोहम्मद बीन कासिम पासून सुरू झालेल्या ह्या निरंतर युद्धाचा शेवट तरच होवू शकतो, हेच दिल्ली घटनेचे आपल्याला सांगणे आहे.

**रवींद्र मुळे**

◈ ◈ ◈



# दत्तोपंत ठेंगडी

- **दत्तोपंत ठेंगडी: आजच्या आर्थिकदृष्ट्या विनाशकारी जगात आर्थिक धोरणांबद्दल त्यांच्या भारतीय दृष्टिकोनाची तातडीची गरज**

१० नोव्हेंबर १९२० रोजी, श्री दत्तोपंत ठेंगडी यांचा जन्म महाराष्ट्रातील वर्धा जिल्ह्यातील आर्वी या गावात झाला. त्यांनी नागपूरच्या लॉ कॉलेजमधून एलएलबी आणि मॉरिस कॉलेजमधून पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. १९४० मध्ये जेव्हा एम.एस. गोळवलकर गुरुजी यांची दुसरे सरसंघचालक म्हणून नियुक्ती झाली, तेव्हा त्यांनी संघटनेची व्याप्ती वाढवण्यासाठी तरुणांना पूर्णवेळ आरएसएस प्रचारक म्हणून सेवा करण्यास जोरदार प्रोत्साहन दिले. निमंत्रणाला प्रतिसाद म्हणून, ठेंगडी जी १९४२ मध्ये रा स्व संघात प्रचारक म्हणून सामील झाले आणि १४ ऑक्टोबर २००४ रोजी वयाच्या ८४ व्या वर्षी त्यांच्या मृत्यूपर्यंत प्रचारक राहिले. त्यांना अधिकारपदांची कोणतीही इच्छा नव्हती. या कारणास्तव, त्यांनी एनडीए सरकारने जाहीर केलेला पद्मभूषण पुरस्कार घेण्यास नकार दिला. ठेंगडी जी यांचे वर्णन अनेकदा मूक रणनीतिकार म्हणून केले जात असे. ते अतिप्रतिक्रियाशील वक्ते नसून दूरदृष्टी असलेले शिल्पकार होते. दीर्घकालीन बदलासाठी मजबूत संस्था, शिस्त आणि स्पष्ट विचारसरणी आवश्यक आहे असे त्यांचे मत होते.

नेतृत्वाचे नियमन करण्याऐवजी, त्यांनी पार्श्वभूमीत राहून त्याला चालना देण्यासाठी काम केले. त्यांना ओळखणारे लोक त्यांची नम्रता, राष्ट्रवादी विचारांवरची त्यांची अढळ श्रद्धा आणि तत्वज्ञान, अर्थशास्त्र आणि इतिहासाची त्यांची समज आठवतात. त्यांचे कार्य सांस्कृतिक संबंध आणि आर्थिक व्यावहारिकतेचे एक अद्वितीय मिश्रण दर्शवते. दीनदयाळ उपाध्याय यांनी प्रसारित केलेल्या एकात्म मानवदर्शनाच्या जागतिक तत्वज्ञानाने तसेच भारताच्या संस्कृतीवादी नीतिमत्तेने त्यांच्यावर प्रभाव पडला.

- **जागतिक आर्थिक समस्या विरुद्ध हिंदू आर्थिक व्यवस्था**

जागतिकीकरण, ज्यामुळे जागतिक पातळीवर असमानता आणि मानवी हक्कांचे उल्लंघन वाढले आहे, ते पाश्चात्य जगाने निर्माण केले आहे. श्रीमंत अधिक श्रीमंत होत आहेत आणि गरीब अधिक गरीब होत आहेत. जगातील बहुतेक संपत्ती १% लोकांकडे आहे. दावोस इकॉनॉमिक फोरममध्ये सादर करण्यात आलेल्या ऑक्सफॅम अहवालानुसार, जगातील आठ सर्वात श्रीमंत लोकांची संपत्ती जगातील ४ अब्ज लोकसंख्येच्या सर्वात गरीब अर्ध्या लोकांइतकी आहे. याव्यतिरिक्त, उपासमार दरवर्षी ८ दशलक्ष लोकांचा जीव घेते, तर उपचार करण्यायोग्य आणि उपचार न केलेले दोन्ही आजार समान संख्येने लोकांचा जीव घेतात.

दत्तोपंत ठेंगडी जी यांनी प्रगत देश लहान देशांचा फायदा घेण्याच्या शक्यतेबद्दल गंभीर चिंता व्यक्त केली होती. काही प्रगत देश (विकसित राष्ट्रे किंवा त्यांचे वैचारिक नेते) पर्यावरणीय संतुलनासाठीच्या प्रयत्नांना सहकार्य करू इच्छित नाहीत परंतु त्यांचे प्रदूषण विकसनशील देशांच्या खांद्यावर टाकतात, असे ते म्हणाले. तथापि, हा दृष्टिकोन जागतिक पर्यावरणीय आपत्ती फार काळ रोखू शकणार नाही आणि पाश्चात्य राष्ट्रे स्वतःही यातून सुटणार नाहीत. संकटे शेवटी सर्वत्र समृद्धीचा नाश करतील कारण जग फक्त एकच आहे. आर्थिक परिस्थिती पाया म्हणून काम करते.

त्यांच्या ग्लोबल इकॉनॉमिक सिस्टीमः द हिंदू व्ह्यू या पुस्तकात, ठेंगडीजी यांनी असा युक्तिवाद केला की युरोकेंद्रित इतिहासाच्या सध्याच्या आवृत्तीचा त्याग करणे अपरिहार्य आहे, जी प्रमाणाची भावना नसलेली आहे आणि ऐतिहासिक तपासाचा एक नवीन टप्पा, एक नवीन चौकट, नवीन संदर्भ अटी, मूल्यांचा एक नवीन स्तर सुरू करणे अपरिहार्य आहे, जे जागतिकीकरणाला चालना देईल. याव्यतिरिक्त, त्यांनी यावर भर दिला की हिंदू धर्माची संकल्पना ही अशी अर्थव्यवस्था निर्माण करण्यासाठी सर्वोत्तम चौकट असू शकते जी केवळ भौतिक संपत्तीच्या अविरत, स्पर्धात्मक पाठलागाऐवजी सामाजिक सुखाच्या आदर्शाला प्राधान्य देते.

शास्त्रे आणि स्मृतींसारख्या हिंदू धार्मिक ग्रंथांमध्ये नमूद केलेले कायदे ठेंगडीच्या हिंदू आर्थिक व्यवस्थेचा पाया म्हणून काम करतात. पाश्चात्य आर्थिक विचारसरणीने प्रोत्साहन दिलेल्या

मजुरी–रोजगार च्या विपरीत, त्यांनी प्रगती आणि विकासाच्या हिंदू मॉडेलचे वर्णन स्वयंरोजगार हे त्याच्या प्रमुख वैशिष्ट्यांपैकी एक असल्याचे केले. इतक्या मोठ्या संख्येने लोक सरकारी कामगार दलात सामील होऊ शकत नाहीत. पाश्चात्य आर्थिक धोरणाचे वैशिष्ट्य असलेल्या सर्वहारा वर्गाच्या वाढत्या सैन्याच्या उलट, सतत वाढणारे स्वयंरोजगार क्षेत्र स्थापित करणे हे उद्दिष्ट असायला हवे.

हिंदू आर्थिक तत्वज्ञान हस्तक्षेपित बाजारपेठांशिवाय मुक्त स्पर्धा प्रोत्साहित करते जिथे निसर्गाचे शोषण केले जात नाही तर निसर्गाचे संगोपन केले जाते आणि चळवळ समता आणि समानतेकडे आहे. व्यक्ती, समाज आणि निसर्ग यांच्यातील संपूर्ण सुसंवाद याला ते प्रोत्साहन देते. तथापि, पाश्चात्य दृष्टिकोनामुळे व्यक्ती, समाज आणि निसर्ग यांच्यात सतत संघर्ष आणि समाजात सतत वाढत जाणारी विषमता निर्माण होते.

आपल्या परंपरेनुसार, जेव्हा सर्व पक्ष एकमेकांबद्दल आदर आणि सामायिक जबाबदारीची भावना बाळगून त्यांच्या जबाबदाऱ्या पार पाडतात तेव्हा समाज सर्वोत्तम कार्य करतो. सहकार्य ही कल्पना हे प्रतिबिंबित करते. कर्मचारी उत्पादनाच्या साधनांपेक्षा आर्थिक प्रक्रियेत सह–निर्माते आहेत. श्रमिक को सम्मान। आणि लोक कल्याण या प्राचीन भारतीय संकल्पना कर्मचाऱ्यांनी व्यवस्थापन आणि नफा वाटणीमध्ये सक्रियपणे सहभागी व्हावे या कल्पनेशी सुसंगत आहेत.

- **स्वावलंबन का महत्त्वाचे आहे?**

स्वदेशी अर्थशास्त्राचे संस्थापक ठेंगडी जी यांच्या मते, स्वदेशी केवळ उत्पादने आणि सेवांशी संबंधित नाही. ते राष्ट्रीय स्वयंपूर्णता प्राप्त करण्याच्या, राष्ट्रीय स्वातंत्र्य आणि सार्वभौमत्व राखण्याच्या आणि समान आंतरराष्ट्रीय सहकार्यात सहभागी होण्याच्या दृढनिश्चयाशी संबंधित आहे. स्वदेशी ही देशभक्तीच्या भावनांची व्यावहारिक, बाह्य अभिव्यक्ती आहे. अलगाववादी विचारसरणी राष्ट्रीयतेच्या भावनेसारखी नाही. देशभक्त जागतिकीकरणाला विरोध करत नाहीत. जोपर्यंत आंतरराष्ट्रीय सहकार्याला समान वागणूक दिली जाते तोपर्यंत राष्ट्रीय स्वावलंबनासाठीचा त्यांचा युक्तिवाद त्याच्याशी विसंगत नाही.

त्यांच्या तिसरा मार्ग या लेखनाने स्वदेशी अर्थशास्त्राचा पाया म्हणून काम केले. भांडवलशाही आणि साम्यवादाची जागा घेण्याचा एकमेव पर्याय म्हणजे धर्माच्या तत्त्वांवर आधारित अर्थव्यवस्था आणि समाजाकडे हिंदू दृष्टिकोनातून पाहणे. त्यांच्या आदर्श समाज आणि अर्थव्यवस्थेत, स्वयंरोजगार, मुक्त स्पर्धा, समानता आणि व्यक्ती, समुदाय आणि नैसर्गिक जग यांच्यातील संपूर्ण सुसंवाद हे सर्व भरभराटीला येईल.

पाश्चात्य विचार समस्याप्रधान आहे कारण ते सतत विखुरलेले आणि विभागलेले आहे. हिंदू आर्थिक विचार नेहमीच व्यापक आणि एकात्मिक आहे. पाश्चात्य विचारसरणीचा असा विश्वास आहे की अर्थशास्त्राचा अभ्यास आर्थिक समस्या सोडवण्यास मदत करू शकतो, राजकीय विज्ञानाचा अभ्यास राजकीय समस्या सोडवण्यास मदत करू शकतो, इत्यादी. ही विचारसरणीची एक विकृत पद्धत आहे. विविध गैर–आर्थिक घटकांचा विचार न घेता कोणत्याही आर्थिक आजाराचे अचूक निदान करणे आणि सर्वोत्तम सुधारात्मक कृती करणे कठीण आहे. विविध गैर–आर्थिक घटकांचा विचार करा. हे सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक यासह इतर सर्व क्षेत्रांना लागू होते. आर्थिक समस्यांचे विश्लेषण करताना गैर–आर्थिक घटकांचे महत्त्व कमी लेखणे चुकीचे आहे.

मानवी कल्याणाच्या गैर–आर्थिक भौतिकवादी पैलूंकडे दुर्लक्ष करणे अशक्य आहे. उदाहरणार्थ, देशाचे भौगोलिक स्थान, तापमान, नद्या, पर्वत, नैसर्गिक बंदरे, शांतता आणि सुरक्षितता किंवा त्याची नैसर्गिक संसाधने, ज्यामध्ये जमीन, पाणी, जंगले, खनिज संसाधने, कृषी क्षमता आणि सामान्य विकास यांचा समावेश आहे, म्हणून, आर्थिक बाबतीत मोजता न येणारे गैर–आर्थिक भौतिकवादी विषय देखील यामध्ये भूमिका बजावतात.

तथापि, एवढेच नाही. डेव्हिड मॅक्रोड राईट यांनी त्यांच्या १९५७ च्या द ओपन सीक्रेट ऑफ इकॉनॉमिक ग्रोथ या पुस्तकात असेच म्हटले होते की आर्थिक विकासासाठी मूलभूत घटक गैर–आर्थिक आणि गैर–भौतिक आहेत. शरीराची रचना आत्म्यानेच केली आहे.

हिंदू आणि पाश्चात्य विचारांमधील तीव्र विरोधाभास विचारात घेतले पाहिजेत.

- पश्चिम विरुद्ध हिंदू विकास संकल्पना

१. विभाजित विचार विरुद्ध एकात्मिक विचार,

२. माणूस – एक केवळ भौतिक अस्तित्व विरुद्ध माणूस – एक शारीरिक, मानसिक, बौद्धिक आणि आध्यात्मिक अस्तित्व

३. अर्थ–कामाच्या अधीनता विरुद्ध पुरुषार्थ चतुष्टयम.

४. समाज, स्वकेंद्रित व्यक्तींचा समूह विरुद्ध समाज, एक शरीर ज्याचे सर्व सदस्य अवयव म्हणून आहेत

५. स्वतःसाठी आनंद विरुद्ध सर्वांसाठी आनंद

६. संपादनशीलता विरुद्ध 'अपरिग्रह'

७. नफा-हेतू विरुद्ध सेवा हेतू

८. उपभोगवाद विरुद्ध प्रतिबंधित उपभोग

९. शोषण विरुद्ध अंतोदय, शेवटच्या माणसाचे कल्याण

१०. बाह्य कर्तव्यांची हक्क-केंद्रित जाणीव विरुद्ध इतरांची कर्तव्य-केंद्रित जाणीव

११. निर्माण केलेली टंचाई विरुद्ध उत्पादनाची विपुलता

१२. विविध साधनांद्वारे मक्तेदारी भांडवलशाही विरुद्ध हाताळलेल्या बाजारपेठेशिवाय मुक्त स्पर्धा

१३. आर्थिक सिद्धांत केंद्रीत फेरीत वेतन-रोजगार विरुद्ध स्वयंरोजगार केंद्रित आर्थिक सिद्धांत

१४. सर्वहारा वर्गाची वाढती फौज विरुद्ध विश्व कर्माचे वाढती क्षेत्र (स्वयंरोजगार)

१५. सतत वाढती विषमता विरुद्ध गुणवत्तेसह समता आणि समानतेकडे वाटचाल

१६. निसर्गावर अत्याचार विरुद्ध निसर्ग मातेचे संगोपन

१७. व्यक्ती, समाज आणि निसर्ग यांच्यातील सतत संघर्ष विरुद्ध व्यक्ती, समाज आणि निसर्ग यांच्यातील संपूर्ण सुसंवाद.

प्रत्येक संस्कृतीचे स्वतःचे एक मॉडेल असते. परकीय स्वार्थांनी लादलेले किंवा दुसऱ्या सांस्कृतिक संदर्भातून आयात केलेले विकास मॉडेल हानिकारक असू शकते. रिलीजन आणि धर्म एक नाहीत, जगाने रिलीजन पेक्षा धर्माची शक्ती ओळखली पाहिजे, जी (रिलीजन) कम्युनिस्ट विश्लेषणात अफू म्हणून ओळखली जाते. तथापि, ठेंगडी जी भांडवलशाही आणि साम्यवादाच्या संकल्पनांच्या पलीकडे जाऊन धर्म च्या बौद्धिक पायांमध्ये खोलवर गेले. आणि त्याच सिद्धांतावर, पंतप्रधान मोदींच्या आत्मनिर्भर भारत या आवाहनाचे खरे तात्विक महत्त्व समजून घेणे आणि या जागतिक संकटाचा आणि त्याच्या नकारात्मक परिणामांचा सामना करणे हे ठेंगडीजींचे दृष्टिकोन समजून घेऊन साध्य करता येईल.

**पंकज जयस्वाल**

◈ ◈ ◈

गरम गरम भुईमुगाच्या शेंगांची पाटी समोर आणून ठेवतो.
पाटी भोवती बसून शेंगा फोडून, खायला सुरूवात करतो.
अशातच शेंगा फोडत असताना एखाद्या
शेंगेतील शेंगदाणा हातातून खाली पडतो. आणि
खालच्या टरफलांमध्ये गायब होतो.
आपण मग तो बोटाने शोधायला सुरूवात करतो.
अगदी अर्धा ते एक मिनिटाची ही क्रिया,
पण शेजारी पाटीभर शेंगा असूनही त्या
एका शेंगदाण्याला आपण शोधत बसतो.. थोडेसे वैतागतो..
या नादात जवळ बसलेली व्यक्ती, शेंगा जास्त संपवते..
आयुष्याचे देखील असेच आहे.
पाटीभर 'आनंद' शेजारी असूनही,
आपण कण भर आनंदासाठी झुरतो...
पाटीकडे लवकर कधी लक्ष जातच नाही आणि
जेव्हा पाटीकडे वळतो तेव्हा ती रिकामी झाल्याचे दिसून येते.
आयुष्य खूप सुंदर आहे.. त्याला अनुभवा....
गेलेल्या क्षणासाठी झुरत बसण्यापेक्षा समोर
असलेलं आयुष्य भरभरून जगा.......




## जो बोले सो निहाल सत श्री अकाल

कार्तिक शुद्ध १५ संवत १५२६ शीख संप्रदायाचे पहिले धर्मगुरु गुरु नानक देवजी यांचा जन्मदिन! शीख पंथाचे पहिले धर्मगुरू म्हणून त्यांनी शीख पंथाची सेवा केली. गुरू नानक देवजी धर्मसुधारक, समाज सुधारक, कवी, राष्ट्र भक्त व विश्व बंधू होते. आजच्या पवित्र दिवसाचे औचित्य साधून विहिंप कसबा जिल्ह्यातर्फे लष्कर भागातील गुरूद्वारा गुरू नानक दरबार येथे जाऊन दर्शन घेतले. सदर प्रसंगी प्रांत मंत्री श्री किशोरजी चव्हाण, जिल्हा बजरंग दल संयोजक श्री विक्रम घुंगुरवाले, जिल्हा सेवा प्रमुख श्री शैलेश जाधव व बजरंगी उपस्थित होते. गुरुद्वाराचे प्रमुख विश्वस्त श्री चरणजीतसिंह साहनी यांनी सर्वांचे स्वागत केले, तसेच श्री किशोरजी यांचा सत्कार सुद्धा करण्यात आला.

# अशी पाखरे येती...

कवी – मंगेश पाडगांवकर

संगीतकार – यशवंत देव

गायक – सुधीर फडके

सुप्रसिद्ध कवी आणि संगीतकार यशवंत देव, यांनी संगीतबद्ध केलेली, पद्मभूषण पुरस्कार, आणि साहित्य अकादमी पुरस्कार विजेते प्रतिभावंत कवी, मंगेश पाडगांवकर यांची ही कविता. याचंच पुढे ध्वनिमुद्रण होऊन, हे भावगीत या त्रयींनी कालातीत, करून ठेवलं.

१९६२ सालापासून आकाशवाणीवर मभावसरगमफनावाचा एक नवीन भावगीतांना व्यासपीठ मिळवून देणारा कार्यक्रम सुरू झाला होता. तो कवी आणि संगीतकार यशवंत देव सादर करत असत. त्यामध्ये अनेक नामवंत कवींच्या संगीतबद्ध झालेल्या भावकविता पहिल्यांदा सादर झाल्या, आणि नंतर त्यांच्या ध्वनिमुद्रिका श्रोत्यांपर्यंत पोहोचल्या, रसिक मान्य होऊन अजरामर झाल्या. प्रस्तुत भावगीत 'अशी पाखरे येती' हे त्यापैकीच एक.

माणसाचं आयुष्य अगदी एखाद्या छोट्याशा प्रवासासारखं आहे. या प्रवासात त्याला भेटणारी माणसं, अनेक प्रकारची, आणि विविध स्वभावैशिष्ट्याची असतात. यामध्ये, सर्वात पहिले आपले जवळचे नातेवाईक , जसे की, आईवडील,आजी आजोबा, काका काकू, मामा मामी, भाऊ बहिणी, इतर नातेवाईक, शाळा कॉलेजमधील मित्र–मैत्रिणी, शिक्षक, इत्यादी. त्यानंतर नोकरी व व्यवसायाच्या निमित्ताने संपर्कात येणाऱ्या व्यक्ती, म्हणजे, आपल्या कार्यालयातील, वरिष्ठ, कनिष्ठ, सहकारी. बाजारहाट करतांना, दुकानदार, इतर व्यावसायिक, विविध सेवा पुरवठादार, असे असंख्य प्रवासी. वैद्यकीय व्यावसायिक, जसे कि, डॉक्टर, इस्पितळातील इतर कर्मचारी वर्ग, आपल्याला या जीवनप्रवासात भेटतात आणि आपलं आयुष्य बऱ्यावाईट अनुभवांनी, समृद्ध करून जातात. आजच माझ्या एका स्नेह्यांनी WhatsApp वर सांगलीचे एक रेडिओलॉजीस्ट डॉक्टर, श्री श्रीनिवास नाटेकर, यांच्या पुस्तकातील एक लेख पाठवला. त्यामध्ये त्यांच्या वैद्यकीय व्यवसाया निमित्ताने, अगदी थोड्या काळासाठी संपर्कात आलेल्या अनेक सृजनशील कलाकार आणि खेळाडूंच्या आठवणी, उदा. गानसम्राज्ञी लता मंगेशकर, पंडित भीमसेन जोशी, पंडित कुमार गंधर्व, कवी मंगेश पाडगांवकर, माजी पंतप्रधान, चौधरी चरणसिंग, उद्योगपती, श्री आदित्य बिर्ला, रतन टाटा, सदाशिव अमरापूरकर, संगीतकार ओ पी नय्यर, सुनील गावसकर, अजित वाडेकर इत्यादींच्या आठवणी लिहील्या आहेत. अगदी काही थोडक्या काळासाठी हे पक्षी त्यांच्या आयुष्यात आले, आणि आयुष्यभर त्यांच्या आठवणींचा ठसा उमटवून गेले.

अनेकांना, अशा काही सहप्रवाशांच्या स्मृती हव्याहव्याशा वाटतात, तर काहींच्या स्मृती नकोशा वाटतात आणि आयुष्यभर टोचणी लाऊन जातात.  काहींशी आपले सूर कायमचे जुळतात, तर काहींशी अजिबातच जुळत नाहीत किंवा जुळलेच तर अगदी अगदी थोड्या काळासाठी जुळतात. काहीजण त्यांच्या विशिष्ट आवाजासाठी लक्षात रहातात, तर काही जण त्यांची बोलण्याची, चालण्याची ढब, इतर विशेष लकबी आणि सवयींनी त्यांना आपल्याला कायमचं स्मरणात ठेवण्यासाठी भाग पाडतात. काहीजण सदैव मदत करण्यासाठी तत्पर असतात, तर काही मदत मागण्यासाठी.  आजकालच्या आभासी दुनियेत, हे वरच्यावर प्रत्यक्ष नजरेस न पडणारे पक्षी खूपच वाढलेत. त्यांच्या Social Media वरील हालचालींनी त्यांची एकंदर प्रकृती, विचारधारा यांचे दुरुन दर्शन होत असते.

अशा अनेक सहप्रवाशांचं व्यक्तीचित्रण प्रसिद्ध साहित्यिक पु. ल. देशपांडे यांनी त्यांच्या 'व्यक्ती आणि वल्ली' या पुस्तकात खुमासदार आणि विनोदी शैलीत केलेलं आपण अनेकांनी वाचलेलंच आहे. त्यांना भेटलेल्या अनेक व्यक्ती या वल्ली ठरलेल्या आहेत. त्यामुळे त्यांनी त्यांचा अमीट असा ठसा लेखकाच्या आणि वाचकांच्या मनावर उमटवलेला आहे.

माणसाच्या आयुष्याच्या प्रवासात भेटणाऱ्या या सर्व सहप्रवाशांना कवीने पक्षांची, पाखरांची सुरेख उपमा दिली आहे. कवीने या कवितेत निसर्गातील काही गोष्टींपासून सुरुवात केली आहे, जे त्यांच्या आयुष्यातील काही कालखंडात त्यांच्या मनावर

एक विशेष स्मृतींचा ठसा उमटवून गेल्या आहेत. जसा रात्रीच्या वेळी उगवणारा चंद्र, बागेत उमलणारी, आणि सुगंधाचा दरवळ पसरविणारी फुलं, घरातील आजी आजोबा यासारख्या जेष्ठ व्यक्ती इत्यादी. यासर्वांच्या स्मृतींचा उल्लेख अतिशय तरलतेने कवीने केलेला दिसतो. नकळत आपल्यालाही या सगळ्या गोष्टींची सय येते.

अशी पाखरे येती,
आणिक स्मृति ठेवुनी जाती
दोन दिसांची रंगतसंगत,
दोन दिसांची नाती ।।ध्रु।।

आयुष्यात अशा अनेक गोष्टी, आणि माणसं चंचल आणि चपळ अशा मोहक पक्षांसारखी संपर्कात येतात, आणि कायमच्या आठवणी मागे ठेवून जातात. त्यांचं सान्निध्य फार जास्त दिवस नसतं, ती खरंतर दोन दिवसांची म्हणजेच अगदीच क्षणिक रंगतदार संगत असते, आणि ती नाती ही अगदी थोडक्या काळासाठी असतात. पण ही स्मृतींची शिदोरी माणसाला कायमचं त्यांच्या बऱ्यावाईट आठवणीत रमून जायला Nostalgic व्हायला भाग पाडतात.

चंद्र कोवळा, पहिला वहिला,
झाडामागे उभा राहिला
जरा लाजुनि, जाय उजळुनी,
काळोखाच्या राती ।।१।।

कवीने त्यांच्या आयुष्यात पहिल्यांदाच काळोख्या रात्री झाडामागून डोकावणारा, डोळ्यांना सुखद शीतलता देणारा चंद्र पाहिला. त्याचं ढगाआड लाजून लपणं आणि पुन्हा ढगांच्या आडोशातून बाहेर येऊन रात्रीच्या काळोखाचा आसमंत उजळून टाकणारा होता. तो त्यांच्या गतकाळातील स्मृतींचा एक चिरंतन असा पक्षी। त्यांच्या आयुष्यभर एक आनंददायी ठसा उमटवून गेला.

फुलून येता फुल बोलले,
मी मरणावर हृदय तोलले
नव्हते नंतर, परी निरंतर,
गंधित झाली माती ।।२।।

कवीला निसर्गातील दिसलेला, दुसरा असा पक्षी म्हणजे, त्यांनी बागेत पाहिलेलं, नुकतंच उमललेलं फूल. त्यांच्या या भेटीत ते त्या फुलाशी नकळत संवाद साधतात. फूल जणू कवीला त्याची व्यथा आणि त्याच्या अतिशय कमी कालावधीचे मिळालेलं आयुष्य इतरांना सुगंध वाटण्यात व्यतीत करत असते. ते, म्हणतं की, मी आताच कुठे फुललोयं, पण दुसऱ्या क्षणाला माझ्या भवितव्याविषयी मला माहित नाही. जणू जन्माला आल्या क्षणापासूनच माझं अवघं आयुष्य मृत्यूच्या सावटाखाली आहे. आता अस्तित्व आहे, तर पुढच्या क्षणाला मी अस्तित्वात नसेन. पण माझ्या ठायी असलेल्या सुगंधाने अवघा परिसर आणि मी ज्या मातीतून जन्म घेतला, ती माती ही सुगंधीत होते. माणसाने हा त्याचा गुण नक्कीच घेण्यासारखा आहे.

हात एक तो हळु थरथरला,
पाठीवर मायेने फिरला
देवघरातिल समईमधुनी,
अजून जळती वाती ।।३।।

कवी आता आपल्या घरातील वृद्ध आणि ज्येष्ठ व्यक्तींबद्दलच्या स्मृती जागृत करतात. या ज्येष्ठांच्या सुरकुतलेला, थरथरता हात आपल्या पाठीवर मोठ्या मायेने, आपुलकीने फिरत होता, आणि ती मायेची उब सुखावणारी होती. त्यांचं अस्तित्व म्हणजे, देवघरात जळणाऱ्या समईतील वातीप्रमाणे आहे. ही ज्येष्ठ माणसं आपल्या घरात आहेत तोपर्यंत देवघरात या समईच्या मंद वाती प्रकाश देणार आहेत. आपल्याला कठीण प्रसंगात धीर देणार आहेत, चांगल्या कामासाठी मोकळ्या मनाने कौतुक करणार आहेत. (सध्याच्या काळात अशी ज्येष्ठ माणसं ज्यांच्या घरी आहेत, ते भाग्यवान समजले पाहिजेत).

कुठे कुणाच्या घडल्या भेटी,
गीत एक मोहरले ओठी
त्या जुळल्या हृदयांची गाथा,
सूर अजुनही गाती ।। ४ ।।

अशा आयुष्याच्या छोट्याशा प्रवासात, कुठे कुठे कोणाच्या भेटी घडल्यात, आणि या भेटीत सूर जुळल्यामुळे, एक सुंदर आणि सुरेल गीत ओठात मोहरून आले आहे. त्यामुळे त्या भेटलेल्या व्यक्तिंबरोबर जुळलेल्या हृदयाच्या तारांमुळे, त्याचे सूर अजुनही गाणं गात आहेत.

तर असं हे नितांत सुंदर भावगीत एकांतात बसल्यावर अनेकांना आठवत असेल. बाबुजींचा कातर स्वर, तसंच व्हॉयोलीन आणि सतार यांचं प्राबल्य असलेला स्वरसाज, हे भावगीत आणखीनच प्रभावी ठरतं.

**ब्रह्मानंद घुगरे**

# वाचनशिल्प

### त्याचे औदार्य टॅक्स वाचविण्याकरिता दान देण्याच्या पद्धतीचे आहे.

कर्णावर लेख येतात ते महाभारत वाचून नाही तर मृत्युंजय वाचून येतात. मृत्युंजय ही कर्णाचा खोटा गौरव करणारी कादंबरी आहे. तो काही इतिहास नाही. रणजित देसाईंनीं राधेय म्हणुन कादंबरी लिहिली आहे. त्याआधी माझे एक पुस्तक प्रकाशित झाले होते. नरहर कुरंदकर आणि रणजित देसाई दोघे जण रोज त्या पुस्तकाचे वाचन करीत होते. कर्णाचा गौरव तर करायचा, महाभारतात तर कुठे आधार नाही, तेव्हा रणजित देसाईनीं पाच – सहा ओळींची प्रस्तावना लिहिली. हे कर्णाचे चरित्र नव्हे. यातल्या सत्य–असत्यासाठी महाभारताची पाने शोधण्याचे काहीच कारण नाही. प्रत्येकाच्या मनात एक कर्ण असतो, त्याचा हा अविष्कार आहे. प्रत्येकाच्या मनात कर्ण आहे मग महाभारताचे सगळे संदर्भ कशाला? आणि ते कर्णाच्या गौरवाकरिता कशाला वापरायचे? तेव्हा कर्ण कुठल्याही प्रकारे मोठा नाही. तो उदार म्हणून त्याची खोटी कीर्ती झालेली आहे. त्याचे औदार्य टॅक्स वाचविण्याकरिता दान देण्याच्या पद्धतीचे आहे. इंद्राने त्याची कवचकुंडले मागितली. शत्रूला नामोहरम केलाच पाहिजे, दुबळा केलाच पाहिजे. म्हणुन अर्जुनाच्या संरक्षणासाठी इंद्राने त्याची कवचकुंडले काढून घेतली. कर्णाने प्रतिज्ञा केली होती, की अर्जुनवधापर्यंत मी याचक विन्मुख जाऊ देणार नाही. अर्जुनाला ठार मारण्यासाठी त्याने तो नवसच केला होता. याचकाला 'नाही' म्हणणार नाही. त्याचा फायदा घेऊन इंद्र ब्राह्मणवेषात कवचकुंडले मागायला गेला. सूर्याने कर्णाला आधीच सूचना दिली होती. म्हणुन त्याने इंद्राला ओळखले आणि 'इंद्राकडून शक्तीच्या बदल्यात कवचकुंडले दे' असे म्हण असे सूर्याने सांगितले होते. म्हणजे बोहारणीला जुना कोट देऊन भांडे घेण्यातला प्रकार झाला. दोघेही खूष असतात. जुना कोट दिला, त्याचा उपयोग नव्हता म्हणुन गृहिणी खुश आणि? कोटाची किंमत भांड्यापेक्षा बाजारात जास्त येते म्हणून! इंद्र वासवी शक्ती देतो पण अट घालतो की तिचा एकदाच वापर करता येईल आणि नंतर ती मजजवळ परत येईल. कर्ण होकार देतो, अर्जुनाच्या नाशाकरिता इंद्राची शक्ती मागून घेतली आहे. एकदाच वापरता येईल अशा अटीवर ती दिली आहे. ती कर्णाजवळ आहे म्हणून चौथे नाव कर्णाचे घेतले आहे. भीष्म–द्रोणाचे नाव निराळ्या कारणाकरिता घेतले आहे.

भगवान म्हणतात –

द्रोणं च भीष्मं जयद्रथं च कर्ण तथान्यानपि योधवीरान।
मया हतांस्त्वं जहि मा व्यथिष्ठा युध्यस्व जेतासि रणे सपत्नान ।।३४।।

आपल्या शत्रूला तू युद्धामध्ये नक्की जिंकशील. याची सगळी व्यवस्था मी केली आहे. आणि खरेच केली. इंद्राच्या शक्तीसाठी घटोत्कचाची योजना केली. पांडवांकडला दुर्जन, अहंकारी म्हणजे घटोत्कच. तो राक्षस आहे. हिडिंबेचा मुलगा आहे. भीमाचाही मुलगा आहे, पण आईचे गुण मुलात उतरलेत. आहे मात्र पांडवांच्या पक्षात. एकदा रात्री युद्ध चालूच राहिले. भगवंतांनी घटोत्कचाला सांगितले, 'रात्री युद्ध चालू आहे. तुझा मायावी प्रभाव दाखव'. घटोत्कचाने सर्व कौरव सैन्याला सळो की पळो करून सोडले. कुणी दिसायचे नाही आणि डोक्यात प्रचंड धोंडा पडायचा. शेवटी इतका मोठा संहार झाल्यावर दुर्योधन घाबरला. समोर



शत्रू दिसत नाही. त्यामुळे प्रतिकार करता येत नाही. शेवटी तो कर्णाकडे गेला, म्हणाला, 'तुझी ती शक्ती घटोत्कचावर सोड'. कर्ण म्हणाला, 'मी ती अर्जुनासाठी राखून ठेवली आहे.' दुर्योधन म्हणाला, 'अर्जुनाशी गाठ पडण्यासाठी आपण जिवंत राहिलो तर ना? आत्ताच नाहीसे व्हायची वेळ आली आहे. कल्पान्त ओढवला आहे.' शेवटी दुर्योधनाच्या आग्रहाखातर निरूपायाने कर्णाने ती शक्ती घटोत्कचावर सोडली. घटोत्कच मेला आणि इकडे भगवंतांनी आनंदाने टाळ्या वाजविल्या. आता अर्जुन वाचला. त्या शक्तीच्या जोरावर कर्णाचे सारे मनोरथ होते, ते आता विफल झाले.

'तू आता घाबरू नकोस, मी त्यांना म्हणजे द्रोण, भीष्म, जयद्रथ, कर्ण तसेच इतरही अन्य शूरवीरांना आधीच ठार मारले आहे. तू निमित्तमात्र हो. लढ, युद्ध कर. युद्धात तू शत्रुंना नक्की जिंकशील'.

एक ओवी – अनुवाद ज्ञानेश्वरी अनुभवावी

तूं द्रोणाची क्षिति न करी। भीष्माचें भय लव ना धरी।

शस्त्र चालवू कर्णावरी। कैसें , ऐसें म्हणू नको।। ४९४।।

संदर्भ ग्रंथ – विश्वरूपदर्शनयोग

(भ. गीता अध्याय ११) आणि अनुवाद ज्ञानेश्वरी (अध्याय ११)

**स्वामी वरदानंद भारती**
**विविध ग्रंथ संग्रहातून**
**सतीश निरंतर**

◈ ◈ ◈

**विचारधन...**

स्वतःला अंतर्बाह्य रिते करा. एखाद्या समस्येचे निराकरण करण्याऐवजी त्या समस्येपासून जर दूर पळत राहिलो, तर ती समस्या संपेलच असं नाही. जेवढं समस्येला आपण टाळू किंवा दूर ठेवण्याचा प्रयत्न करू तेवढीच ती आपल्यासोबत किंवा पाठोपाठ येत असते. एखाद्या समस्येपासून दूर पळणे हा त्यावरचा तोडगा नाही. एक स्वच्छ, निर्मळ, नितळ असं जीवन जगायचं असेल, ईश्वराशी नातं जोडायचं असेल, प्रभूच्या चरणांशी लीन होऊन ईश्वरीय अनुभव हवा असेल, तर स्वतःला आधी अंतर्बाह्य रिते करायला हवे. एखाद्याविषयी मनात वैरभावना ठेवून वागलात तर त्याचा त्रास व दुष्परिणाम हे तुमच्या मनाला शरीरालाच होणार आहे. मनाची शांतता भंग पावणार आहे. कधी कधी वैरभावना किंवा असूया मनातून काढून टाकली असे वरकरणी वाटत असते. पण, प्रामाणिकपणे स्वतःच्याच मनाला विचारून पहा. नक्कीच ती भावना मनाच्या कुठल्यातरी कोपऱ्यात साठवून ठेवलेली असते. अशा भावनेचा निचरा होणं गरजेचं आहे. जोपर्यंत आपण अशा भावनेला पूर्णविराम देत नाही तोपर्यंत अंतर्मनातच भरून राहणार व साठवून ठेवलेली वैरभावना कधी उग्ररूपं धारण करेल, आपल्याला हानी पोहोचवेल हे समजणारदेखील नाही. त्यामुळे एखाद्याविषयी बाळगलेली नाराजी किंवा वैरभावना लक्षात घेऊन ती व्यक्ती का नाराज झाली आहे? हे समजून घ्यायला हवे. आपली चूक मान्य करून कटुता संपवता आली तरच नात्यातील संबंध अबाधितपणे टिकून राहील.

**विचारधन...**

संयम हा आत्मधर्म. जाणणे आणि करणे यामध्ये जेव्हा अंतर निर्माण होते, तिथूनच आयुष्यातील समस्यांची खरी सुरुवात होते. वर्तमानातील गोष्टी पाहण्यासाठी इंद्रिये पुरेशी असतात, परंतु अवकाशातील संभावना जाणून घेण्यासाठी एक वेगळी शक्ती लागते. काही मोजक्या व्यक्तींनाच या संभावना पाहता येतात आणि हे पाहता येणे फार महत्त्वाचे असते. भूतकाळ पाहतो, आपण वर्तमान पाहतो, आपण कल्पनांमध्ये गुंतून पडतो, परंतु आपण संभावना पाहत नाही. प्रत्येक गोष्टीमध्ये, प्रत्येक व्यक्तीमध्ये संभावना काय आहेत हे पाहता येणे महत्त्वाचे आहे. त्या संभावना खुल्या करून दाखवणारी व्यक्ती कुशल किंवा मास्टर असते. जेव्हा निराशेचे ढग दाटून येतात, तेव्हा भविष्यातील संभावना पाहू शकत नसतो. म्हणूनच आपल्या बाबतीत असे होत असते. आयुष्यात कितीही अडथळे, आव्हाने आली तरी आपल्या स्वप्नांसाठी पुढे चालत राहणे हे छत्रपती शिवाजी महाराजांकडून शिकण्यासारखे आहे. अत्यंत प्रेरणादायी जीवन भगवान महावीर यांचे आहे. माझ्या आयुष्यात जेव्हा निराशेचे क्षण येतात, तेव्हा मी महावीरांच्या आयुष्यातील काही प्रसंगांची आठवण काढतो. परमात्म्याचे ज्ञान आपल्याला समजून घ्यायचे असेल, तर तो आपल्या नजरेसमोर असणे आवश्यक आहे. ईश्वराचा धर्म म्हणजे संयम, दुसऱ्याला श्रेष्ठ बनवण्याचा धर्म. संयम हा आत्मधर्म आहे, तो आपण समजून घेणे आवश्यक आहे. प्रत्येकाला श्रेष्ठत्वाकडे घेऊन जाण्याचा प्रयत्न परमेश्वर करत असतो. स्वतःला घडवण्यासाठी आपल्याला समर्पित करायचे आहे.

# हिंदू धर्मरक्षक श्री गुरु तेगबहादुर यांचे अविस्मरणीय बलिदान!

गुरु तेगबहादुर यांचा जन्म अमृतसर येथे १ एप्रिल १६२१ या दिवशी झाला. सहावे गुरू हरगोविंद हे त्यांचे वडील व माता नानाकी ही त्यांची आई. त्यांचे मूळ नाव त्यागमल! तेग म्हणजे तलवार. तलवारबाजीत निष्णात असणारे आणि सन १६३५ मधील मुघलांविरोधात कर्तारपूरच्या लढाईत अद्वितीय पराक्रमामुळे त्यांचे नाव तेगबहादुर म्हणून प्रचलित झाले. लहानपणीच त्यांना भाई बुढा व भाई गुरुदास यांनी नेमबाजी व घोडेस्वारीचे प्रशिक्षण दिले. शिखांचे आठवे गुरू हरि क्रिशन यांनी अंत्यसमयी बाबा बकाला हे शब्द उच्चारून भावी गुरूंचे नाव सूचित केले. बकालाचे बाबा वा साधुपुरुष म्हणजे शिखांचे नववे गुरु तेगबहादुर होय. गुरुपदी पोहचण्यासाठी त्यांना अनेक कठीण प्रसंगांना तोंड द्यावे लागले. बाबा बकाला या शब्दाचा अर्थ आकलन न झाल्याने बकाला येथे गुरुपदासाठी अनेक इच्छुक तयार झाले होते. परंतु अखेर ११ ऑगस्ट १६६४ रोजी तेगबहादुर गुरू म्हणून घोषित झाले. भाई बुढा यांचा मुलगा भाई  गुरुदत्त यांनी नवीन गुरूंच्या कपाळी टिळा  लावून शिखांचे  नववे  गुरु निश्चित केले. त्यावेळी गुरु तेगबहादुर यांचे वय ४३ वर्षे होते. त्यांनी देशभर प्रवास केला. कर्तारपूरपासून जवळ जुन्या माखोवाल या खेड्याच्या जागी चाक नानकी या गावाची स्थापना केली ह्याचाच काही भाग पुढे आनंदपूर या नावाने प्रसिद्ध झाला.

गुरूंनी वेद, पुराण आणि उपनिषदांचा अभ्यास केला होता. ते आध्यात्मिक क्षेत्रात विद्वान तर होतेच, तर उत्तम कवी सुद्धा होते. त्यांनी रचलेली ११५ भजनं श्रीगुरुग्रंथ साहिब या पवित्र ग्रंथात सामील आहेत. १६५७ मध्ये औरंगजेब सत्तेवर आल्यापासूनच अत्याचार सुरू झाले. अनेक देवळांचा त्याने विध्वंस केला. सोमनाथ, मथुरा, काशी विश्वेश्वर ही प्रख्यात मंदिरे पाडण्यात येऊन तेथे मशिदी बांधल्या. नव्याने देऊळ बांधायला बंदी, हिंदूंच्या पाठशाळा बंद करून त्याच्यावर जिझिया कर लावण्यात आला. दिवाळीत दिवे लावायला बंदी, होळी साजरी करण्याला प्रतिबंध, हिंदू यात्रा बंदी असे अनेक जुलुमी नियम त्याने लादले. त्याच्या काळात हिंदूंना दुप्पट कर द्यावा लागत असे.काश्मीरचा मुघल सुभेदार शेर अफगाण खान याने काश्मीरमध्ये हिंदूंचे सक्तीने धर्मांतर सुरू केले. मोठ्या प्रमाणावर अत्याचार झाल्यावर काश्मिरी पंडितांचे शिष्टमंडळ गुरू तेगबहादुर यांच्याकडे आले. त्यावेळेस त्यांना सहाय्यासाठी पंजाबमध्ये शीख गुरूकडे जावेसे वाटले हे महत्त्वाचे आहे. आनंदपूरला शीख सभेत हिंदूवरील अत्याचाराचे वर्णन ऐकून तेगबहादुर यांचे मन खिन्न झाले. त्यावेळेस त्यांचा लहान मुलगा गोविंदराय आपल्या वडिलांची स्तब्धता पाहून त्याने आपण बोलत का नाही असा प्रश्न केला, त्यावर गुरू म्हणाले की, मोगलांचे अत्याचार चालू आहेत, कोणी शूर योद्धा दिसत नाही. जो आपले प्राण पणाला लावेल तोच या अत्याचारापासून हिंदूंची सुटका करेल. त्यावर लहान गोविंदराय म्हणाला की आपल्याहून दुसरा  योग्य पराक्रमी कोण आहे? त्यावर आपल्या मनातली गोष्ट लहान मुलाने बोलून दाखवली ह्यावर त्यांनी निर्णय घेतला आणि काश्मिरी पंडितांना ते म्हणाले की, नववा शीख गुरु गुरुनानक यांच्या आसनावर बसला आहे. तो आमच्या धर्माचा रक्षणकर्ता आहे. प्रथम त्याला मुस्लिम करा. मग आम्ही सुद्धा मुस्लिम होऊ! हा निरोप औरंगजेबाला कळवा. काश्मिरी पंडितांकडून असा निरोप औरंगजेबाला गेल्यावर तेगबहादुर यांना अटक झाली. आपल्या गुरुला शीख सच्चा पातशहा म्हणतात याबद्दल तसेच तेगबहादुर यांच्या नावातील बहादूर या शब्दावर औरंगजेबाचा रोष होता. त्याने तेगबहादुर आणि त्यांच्या बरोबर असलेल्या शिष्यांपुढे मुस्लिम होण्यासाठी पर्याय ठेवण्यात आला. तो त्यांनी धुडकावून लावला. याशिवायही अनेक पर्याय त्यांच्या समोर ठेवण्यात आले. परंतु ते सर्व नाकारल्याने शेवटी क्रूरपणे छळ  सुरु केला. त्यांचे शिष्य मतीदासांना दिल्लीतील चांदणी चौकात दोन खांबांना बांधून डोक्यापासून खाली करवतीने चिरून टाकण्यात आले. तर शिष्य  दयालदास यांना उकळत्या तेलात टाकून ठार मारण्यात आले.आपल्या प्रिय शिष्यांनी धर्मासाठी  दिलेले बलिदान बघून तेगबहादुर डगमगले नाहीत. अखेरपर्यंत त्यांच्या पुढे मुस्लिम धर्म स्वीकारण्याचा आणि सुटका करून घेण्याचा पर्याय ठेवला



होता. पण तेवढ्याच धैर्याने ते प्रसंगाला सामोरे गेले, आपला मृत्यू डोळ्यासमोर दिसत असताना सुद्धा त्यांनी आपला धर्म सोडला नाही व इस्लामचा स्वीकार केला नाही.परिणामी चांदणी चौकातील कोतवालीत गुरू तेगबहादुर यांचा शिरच्छेद करण्यात आला. आज तेथे शीश गंज साहिब नावाचा गुरुद्वारा आहे. वयाच्या ५४ व्या वर्षी त्यांना हौतात्म्य आले. ह्यामध्ये औरंगजेबाचा पराभव झाला. बलिदानाने आपला धर्म आपल्या प्राणापेक्षा प्रिय आहे हे सिद्ध केले. बलिदानाची प्रेरणा घेऊन हिंदू समाज पुढे कायमच धर्मांतर विरोधी लढत राहिला. शिखांच्या आणि हिंदुस्थानाच्या इतिहासातील ही प्रेरणादायी आणि स्फूर्तिदायक घटना. गुरु अर्जुनानंतर हुतात्मा झालेले दुसरे गुरु म्हणजे तेगबहादुर! हिंदूंचे रक्षणाकरिता त्यांनी हौतात्म्य स्वीकारले.

यंदा त्यांच्या बलिदानांला ३५० वर्षे पूर्ण होत आहेत. गुरु तेगबहादुर बलिदानाचे स्मरण म्हणून देशभरात त्यांना वंदन करण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्रात महाराष्ट्र सरकार आणि हिंद दी चादर श्री गुरु तेगबहादुर साहीबजी ३५० वी शहिदी समागम समिती यांच्या संयुक्त विद्यमाने तीन मोठ्या सभांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामध्ये दि.७ डिसेंबर २०२५ रोजी नागपूर येथे उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री मा.योगी आदित्यनाथजी, तर दि.२१ डिसेंबर २०२५ रोजी मुंबई येथे केंद्रीय गृहमंत्री मा.अमितजी शहा, तसेच दि.२४ जानेवारी २०२६ रोजी नांदेड येथे आपल्या देशाचे पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी यांची प्रमुख उपस्थित राहणार आहे. त्याचबरोबर रथ यात्रा, लॉकेट वितरण, निबंध स्पर्धा इत्यादी उपक्रम समिती व महाराष्ट्र सरकार राबविणार आहेत. शिखांचे दहावे गुरू गुरु गोविंद सिंग आणि तेगबहादुर यांचे पुत्र आपल्या पित्याच्या जीवनाविषयी नमुद करतात की, धरम हेत साका जिनि की, सीसु दिआ परू सिसरु न दिआ! इतिहास गुरू तेगबहादूर यांचे धर्मासाठीचे हे बलिदान कधीच विसरणार नाही. हिंद दि चादर म्हणून प्रसिद्ध असलेले महान, पराक्रमी गुरुंना आणि त्यांच्या जीवनकार्याला शतशः नमन!

शिखांचे नववे गुरु तेगबहादुर यांच्या हिंदू धर्मासाठी झालेल्या अविस्मरणीय बलिदानाला २४ नोव्हेंबर २०२५ रोजी ३५० वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्त स्मरण....

**किशोर चव्हाण, प्रांत मंत्री**

◈ ◈ ◈


**विश्व हिंदू परिषद व हिंदुबोधच्या कार्यास हार्दिक शुभेच्छा**

**डॉ. गायत्री सतिश गोरडे, नेत्रतज्ञ (MBBS, M S (Ophthamology) Fellowship in CORNEA)**

# आपल्या भारतातील विलक्षण, अद्वितीय गांवे

१) आळंदी गाव (महाराष्ट्र) : आळंदी या गावात आजही (गाव वेशीत) मास–मटण मिळत नाही या गोष्टीला ७०० वर्षे पुर्ण झालीत.

२) शनिशिंगणापूर (महाराष्ट्र) : संपूर्ण गांवात, एकाही घराला कडी–कोयंडा नाही.

३) शेटफळ (महाराष्ट्र) : प्रत्येक ग्रामस्थाच्या घरात, कुटुंबाचा सदस्य असल्यासारखी सर्पराजाची उपस्थिती.

४) हिवरे बाजार (महाराष्ट्र) : भारतातील सर्वात श्रीमंत खेडे. ६० अब्जाधीश घरे. एकही गरीब नाही. सर्वाधिक GDP असणारं खेडं.

५) पनसरी (गुजरात) : भारतातील सर्वात अत्याधुनिक खेडेगांव. गावातील सर्व घरात CCTV जोडण्या असून, Wi-Fi सुविधाही आहेत. गांवातील सर्व 'पथदीप'सौरउर्जेवर चालतात.

६) जंबुर (गुजरात) : भारतीय वंशाचे असूनही, सर्व नागरिक आफ्रिकन वाटतात. परिसरात आफ्रिकन गांव अशीच ओळख.

७) कुलधारा (राजस्थान) अनिवासी गांव. गांवात कोणीही रहात नाही. घरे बेवारस सोडलेली आहेत.

८) कोडिन्ही (केरळ) : जुळ्यांचे गांव. जवळपास प्रत्येक घरात जुळं.

९) मत्तूर (कर्नाटक) : दैनंदिन व्यवहारासह सगळ्याच कामकाजासाठी संस्कृत भाषेचा अनिवार्य वापर करणारं गांव.

१०) बरवानकाला (बिहार) : ब्रम्हचाऱ्यांचे गांव. गेल्या ५० वर्षांपासून गांवात लग्न–सोहळाच नाही.

११) मॉवलिनॉन्ग (मेघालया) : 'आशिया'खंडातील सर्वात स्वच्छ गांव. पर्यटकाना भुरळ घालणारे लहानशा दगडावरील महाकाय पत्थराचे निसर्ग–शिल्प.

१२) रोंगडोई (आसाम) : बेडूकांचे लग्न लावल्यास पर्जन्य सुरू होतो, अशी श्रद्धा (की अंधश्रद्धा?) जपणारं गांव. असं लग्न हा 'ग्रामसण'च असतो.

१३) कोर्ले गांव,रायगड जिल्हा (महाराष्ट्र) Korlai village स्वातंत्र्यानंतर व पोर्तुगिझ गेल्यानंतरही 'पोर्तुगिझ' भाषा दैनंदिन व्यवहारात वापरणारं गांव.

१४) मधोपत्ती गाव (उत्तर प्रदेश) : एका गावातून ४६ पेक्षा जास्त IAS बनलेले हे गाव, ९० टक्के पेक्षा जास्त सरकारी नोकरीमध्ये प्रथम दर्जाचे अधिकारी देणारे हे गाव भारताने नमूद केले आहे.

१५) झुंझनु (राजस्थान) : फौजींच गाव, एका घरातून तीन ते चार फौजी, पांच पांच पिढी पासून प्रत्येक घरात फौजी, खरी देशसेवा म्हणजे हे गाव आणि गावातली प्रत्येक व्यक्ती... ६ हजार पेक्षा जास्त सेवानिवृत्त, आणि ११ हजार जास्त फौजी देशाचा विविध भागात नोकरीवर रुजू...

**वाठार स्टेशन चे नामकरण** : सातारा जिल्ह्यात, कोरेगाव तालुक्यात, पुणे मिरज रेल्वे लाईनवर वाठार स्टेशन नावाचे स्टेशन आहे. आश्चर्य म्हणजे त्याच्या आजूबाजूस कोठेही वाठार नावाचे गाव नाही. स्टेशनच्या भोवती आता खूप वस्ती वाढली आहे आणि त्या वस्तीचे गावात रुपांतर झाले आहे. त्या गावाचे नाव वाठार स्टेशन असेच आहे.

याचा इतिहास फार रंजक आहे. इंग्रजांनी जेव्हा पुणे – मिरज रेल्वे सुरू केली तेंव्हा कोळशाचे इंजिन होते. त्या मध्ये ठराविक वेळेनंतर पाणी भरावे लागायचे. पुणे स्टेशन सोडल्यानंतर आताच्या वाठार स्टेशनपर्यंत आल्यावर पाणी भरणे आवश्क व्हायचे पण तिथे वस्ती किंवा पाण्याची काही सोय नसल्यामुळे इंग्रजांनी तिथे खास Water Station बांधले. त्याचे स्थानिकांनी वाठार स्टेशन असे नामकरण केले. स्टेशनमुळे शेजारी वस्ती वाढली आणि गाव अस्तित्वात आले.

त्याच्याच पुढे घाटात आदर्की नावाचे स्टेशन आहे. तिथे पण आदर्की नावाचे गाव अस्तित्वात आले. प्रत्यक्षात घाटातील चढामुळे इंजीन थांबवून दुसरी किल्ली वापरून पुढे इंजीन चालवायला लागायचे म्हणून इंग्रजांनी तिथे स्टेशन बांधले व त्याचे नाव other key असे ठेवले होते.

इतिहास...

Water Station – वाठार स्टेशन

Other Key – आदर्की



स्वत:च्या कुटुंबासाठी हवे

स्वत:चे घर,

ठेवा विश्वास जनसेवेच्या

'घरकुल' कर्जावर !

# जनसेवा घरकुल कर्ज

रो हाऊस, बंगला, फ्लॅट
खरेदीसाठी किफायतशीर कर्ज उपलब्ध.
(सिबिल स्कोरनुसार व्याजदर)

- आकर्षक व्याजदर
- तत्पर सेवा
- अल्प प्रोसेसिंग फी
- रु. 2 कोटींपर्यंत कर्ज

* अटी लागू

संपर्क क्र. - 84 85 87 12 52

## जनसेवा सहकारी बँक लि., हडपसर, पुणे.

जनसामान्यांची असामान्य बँक, जनसेवेसाठी वचनबद्ध !

**मुख्य कार्यालय** : प्लॉट क्र. १४, हडपसर इंडस्ट्रिअल इस्टेट, हडपसर, पुणे ४११०१३.

www.janasevabankpune.net

वार्षिक वर्गणी रु. २००/- फक्त

Date of Publication : 26/11/2025 and
Date of Posting : 28/11/2025 at PSO, GPO, Pune 411 001

RNI NO. MAHMAR/2001/05879
Postal Registration No. PCW/077/2024-2026
Licence to post Without Prepayment No. WPP-114

# हिंदुबोध (मासिक)

सप्रेम नमस्कार,

विश्व हिंदू परिषदेचे संपूर्ण महाराष्ट्रात पोहोचणारे एकमेव मासिक म्हणजे **'हिंदुबोध'.**

● मासिक मुल्य रु. २०/- ● वार्षिक वर्गणी रु. २००/- ● त्रैवार्षिक वर्गणी रु. ५००/-

(पंचवार्षिक किंवा आजीवन योजना आता बंद केली आहे.)

oooo

## ✻ हिंदुबोध जाहिरात दरपत्रक ✻

मासिक पाने ४४ (रंगीत पानांसह)

| | |
|---|---|
| रंगीत पूर्ण पान | रु. १.५ लाख |
| साधे पान | रु. १ लाख |
| साधे अर्धे पान | रु. ५०,०००/- |
| साधे १/४ पान | रु. २५,०००/- |
| साधे १/८ पान | रु. १२,०००/- |
| साधे १/१६ पान | रु. ६,०००/- |
| सौजन्य पृष्ठ (तळटीप शुभेच्छा) | रु. २,१००/- |
| हिंदुबोध अंक मुल्य | रु. २०/- |
| वार्षिक वर्गणी | रु. २००/- |
| त्रैवार्षिक वर्गणी | रु. ५००/- |

## ✻ हिंदुबोधची वर्गणी ✻

जनता सहकारी बँक लि. शनिवार-नारायण पेठ शाखा, पुणे - ४११०३०.

**Account Name : Hindubodh**

A/C No : 015220100024473 IFSC Code : JSBP0000015

**HINDU BODH**

Scan QR Code below with your PSP App

Or Pay to VPA
hindubodh@jsb

### कार्यालयीन पत्ता : संपादक, हिंदुबोध

विश्व हिंदू परिषद, महाराष्ट्र प्रदेश (पश्चिम) १३६०, शुक्रवार पेठ, भारत भवन, पुणे - ४११ ००२.

दूरध्वनी : ९०४९३९६३६३, दूरभाष : (०२०) २४४७१७०१

**Email : hindubodh.pmp@gmail.com**

**हिंदुबोध**

व्दारा : रविकांत कळंबकर, ९८२२२६१६६२
विश्व हिंदू परिषद, १३६० शुक्रवार पेठ, नातूबाग,
भारत भवन, पुणे - ४११ ००२.
दूरध्वनी : ०२०-२४४७१७०१